
1980-81

# MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN
MODERN





**महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा परीक्षा तयारी वर्ग समारोप**

श्री. सुभाषचंद्र भोसले,
कुलसचिव, पुणे विद्यापीठ.
श्री. पाळंदे, आयुक्त,
पुणे महानगरपालिका, पुणे.
आणि
प्राचार्य, स. य. गंभीर.
←

**महाविद्यालयात सुरू केलेला घड्याळ दुरुस्ती वर्ग**

वर्गास कॅनेडियन पाहुणे
श्री. क्रेअर्न (मध्यभागी)
यांची भेट.
डावीकडे प्रा. दांडेकर
आणि थेट उजवीकडे
डॉ. भालचंद्र फडके
→





**" राष्ट्रीय सेवा योजना "**
**नेत्रशिबिर : ३१ ऑगस्ट, १९८०**

डॉ. भगली
डोळे तपासतांना —
←

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे

**मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५**

संपादन समिती

प्राचार्य प्रा. स. य. गंभीर, अध्यक्ष
उपप्राचार्य डॉ. ल. ह. गाडगीळ, उपाध्यक्ष
उपप्राचार्य प्रा. प. स. चिरपुटकर, उपाध्यक्ष
उपप्राचार्य प्रा. सु. ग. दातार, उपाध्यक्ष
डॉ. सु. व्यं. धायगुडे, सदस्य
डॉ. द. दि. पुंडे, सदस्य
डॉ. सौ. माधवी मित्रा, सदस्य
प्रा. यशवंत सुमंत, सदस्य
डॉ. र. वि. गंधे, सदस्य
श्री. ए. वाय. सावंत, विद्यार्थि-प्रतिनिधी

# मॉडर्न ८०-८१

संपादक
डॉ. शं. ना. नवलगुंदकर

मुद्रक
सौ. उषा ज. नागपूरकर,
श्री मुद्रण मंदिर, पुणे ३०

टसे
सुप्रीम प्रोसेस, पुणे ३०

प्रकाशक
प्राचार्य : स. य. गंभीर

**मॉडर्न कला, शास्त्र व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ५**

# नवागतांचे स्वागत

वरिष्ठ महाविद्यालयातील डॉ. आर्. जी. देशपांडे ( रसायन-विभाग ), सौ. एस. डी. जोग ( रसायन विभाग ), श्री. वाय्. आर्. वाघमारे ( वाणिज्य ), श्री. पी. एस्. कापरे ( संख्या शास्त्र ), सौ. व्ही. ए. अभ्यंकर ( पदार्थविज्ञान ), सौ. एन्. एस्. रानडे ( पदार्थ विज्ञान ), आणि कनिष्ठ महाविद्यालयातील सौ. एस्. ए. नाडगीर ( हिंदी ), कु. एस्. जी. उदास ( जर्मन ), श्री. एच्. एन्. कांबळे ( भूगोल ), श्री. पी. डी. कुलकर्णी ( गणित ), कु. ए. एफ्. मुळे ( भूगोल ), सौ. एन्. एम्. मोने ( मराठी ), डॉ. सौ. वंदना तळेकर ( राज्यशास्त्र ), कु. एस्. पी. शहाणे ( पदार्थ विज्ञान ), सौ. ए. व्ही. धडफळे ( अर्थशास्त्र ), कु. पी. एस्. पेंढारकर ( इंग्रजी ), कु. एस्. आर्. हसबनीस ( वाणिज्य ), सौ. एस् जी. गलगली ( प्राणिशास्त्र ), सौ. एम् ए. मुंडले ( प्राणिशास्त्र ), या नवागतांचे आम्ही स्वागत करीत आहोत.

# पदोन्नती

महाविद्यालयातील श्री. एस्. वाय्. कुलकर्णी ( ऑफिस–सुपरिंटेंडंट ), श्री. दिलीप खोपकर ( असि. ऑफिस सुपरिटेंडण्ट ), श्री. एस्. जी. मनोली ( हेड क्लार्क ), श्री. व्ही. के. खरे ( सीनिअर क्लार्क ), श्री. ए. एस्. चंद्रचूड ( असि. लायब्ररीयन ), श्री. डी. व्ही. जाधव ( लॅबरेटरी–टेक्निशियन ), श्री. एस्. एन्. पटवर्धन ( ज्यूनिअर लायब्ररी असिस्टंट ) श्री. एस्. एन. गोरे ( ज्यूनिअर लायब्ररी आसिस्टंट ), श्री. व्ही. ए. कांबळे ( लॅबरेटरी असिस्टंट ), श्री. एन्. टी. पाटेकर ( लॅबरेटरी असिस्टंट ), श्री. डी. आर्. शेंडकर ( लॅबरेटरी असिस्टंट ), श्री. एस्. एस्. शेंडकर ( इलेक्ट्रिशियन ), श्री. बी. एस्. नरवडे ( हेड प्यून ), या कर्मचाऱ्यांची त्यांच्या नावापुढे कंसात दिलेल्या हुद्यावर पदोन्नती झाली आहे. त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# शुभेच्छा

महाविद्यालयातील डॉ. आर्. आर्. भोंडे ( प्राणिशास्त्र ), श्री. एस्. एम्. घासकडबी (प्राणिशास्त्र), श्री. एन्. सी. दुधाळे ( प्राणिशास्त्र ), श्री. एन्. एस्. सय्यद ( वाणिज्य ), व कु. एम्. एम्. पारखी यांना अन्यत्र संधी मिळाल्याने ते सेवामुक्त झाले आहेत. त्यांना त्या त्या क्षेत्रात यश लाभो ही शुभेच्छा.

# आमचे मनोगत

यंदाचा नियतकालिकाचा अंक आपल्या हाती देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे. महाविद्यालयाच्या पहिल्या दशकाच्या यशस्वी वाटचालीनंतर आगामी दशकाचा शुभारंभ करीत हे शैक्षणिक वर्ष सुरू झाले. दशवार्षिक समारोहाच्या स्मृती अद्याप ताज्या आहेत. त्या निमित्ताने महाविद्यालयाच्या सर्वांगीण प्रगतीचे मूल्यमापन झाले आहे. आगामी कालातील विकासाच्या दिशाही काही प्रमाणात स्पष्ट झाल्या. आपणास कोठे जायचे हे निश्चित करताना आपण कोठे आहोत हे माहीत असणे आवश्यक असते. त्या दृष्टीने दशवार्षिक महोत्सव महत्वपूर्ण मानावा लागेल.

दहा वर्षांपूर्वी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या धुरीणांनी अनेक अडचणींवर मात करून मॉडर्न महाविद्यालयाची स्थापना केली. पुणे शहरातील जुन्या व लौकिकप्राप्त महाविद्यालयाच्या परिसरात नव्याने एका महाविद्यालयाची स्थापना करणे हे एक प्रकारचे आव्हानच होते. ते आव्हान संस्थेच्या द्रष्ट्या संचालकांनी स्वीकारून अवघ्या दहा वर्षात मॉडर्न महाविद्यालयाला एक सुस्थिर, समृद्ध व प्रथितयश असा लौकिक प्राप्त करून दिला आहे. १९८०–८१ या वर्षात मात्र संस्थेवर वज्राघात झाला आहे. कारण प्राचार्य न. गो. सुरू व श्री. वि. त्र्यं. ताटके हे आधारद्वय कालवश झाले. प्राचार्य सुरू हे संस्थेच्या नियामक मंडळाचे अनेक वर्षे अध्यक्ष होते. विश्वविद्यालयीन क्षेत्राचा त्यांचा अनुभव दांडगा होता. संस्थासंचलनात येणाऱ्या अडचणींचा परिहार करण्याची त्यांची हातोटी कौतुकास्पद होती. श्री. ताटके हे अनेक वर्षे संस्थेचे चिटणीस होते. शिस्त, कामाचा विलक्षण उरक, उदंड उत्साह, करारीपणा, प्रशासकीय दरारा इत्यादी सद्‌गुणांचे संमिश्र स्वरूप त्यांच्या व्यक्तिमत्वात होते. संस्थेची ही आधारचक्रे कालचक्रात विलीन झाल्याने महाविद्यालयाची आगामी दशकातील जबाबदारी अधिकच वाढली आहे.

१९७० मध्ये महाविद्यालय सुरू झाले तेव्हा विद्यार्थी संख्या ७०७ होती तर आज ती संख्या ३३७६ झाली आहे. त्या वेळी २८ प्राध्यापक होते तर आज ११० पेक्षा अधिक प्राध्यापक आहेत. प्रतिवर्षी महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या वाढतच आहे. बी. ए;

बी. एस्.सी; बी. कॉम्. परीक्षांचे अनेक विषयांचे अभ्यासक्रम चालू आहेत. त्या शिवाय एम्. कॉम्. चे वर्गही सुरू आहेत. संख्यात्मक वृद्धीबरोबर महाविद्यालयाची गुणात्मक वृद्धीही झाली असल्याचे विद्यापीठीय परीक्षा निकालावरून ध्यानात येते. महाविद्यालयाचा परीक्षा निकाल खचितच अभिमानास्पद आहे.

**विद्यार्थी केन्द्र शैक्षणिक प्रक्रिया :**

मॉडर्न महाविद्यालय हे प्रथमपासून विद्यार्थी-केंद्र महाविद्यालय आहे. सर्वांगीण विकास साधून विद्यार्थ्याला व्यापकस्वरूपाच्या जीवनात यशस्वी वाटचाल करून देण्याची पूर्वतयारी महाविद्यालयातील विविध उपक्रमांतून होत असते. शैक्षणिक क्षेत्रात जी एक काहीशी स्फोटक परिस्थिती आढळते, त्याचे प्रधान कारण म्हणजे उद्दिष्टांची अनिश्चिती आणि जीवनमूल्याची पडझड होय. त्याला काही प्रमाणात नियंत्रण घालण्यासाठी मॉडर्न महाविद्यालय सातत्याने प्रयत्नशील आहे. विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनातील अंतिम वर्षात त्यांना व्यावसायिक मार्गदर्शन केले जाते. आपल्या अंगी असलेल्या सुप्त आणि व्यक्त गुणवत्तेच्या निकषावर विद्यार्थ्यांनी कोणत्या क्षेत्रात पदार्पण करणे त्याच्या दृष्टीने आणि व्यापक स्वरूपाच्या समाजाच्या दृष्टीने हिताचे ठरेल या संबंधी दिग्दर्शनाची खचितच गरज आहे. कला, वाणिज्य किंवा शास्त्राच्या विद्यार्थ्याला मिळणारी पुस्तकी ज्ञानाची शिदोरी अपुरी ठरते. शैक्षणिक प्रक्रिया व्यवसायाभिमुख होण्याची नितांत गरज आहे. त्या दृष्टीने महाविद्यालयाने काही उपक्रम प्रयोगादाखल हाती घेतले आहेत. सी. ए. प्रवेशपरीक्षा तयारी वर्ग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग स्पर्धा-परीक्षा तयारी वर्ग, घड्याळ दुरुस्ती वर्ग, इ. उपक्रमांना विद्यार्थ्यांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला आहे. शैक्षणिक विस्ताराची ही एक नवी दिशा असून आम्ही या दिशेने एक पाऊल टाकले आहे. भावी काळातील शैक्षणिक विस्तारांना या दिशेने प्रचंड वाव आहे. महाविद्यालयात डॉ. आंबेडकर जयंती, शिक्षक दिन, लो. टिळक पुण्यतिथी इ. कार्यक्रम आयोजीत केले जातात. विद्यार्थ्यात जीवन मूल्यांची निर्मिती आणि जोपासना करणे हा त्यामागील एक उद्देश आहे. विद्यार्थ्यांत नेतृत्वाच्या गुणांचा विकास व्हावा या दृष्टीने महाविद्यालय सतत प्रयत्नशील आहे. निरनिराळ्या उपक्रमातून नेतृत्वाचा उदय व विकास होऊ शकतो. सत्र पद्धतीमुळे विद्यार्थी वर्ग हा चाचण्या आणि परीक्षा यांतच व्यग्र आहे. त्यामुळे अभ्यासेतर उपक्रमातील त्यांच्या सक्रीय सहभागावर काहीसा अनिष्ट परिणाम होणे स्वाभाविक आहे. तथापि आमच्या महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध उपक्रमात यश मिळवून महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली आहे. अशा सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींचे शैक्षणिक व अन्य क्षेत्रातील यश अभिमानास्पद आहे.

**प्राध्यापकांची गुणवत्ता वृद्धी :**

महाविद्यालयाच्या जीवनात विद्यार्थ्याला असाधारण महत्त्व आहे. त्याची जडण आणि घडण करण्याचे उत्तरदायित्व प्राध्यापकावर आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकसित करत असताना आपली गुणवत्तादेखील विकसित होण्याची गरज आहे. याची महाविद्यालयातील प्राध्यापकांना जाण आहे. महाविद्यालयातील काही प्राध्यापक पीएच. डी. या सर्वोच्च पदवीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत. प्रतिवर्षी काही प्राध्यापक सर्वोच्च पदवी प्राप्त करताना दिसतात. यावर्षी दोन प्राध्यापकांनी ही पदवी प्राप्त केली तर दोन प्राध्यापक एम्. फिल्. झाले आहेत. यु. जी. सी. फेलोशिप मिळवून विद्यापीठीय विभागात संशोधनव्यग्र असलेले आमचे काही प्राध्यापक आहेत. काही प्राध्यापकांनी संशोधन अनुदान प्राप्त केले असून त्यांचे प्रकल्प साकार होत आहेत. अन्य अनेक प्राध्यापकांच्या संशोधन कल्पना साकारत आहेत. अशा सर्व गुणी प्राध्यापकांचे कौतुक करणे अगत्याचे आहे. सत्र पद्धतीमुळे विद्यार्थी हा सतत परीक्षार्थी झाला आहे. त्याचबरोबर मूल्यांकन आणि पुनर्मूल्यांकन या कामात प्राध्यापकांची सातत्याची गुंतवणूक झाली आहे. शासकीय

नियमानुसार अध्यापनाचे तास वाढले आहेत. वाढीव तास आणि मूल्यांकनाचे काम सांभाळून महाविद्यालयीन प्राध्यापक स्वेच्छेने संशोधनाभिमुख आहेत ही गोष्ट अभिमानास्पद आहे. प्राध्यापक अभ्यासमंडळ, ग्रंथचर्चा मंडळ इत्यादी उपक्रम प्राध्यापकांतील 'ब्रह्मजिज्ञासा' व्यक्त करतात.

**कर्मचाऱ्यांचे निरलस परिश्रम :**

महाविद्यालयाच्या विकासाबरोबर कर्मचाऱ्यांची संख्यावृद्धी झाली आहे. तथापि नव्या शैक्षणिक व अन्य उपक्रमामुळे आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे कर्मचारीवर्गावरील कामाचा ताण वाढला आहे. त्यांची गुणवत्ता लक्षात घेऊन ह्या वर्षी अनेकांची पदोन्नती झाली आहे. वाढलेली जबाबदारी पूर्ण करण्याचे एक नवे आव्हान त्यांच्यासमोर आहे. शिक्षकेतर कर्मचारी संघटनेत आमच्या कर्मचारी प्रतिनिधीला जबाबदारीचे पद प्राप्त झाले आहे. परस्पर सहकार्यातून प्रशासनशकट यशस्वीपणे पुढे नेणाऱ्या आमच्या कर्मचाऱ्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

**सामाजिक ऋण :**

महाविद्यालय आणि समाज यांचा परस्पर संबंध अतूट असतो. महाविद्यालयामुळे सुसंस्कारित विद्यार्थ्यांचे योगदान समाजाला लाभावे ही महाविद्यालयाबद्दलची स्वाभाविक अपेक्षा आहे. शैक्षणिक गुणवत्ता आणि जीवनमूल्यविषयक आदर वाढवून विद्यार्थी वर्ग समाजाकडे गेला तर तो सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिमान करू शकेल याची महाविद्यालयाला जाण आहे. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून महाविद्यालय आणि समाज यांचा परस्पर संबंध प्रस्थापित होत असला तरी काही उपक्रम असे असतात की ज्यातून महाविद्यालय समाजाची प्रत्यक्ष सेवा करू शकते. महाविद्यालयाने या वर्षी नेत्रचिकित्सा शिबीर यशस्वी केले. या शिबिराचा महाविद्यालयाच्या परिसरातील सुमारे ४७५ व्यक्तींना लाभ झाला आहे. आतापर्यंत अनेक वेळा रक्तदान शिबिरे यशस्वी केली आहेत. राष्ट्रीय सेवा योजनेत विविध उपक्रम पूर्ण केले जातात आणि विद्यार्थ्यांतील समाजसेवाभिमुखता तेवत ठेवली जाते.

**नवीन आव्हाने :**

व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या जीवनात नवीन आव्हाने निर्माण झाली नाहीत तर व्यक्तीची किंवा संस्थेची गुणवत्तेच्या किंवा कौशल्याच्या दृष्टीने कसोटी होत नाही. यंदाच्या वर्षी महाविद्यालयाला काही नव्या प्रश्नांना सामोरे जावे लागले. पुणे विद्यापीठाने सत्र पद्धतीचा अंगीकार केला. त्या पद्धतीला अनुलक्षून काही घनगंभीर समस्या निर्माण झाल्या आहेतच. त्यात यंदाच्या वर्षी सत्र एक आणि सत्र दोन च्या परीक्षा महाविद्यालयाने घ्याव्यात असा निर्णय विद्यापीठाने घेतला. त्यामुळे काही प्रश्न नव्याने निर्माण झाले आहेत. महाविद्यालयात कला, वाणिज्य आणि शास्त्र या तीनही विद्याशाखा आहेत. त्याशिवाय महाविद्यालयाचे कनिष्ठ आणि वरिष्ठ असे दुहेरी स्वरूप आहे. परिणामतः महाविद्यालयात विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यातून काही प्रश्न निर्माण झाले आहेत. ग्रंथालयाला जागा अपुरी पडते तर प्रयोगशाळेवरील ताण वाढला आहे. कार्यालयाचे काम वाढले आहे. प्राचार्य, प्राध्यापक, आजी आणि माजी विद्यार्थी, संस्थेचे हित-चिंतक आणि विचारवंत यांच्यातील वैचारिक आदान प्रदानातून आणि प्रत्यक्ष प्रयत्नातून काही प्रमाणात मार्ग सापडत आहेत. यंदाच नव्या विशाल वास्तूत ग्रंथालयाचा समावेश झाला आहे. विद्यार्थि-प्राध्यापकांचा अभ्यासिकेचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. अन्य प्रश्नही हळू हळू सुटतील असा आमचा आत्मविश्वास आहे. गतिमानता हा आमचा स्थायी भाव आहे. 'धावत्याला शक्ति येई मार्ग अन् सांपडे' हे आमचे ब्रीदवाक्य आहे.

संपादक

## आपले नवे कुलपती

## श्री. ओम प्रकाश मेहरा

राज्यपाल, महाराष्ट्र राज्य

**जन्म :** १९ जानेवारी १९१९

**शिक्षण :** एम्. ए. ( इतिहास–गुणवत्ता यादीत पाचवे ), पंजाब विद्यापीठ

**भारतीय वायुसेनेतील**

**कामगिरी :** भारतीय वायुसेनेत प्रवेश – नोव्हेंबर १९४०
भारतीय वायुसेना प्रतिनिधी
म्हणून ऑस्ट्रेलियात नियुक्ती – १९४६–४७
भारतीय वायुसेना प्रमुख म्हणून नियुक्ती – जानेवारी १९७३
भारतीय वायुसेनेतून सेवानिवृत्ती – मार्च १९७६

**भूषविलेली पदे :** डीन, इन्स्टिटयूट ऑफ आर्मामेंट टेक्नॉलॉजी – ३ वर्षे
प्रेसिडेंट, एअरॉनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया – ३ वर्षे
चेअरमन, हिंदुस्थान एअरॉनॉटिक्स लिमिटेड – २½ वर्षे
राज्यपाल, महाराष्ट्र राज्य } १९८०
कुलपती, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठे } १९८०

**पुरस्कार :** परम विशिष्ट सेवा पदक १९६८
पद्मविभूषण १९७७

* * *

## विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नव्या अध्यक्षा

## डॉ. माधुरीबेन शाह

**जन्म :** १३ डिसेंबर १९१९

**शिक्षण :** बी. ए. ( इंग्रजी व गणित ), सेंट झेवियर महाविद्यालय, १९३८
एम. एड. ( प्रथम श्रेणी, सर्वप्रथम ), मुंबई विद्यापीठ, १९४९
पीएच. डी. ( शिक्षणशास्त्र ), मुंबई विद्यापीठ, १९५२
पीएच. डी. ( शिक्षणशास्त्र ), लंडन विद्यापीठ, १९५४

**अध्यापन :** न्यू ईरा हायस्कूल, मुंबई, १९३९
गव्हर्नमेंट सेकंडरी स्कूल, अहमदाबाद, १९४०–४४
एस. टी. कॉलेज, मुंबई, १९४४–५०
इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, मुंबई, १९५०–५५
फुलब्राइट फेलोशिप अन्वये कोलंबिया विद्यापीठ व स्टँडफोर्ड विद्यापीठ येथे व्हिजिटिंग प्रोफेसर, १९६०

**भूषविलेली पदे :** शिक्षणाधिकारी, मुंबई महानगरपालिका, १९६१ पासून
कुलगुरु, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, १९७५–८१
अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, १९८१

# वज्राघात

प्राचार्य न. गो. ऊर्फ नानासाहेब सुरू ( मृत्यू २८।८।१९८० ) आणि श्री. वि. त्र्यं. ताटके ( मृत्यू १६।१२।८० ) या दोघांचे १९८० मधील मृत्यू म्हणजे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीवर मोठाच आघात होय. विशेषतः मॉडर्न कॉलेजला हा आघात विशेषच जाणवण्यासारखा आहे. कारण मॉडर्न कॉलेजच्या संस्थापनेचे दोन आघाडीचे सूत्रधार त्यांच्या मृत्यूमुळे आमच्यातून निघून गेले आहेत. हे दुःख अपार आणि असाधारण आहे.





प्राचार्य नानासाहेब सुरू म्हणजे मूर्तिमंत सौजन्य. संस्कृत-प्राकृत—अर्धमागधीचे एक रसिक प्राध्यापक म्हणून त्यांची कारकीर्द जितकी संस्मरणीय आहे तितकीच मॉडर्न एज्युकेशन सोसायटीमधील एक कर्तबगार प्रशासक म्हणून त्याची ख्याती आहे. शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या दीर्घकालीन अनुभवांमुळे आणि त्यांच्या सहृदय वृत्तीमुळे प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या कार्यकारिणीचे अध्यक्ष म्हणून मॉडर्न कॉलेजची त्यांनी स्थापनेपासूनच पितृतुल्य जिव्हाळ्याने जोपासना केली. ऋजुता, सभ्यता आणि शिष्टाचार यांची ते साक्षात मूर्तीच असल्याने त्यांनी उपजत शहाणपणाने (wisdom) आणि सौजन्याने अनेक बिकट प्रसंगी संस्थेचे सुकाणू दृढपणे सांभाळले आणि संस्थेला कसल्याही वादळवाऱ्याची झळ पोचू दिली नाही.

श्री. वि. त्र्यं. ताटके म्हणजे मूर्तिमंत उत्साह आणि कर्तृत्वापोटी आलेली असाधारण कर्तबगारी. मॉडर्न कॉलेजची निर्मिती हे त्यांच्या कर्तबगारीचे आणि जिद्दीचे फळ होय. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीस ते सुरूवातीपासूनच सेक्रेटरी म्हणून येऊन मिळाले आणि १९७५ मध्ये सेवानिवृत्त होईपर्यंत ते या पदावर अविच्छिन्न राहिले. कै. शंकरराव कानिटकरांनी उजाड खडकावर मॉडर्न हायस्कूलचा पाया घालून पुण्याच्या शिक्षणक्षेत्रात जी एक अभूतपूर्व क्रांती केली, तिच्या पाठबळावर ताटके यांनी शंकररावांच्या नंतर मॉडर्न हायस्कूलची कीर्ती गगनावेरी नेली. आपल्या आयुष्याचा प्रत्येक क्षण ते शिक्षक म्हणून जगले आणि जिद्दी प्रो. एज्यु. सोसायटीची अनंत हस्ताने समृद्धी आणि संवर्धन करण्यात त्यांनी आपली हयात वेचली. मॉडर्न कॉलेजची उभारणी करताना श्री. ताटके यांनी जातीने त्याच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष पुरविले आणि कॉलेजला सुरूवातीच्या दिवसांतच भक्कम आर्थिक आणि शैक्षणिक बैठक प्राप्त करून दिली. त्यांच्या वागण्याबोलण्यात त्यांच्या कर्तबगारीची निदर्शक अशी एक ऐट होती. आणि त्यांच्या ध्येयवादित्वामुळे आणि उत्कट तळमळीमुळे ती त्यांना अतिशय शोभून दिसत असे. शिक्षकाच्या जीवनात येणारे सारे सन्मान त्यांच्या कर्तबगारीतच त्यांना प्राप्त झाले.


प्रोग्रेसिव्ह एज्यु. सोसायटी ही शिक्षकांनी स्थापन केलेली आणि शिक्षकांनी स्वार्थत्यागाने रूजविलेली पुण्याची एक गौरवास्पद संस्था होय. तिच्यातील दोन आदर्श शिक्षक यंदाच्या वर्षी निखळून पडले. संस्थेला आपले छत्र गेल्याचे, आधार हरपल्याचे प्रकर्षाने जाणवले.

त्यांच्या ध्येयवादित्वाची आणि कर्तबगारीची जपणूक करीत मॉडर्न कॉलेज त्यांच्याबद्दलची कृतज्ञता उरी बाळगून निष्ठेने वाटचाल करीत राहील यात शंका नाही.

त्यांच्या प्रेरक स्मृतीस आमची ही कृतज्ञ श्रद्धांजली.

**भीमराव कुलकर्णी**


# क्रीडा–संघटना



उभे — श्री. पवार, कु. घाटे, श्री. गंभीर, श्री. जाधव, श्री. चव्हाण, श्री. विचारे, श्री. साळुंके, श्री. बडवे, श्री. देशपांडे, श्री. बवसे, श्री. सपकाळ, श्री. जाधव.

बसलेले—सौ. नवाथे, सौ. लिमये, श्री छाब्रा, प्रा. पाथरे, प्रा. कुलकर्णी, प्राचार्य गंभीर, उपप्राचार्य दातार, प्रा. गोसावी, प्रा. बनसोडे, प्रा. लागू, कु. भापसे.


# कला–मंडळ



उभे — (१) सर्वश्री जाधव, पाटील, अवच्चट्टी, लोंढे, खान, प्रधान, सातव, केदारी, पारुळे, पवार.
(२) सर्वश्री पर्वते, खांदवे, मोरे, ओसवाल, कणसे, मालशे, झेंडे, पाठक, जावळे, दळवी.


बसलेले—सर्वश्री, प्रा. आर. व्ही. कुलकर्णी, प्रा. गंधे, प्रा. एम्. ए. कुलकर्णी, टिकेकर (विद्यापीठ प्रतिनिधी), प्राचार्य गंभीर, उपप्राचार्य दातार, प्रा. वि. भा. देशपांडे, प्रा. सुमंत, प्रा. पुंडे.

# राष्ट्रीय सेवा योजना संघनायक



उभे — कु. माळी, श्री. केसकर, श्री. बेके, श्री. चिचकर.
बसलेले— प्रा. गोखले, प्रा. कुलकर्णी, प्राचार्य गंभीर, उपप्राचार्य दातार, प्रा. गोसावी.

# संघनायक




उभे — (१) सर्वश्री नेर्लेकर, कुंटे, खैनार, गायधनी, जावळे, चौधरी, तिळगुळकर, संत, अवचेट्टी.
(२) कु. गाडगीळ, फर्नांडीस, काटकर, दातार, नागदेचा, कणसे, घाटणे, घाटे.
बसलेले— वि. बोडस, प्रा. हिंगे, संचालक लागू, प्राचार्य स. य. गंभीर,
उपप्राचार्य दातार, प्रा. छाब्रा, श्री. विसावे.

## वरिष्ठ महाविद्यालय : सतत सात वर्षे अजिंक्य व्हॉलीबॉल संघ



वरील रांग : डावीकडून रेखा पाटील, प्रतिभा खांडगे, राजेंद्र पिसाळ, शुभांगी कुलकर्णी.
मधली रांग : कृपा सोमण, प्रा. पाथरे, प्रा. लागू, अनिता पठारे.
पुढील रांग : निशा कुलकर्णी, सुजाता गांधी.

## आंतरमहाविद्यालयीन (पुणे विभाग) बॅडमिंटन् उपविजेता संघ (मुले)




उभे — सपकाळ पी. ए., कदम एन्. एम्.
बसलेले — बडवे एम्. आर्., प्रा. लागू, के. एस्. जोगळेकर उमेश, बोधे राजू (संघनायक).

## सर्वोत्कृष्ट विद्यार्थी



बीना कदम

## अखिल भारतीय छात्रसेना हॉकी ट्रॉफी




राहूल बजाज

## – राष्ट्रीय शालेय पातळीवरील संघ –



बसलेले – डावीकडून : श्री. हिंगे, प्रा. बनसुडे, प्रा. चिरपुटकर (उपप्राचार्य), श्री. छाब्रा.
उभे – डावीकडून : श्री. देशपांडे, कु. दीक्षित, श्री. खळदकर.

मॉडर्न श्री : शेख मोईनुद्दीन



आंतरमहाविद्यालयीन 'रोमन रिंग्ज'
प्रथम क्रमांक : श्री. शिंदे



## शालेय बास्केट बॉल – उपविजेता संघ [ मुले ]



बसलेले – डावीकडून : श्री. हिंगे, प्रा. बनसुडे, प्रा. चिरपुटकर (उपप्राचार्य), श्री. छात्रा, श्री. देशपांडे.
उभे – डावीकडून : श्री. नगरकर, श्री. खळदकर, श्री. टिल्लू, श्री. टंकसाळे, श्री. मराठे, श्री. करमरकर.

## — शालेय जलतरण —



बसलेले — डावीकडून : श्री. हिंगे, प्रा. बनसुडे, प्रा. चिरपुटकर (उपप्राचार्य), श्री. छाब्रा, श्री. लोहाडे.
उभे — डावीकडून : श्री. टंकसाळे, कु. केळवदकर, कु. दिवेकर, श्री. माटे.

## अ भि नं द न

पीएच्. डी. पदवी

साहित्य संस्कृती मंडळावर निवड



डॉ. द. दि. पुंडे



डॉ. सुषमा जोग



सौ. निर्मला मोने

एम्. फिल्. पदवी

एम्. कॉम्. परीक्षेतील सुयश



प्रा. यशवंत सुमंत




सौ. एस्. ए. नाडगीर



कु. संजीवनी हसबनीस

# शैक्षणिक गुणवत्ता

## बी. कॉम्. परीक्षा



यशवंत पटेल



वंदना मंगरूळकर

## बी. ए. परीक्षा



अंजली वाबळे



वैजयंती अनगळ



निवृत्ती दांगट

## बी. एस्सी. परीक्षा



योगेश्वर बोडस



रश्मी करंदीकर

## प्रथम वर्ष बी. ए. परीक्षा



शोभा चावरे



सीमा कुलकर्णी

## उच्च माध्य. परीक्षा



रेखा रामचंद्रे

# उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा



संजय चिटणीस



सुलभा मिरजी



कीर्ती निंबाळकर



सविता संत



शीला देसाई

राज्यपालांच्या पत्नी सौ. मेहेरा यांच्या हस्ते छत्रपती पुरस्कार स्वीकारतांना
कु. सुनीता देशपांडे



शालेय व्हॉलीबॉल उपविजेता संघ [ मुली ]



बसलेले – डावीकडून : श्री. हिंगे, प्रा. बनसुडे, प्रा. चिरपुटकर ( उपप्राचार्य ), श्री. छाब्रा, कु दीक्षित.
उभे – डावीकडून : कु. सरोदे, कु. दीक्षित, कु पवार, कु. शेट्टीया, कु. लोहोकरे.

# जिम्नॅस्टिक्स



श्री. घाडगे, श्री. बेडेकर, श्री. दळवी, श्री. छाब्रा, श्री. शिंदे. श्री. भागवत.

## राष्ट्रीय छात्र सेना

## क्रीडा-नैपुण्य

प्रजासत्ताक दिन संचलन

पॅरा जम्प

आंतरमहाविद्यालयीन
जलतरण ब्रेस्ट स्ट्रोक




अल्पना ताटके



आर्. बी. जाधव



ए. जी. दळवी



यशोधन बाळ

राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती

राणी लक्ष्मीबाई पारितोषिक
खोखो

राष्ट्रीय क्रीडापटू : खोखो



अतुल वाकणकर



संगीता ताटके



निशा अंबिके



मिथिला जवडे

# जान जाए पर पेन्शन न आए।

रूपांतर – वीणा कोटकर

द्वि. व. कला

**पात्र परिचय**

धर्मराज : यमदूतों का राजा
नारद : नारद मुनि
चित्रगुप्त : धर्मराज के दरबार का अधीक्षक
पत्नी : भोलाराम की पत्नी
अफसर : भोलाराम की पेन्शन मंजूर करनेवाला
यमदूत : धर्मराज का दूत
अन्य : भोलाराम की लडकी
: दो यमदूत
: बाबू
: चपरासी

**पहला दृश्य**

[ स्थान : धर्मराज का दरबार । ]

[ दो दूत आपस में बातचीत कर रहे हैं। दरबार में चित्रगुप्त बहुत बेचैन लग रहे हैं। कुछ ढूँढते हैं। रजिस्टर आदि बार-बार पलटते हैं। ]

एक दूत : कुछ सुना तुमने ?

दूसरा दूत : नहीं तो।

एक : सुना है पृथ्वी पर का एक जीव अभीतक दरबार में उपस्थित नहीं किया गया है। देखो तो चित्रगुप्त कैसे बेचैन हैं।

दूसरा : ऐसा हो ही नहीं सकता।

एक : एक जीव लापता है।

[ दरबार की कार्यवाहीपर चित्रगुप्त की ओर देखते हुए हँसता है। ]

दूसरा : ऐसा कभी नहीं हुआ था।

[ धर्मराज पधारने की ललकार सुनाई पडती हैं। धर्मराज का प्रवेश। पौराणिक वेश। पौराणिक भयावह व्यक्तित्व। ]

धर्मराज : [ आश्चर्य और क्रोध से। ] चित्रगुप्त।

चित्रगुप्त : जी सरकार !

[ सामने बैठे चित्रगुप्त बार-बार चश्मा पोंछ, बार-बार थूक से पन्ने पलट, रजिस्टर देख रहे हैं। बीच में ही रुककर धर्मराज को अभिवादन करते हैं। अपराधी की भाँति खडे रहते हैं। ]

धर्मराज : क्या यह सही है कि भोलाराम का जीव पृथ्वी-पर से अभी तक लाया नहीं गया है ?

चित्रगुप्त : [ काँपते हुए। ] हाँ सरकार !

धर्मराज : हाँ सरकार ! शरम नहीं आती कहते हुए। सिर्फ हाँ सरकार कहने के लिए खडे हो। पृथ्वी पर से आए हुए अधीक्षकों के साथ तुम्हारे सम्बन्ध बढ रहे हैं। इसलिए हाँ सरकार की तुम्हें आदत लग गयी है। कुछ पता क्यों नहीं लगाया ?

चित्रगुप्त : वही तो कर रहा हूँ सरकार।

धर्मराज : क्या खाक कर रहे हो।

चित्रगुप्त : [ चित्रगुप्त फिर रजिस्टर देखते हैं। थोडी देर के बाद खीझकर रजिस्टर इतने जोरों से बंद करते हैं कि मक्खी चपेट में आ जाती है। मक्खी को निकालते हुए– ]
महाराज। रिकार्ड सब ठीक है। भोलाराम के जीव ने पाँच दिन पहले देह त्यागी और यमदूत के साथ इस लोक के लिए रवाना भी हुआ। पर यहाँ अभी तक नहीं पहुँचा।

धर्मराज : और वह दूत कहाँ है ?

चित्रगुप्त : महाराज। वह भी लापता है।

धर्मराज : उसे भी आदत हो गयी है कि बार बार पृथ्वीपर जाकर 'जिधर गये उधर के हो गये।'

[ इतने में एक यमदूत बडा बदहवास सा प्रवेश करता है। उसका मौलिक कुरूप चेहरा परिश्रम, परेशानी और भय के कारण और भी विकृत है। ]

अरे। तू कहाँ रहा इतने दिन ! [ चिल्लाकर ] भोलाराम का जीव कहाँ है ?

यमदूत : [ हाथ जोडकर ] – दयानिधान, मैं कैसे बताऊँ कि क्या हो गया। आज तक मैंने धोखा नहीं खाया था। पर इसबार भोलाराम का जीव मुझे चकमा दे गया। पाँच दिन पहले अब जीव ने भोलाराम की देह को त्यागा, तब मैंने उसे पकडा और इस लोक की यात्रा आरम्भ की। नगर के बाहर ज्यों ही मैं उसे लेकर एक तीव्र वायु-तरंग पर सवार हुआ त्योंही वह मेरी चंगुल से छूटकर न जाने कहाँ गायब हो गया। इन पाँच

दिनों में मैंने सारा ब्रह्माण्ड छान डाला, पर उसका कहीं पता न चला।

धर्मराज : [ क्रोध से ] मूर्ख, जीवों को लाते-लाते बूढा हो गया, फिर भी एक मामूली बूढे आदमी के जीव ने तुझे चकमा दे दिया।

दूत : [ सिर झुकाकर ] महाराज, मेरी सावधानी में बिलकुल कसर नहीं थी। मेरे इन अभ्यस्त हाथों से अच्छे-अच्छे वकील भी नहीं छूट सके, पर इस बार तो कोई इन्द्रजाल ही हो गया।

चित्रगुप्त : महाराज, आजकल पृथ्वीपर इसका व्यापार बहुत चला है। लोग दोस्तों को फल भेजते हैं और वे रास्ते में ही रेल्वे वाले उडा लेते हैं। होजरी के पार्सलों के मोजे रेलवे आफिसर पहिनते हैं मालगाडी के डब्बे के डब्बे रास्ते में कट जाते हैं। एक बात और हो रही है। राजनैतिक दलों के नेता विरोधी नेता को उडाकर कहीं बन्द कर देते हैं। कहीं भोलाराम के जीव को भी तो किसी विरोधी ने, मरने के बाद, खराबी करने के लिए नहीं उडा लिया?

धर्मराज : [ व्यंग से ] तुम्हारी भी रिटायर होने की उम्र आ गयी। भला, भोलाराम जैसे नगण्य दीन आदमी से किसी को क्या लेना-देना?

[नारद मुनि प्रवेश करते हैं। नारायण···नारायण···]

नारद : क्यों धर्मराज, कैसे चिंतित बैठे हैं? क्या नरक में निवासस्थान की समस्या अभी हल नहीं हुई?

धर्मराज : वह समस्या तो कभी की हल हो गई। नरक में पिछले सालों में बडे गुणी कारीगर आ गए हैं। कई इमारतों के ठेकेदार हैं, जिन्होंने पूरे पैसे लेकर रद्दी इमारतें बनवाई। बडे-बडे इंजीनियर भी आ गए हैं, जिन्होंने ठेकेदारों से मिलकर भारत सरकार की पंचवर्षीय योजनाओं का पैसा खाया। ओवरसीयर हैं, जिन्होंने उन मजदूरों की हाजिरी भरकर पैसा हडपा, जो कभी काम पर गए ही नहीं। उन्होंने नरक में बहुत जल्दी कई इमारतें तान ही हैं। वह समस्या तो हल हो गई। पर एक बडी बिकट उलझन आ गई है। भोलाराम नाम के एक आदमी की पाँच दिन पहले मृत्यु हुई। उसके जीव को यमदूत यहाँ ला रहा था, कि जीव इसे रास्ते में चकमा देकर भाग गया। इसने सारा ब्रह्माण्ड छान डाला, पर वह कहीं नहीं मिला। अगर ऐसा होने लगा, तो पाप-पुण्य का भेद ही मिट जाएगा।

नारद : उसपर इनकमटॅक्स तो बकाया नहीं था? हो सकता है, उन लोगोंने रोक लिया हो।

चित्रगुप्त : इनकम होती तो टॅक्स होता। भुखमरा था।

नारद : मामला बडा दिलचस्प है! अच्छा मुझे उसका नाम, पता तो बतलाओ। मैं पृथ्वी पर जाता हूँ।

चित्रगुप्त : [ रजिस्टर देखकर ] भोलाराम नाम था उसका। जबलपूर शहर में घमापुर मुहल्ले में नाले के किनारे एक डेढ कमरे के टूटे-फूटे मकान में वह परिवार-समेत रहता था। उसकी एक स्त्री थी दो लडके और लडकी। उम्र लगभग ६० वर्ष। सरकारी नौकर था। पाँच साल पहले रिटायर हो गया, मकान का किराया उसने एक साल से दिया नहीं था, इसलिए मकान-मालिक उसे निकालना चाहता था। इतने में भोलाराम ने संसार ही छोड दिया। आज पाँचवा दिन हैं। बहुत संभव है कि, अगर मकान-मालिक वास्तविक मकान-मालिक है, तो उसने भोलाराम के मरते ही उसके परिवार को निकाल दिया होगा। इसलिए आपको परिवार की तलाश में काफी घूमना पडेगा।

## दूसरा दृश्य

स्थान : भोलारम का घर।

[ नारद मुनि नारायण नारायण करते वहाँ पहुँचते है।

नारद : नारायण···नारायण···

लडकी : आगे जाओ महाराज।

नारद : मुझे भिक्षा नहीं चाहिये। मुझे भोलाराम के बारे में कुछ पूछ-ताछ करनी है। अपनी माँ को जरा बाहर भेजो बेटी।

[ भोलाराम की पत्नी प्रवेश करती है। ]

माता, भोलाराम को क्या बीमारी थी?

पत्नी : क्या बताऊँ? गरिबी की बीमारी थी। पाँच साल हो गए पेन्शन पर बैठे थें, पर पेन्शन अभी तक नहीं मिली। हर १०-१५ दिन में एक दरखास्त देते थे, पर वहाँ से था तो जवाब ही नहीं आता था और आता तो यही कि तुम्हारी पेन्शन के मामले पर विचार हो रहा है। इन पाँच सालों में सब गहने बेच कर हम लोग खा गए। फिर बर्तन अब कुछ नहीं बचा था। फाके होने लगे थे। चिंता में घुलते घुलते और भूखे मरते-मरते उन्होंने दम तोड दिया।

नारद : क्या करोगी माँ? उनकी इतनी ही उम्र थी...

पत्नी : ऐसा मत कहो, महाराज। उम्र तो बहुत थी।

५०–६० रुपया महिना पेन्शन मिलती तो कुछ और काम कहीं करके गुजारा हो जाता। पर क्या करें? पाँच साल नौकरी से बैठे हो गए और अभी तक एक कौडी नहीं मिली।

नारद : माँ, यह तो बताओ कि यहाँ किसी से क्या उनका विशेष प्रेम था, जिसमें उनका जी लगा हो?

पत्नी : लगाव तो महाराज, बाल बच्चों से ही होता है...

नारद : नहीं, परिवार के बाहर भी हो सकता है। मेरा मतलब है, कोई स्त्री...

पत्नी : ( गुर्राकर ) बको मत महाराज। साधु हो, कोई लुच्चे–लफंगे नहीं हो। जिंदगी-भर उन्हों ने किसी दूसरी स्त्री को आँख उठाकर नहीं देखा।

नारद : ( हँसकर ) हाँ। तुम्हारा यह सोचना ठीक ही है। यही भ्रम अच्छी गृहस्थी का आधार है। अच्छा माता, मैं चला।

पत्नी : महाराज, आप तो साधु हैं, सिद्ध पुरुष हैं। कुछ ऐसा नहीं कर सकते कि उनकी रूकी हुई पेन्शन मिल जाएँ? इन बच्चों का पेट कुछ दिन भर जाए?

नारद : [ दया से ] साधुओं की बात कौन मानता है? मेरा यहाँ कोई मठ तो है नहीं। फिर भी मैं सरकारी दफ्तर में जाऊँगा और कोशिश करूँगा।

## तिसरा दृश्य

[ स्थान : पेन्शन का सरकारी दफ्तर। ]

नारद : भोलाराम ने जो दरखास्तें भेजी थी, उसका क्या हुआ?

बाबू : भोलारामने दरखास्तें भेजी थीं, पर उनपर वजन नहीं रखा था इसलिए कहीं उड गई होंगी।

नारद : भई, ये बहुत से पेपर वेट तो रखे हैं, इन्हें क्यों नहीं रख दिया?

बाबू : ( हँसकर ) आप साधु हैं, आपको दुनियादारी समझ में नहीं आती। दरखास्तें पेपरवेट से नहीं दबतीं। खैर...आप उनसे मिलिए उधर जो अफसर बैठे हैं। उन्हें खुश कर लिया तो काम हो जाएगा।

( नारद अफसर के पास पहुँचते हैं। )

अफसर : ( नाराज होकर ) इसे कोई मंदिर–वंदिर समझ लिया है क्या? धडधडाते चले आये। चिट क्यों नहीं भेजी?

नारद : कैसे भेजता? चपसारी सो रहा है।

अफसर : क्या काम है?

[ नारद भोलाराम का केस बतलाते हैं। ]

अफसर : आप हैं बैरागी। दफ्तरों के रीति रिवाज नहीं जानते। असल में भोलाराम ने गलती की। भई यह भी एक मंदिर है। यहाँ भी दान-पुण्य करना पडता है, भेंट चढानी पडती है। आप भोलाराम के आत्मीय मालूम होते हैं। भोलाराम की दरखास्तें उड रही हैं। उनपर वजन रखिए।

[ नारद आश्चर्य से देखते हैं। जैसे कोई बडी समस्या खडी हो गई हो ]

भई, सरकारी पैसे का मामला है। पेन्शन का केस सौ दफ्तरों में जाता है। देर लग ही जाती है। हजारों बार एक ही बात को हजार जगह लिखना पडता है, तब पक्की होती है। जितनी पेन्शन मिलती है, उतनी कीमत की स्टेशनरी लग जाती है। हाँ, जल्दी भी हो सकती है, मगर... [ साहब रुकते हैं। ]

नारद : मगर क्या?

अफसर : ( कुटिल मुसकान के साथ ) मगर वजन चाहिए। आप समझे नहीं। जैसे आपकी यह सुंदर वीणा है, इसका भी वजन भोलाराम की दरखास्त पर रखा जा सकता है। मेरी लडकी गाना-बजाना सीखती है। यह मैं उसे दे दूँगा। साधु-सन्तों की वीणा से तो अच्छे स्वर निकलते हैं। लडकी जल्दी संगीत सीख गई तो उसकी शादी हो जाएगी।

नारद : [ घबराकर, फिर संभालकर...वीणा टेबल पर रखते हैं ] यह लीजिए। अब जरा जल्दी उसकी पेन्शन का ऑर्डर निकाल दीजिए।

अफसर : ( प्रसन्नता से नारद को बैठने के लिए कहते हैं। वीणा को एक कोने में रखते हैं। घंटी बजाते हैं। ]

[ चपरासी प्रवेश करता है। ]

अफसर : बडे बाबू से भोलारास के केस की फाइल लाओ।

[ थोडी देर बाद चपरासी भोलाराम के केस की मोटी सी फाइल लाता है। ]

[ अफसर फाइल पर नाम देखते हैं। निश्चित करनेके लिए नारद से पूछते हैं ]

अफसर : क्या नाम बताया साधुजी आपने?

नारद : ( उँचा सुनाते हैं। ] भोलाराम।

[ फाइल से ( आकाशभासित ) " कौन पुकार रहा है

मुझे ? पोस्टमैन है क्या ? पेन्शन का ऑर्डर आ गया ? आवाज सुनते ही अफसर डरकर कुर्सी से लुढक जाते हैं। नारद भी चौंक जाते हैं। तुरन्त समझकर बोलते हैं।]

भोलाराम, क्या तुम भोलाराम के जीव हो ?

आवाज : [ भोलारामकी ] ' हाँ ! '

नारद : मैं नारद हूँ। मैं तुम्हें लेने आया हूँ। चलो, स्वर्ग में तुम्हारा इंतजार हो रहा है।

आवाज : ( भोलारामकी ) मुझे नहीं आना है। मैं तो पेन्शन की दरखास्तों में अटका हूँ। वहीं मेरा मन लगा है। मैं अपने दरखास्तों को छोडकर नहीं जा सकता।

( परदा गिरता है। )

[ ध्यातव्य–हरिशंकर परसाई की कहानी ' भोलाराम का जीव ' का यह एकांकी रूपांतर है। ]

## ए भाय !

ए भाय !
जरा सोच के चलो।
यह जीवन एक चक्कर है।
नौकरी न मिलने से डरता है क्यों ?
एम्प्लॉयमेन्ट-कार्ड के लिए रुकता है क्यों ?
' पहचान ' नहीं इसलिए यहाँ
सर्व्हिस से भी डरना पडता है !
सर्व्हिस में...
नौकर जो भूत है
नौकर जो पैसा हे
नौकर जो किस्मत है
तरह तरह के नाच यहाँ
दिखाने पडते हैं।
ए भाय !
जरा सोचके चलो।
यह जीवन एक चक्कर है।
व्यापार करने से दूर हटता है क्यों ?
' पूँजी ' नहीं तो पीछे हटता है क्यों ?
व्यापार में...
व्यापार जो सौदा है
व्यापार जो पैसा ही पैसा है
व्यापार जो सीना-जोरी है
' उम्मीदवारों ' की ' उम्मीद ' है
नेता, ग्राहक, नोकर जिस के आगे
नाच ही नाच, नाचते रहते हैं।
ए भाय !
जरा सोचके चलो।
यह जीवन एक चक्कर है।
यह जीवन एक कॉलेज है
कुछ घण्टों के पिरिएडों का
' पहला घण्टा ' सुनने का।
दूसरा घण्टा सवाल ही सवालों का
तीस घण्टा चक्कर काटने का
चौथा घण्टा खाली ( ऑफ ) हे
क्या करें ? क्या न करें का।
पछताने का।
फिर कुछ भी नहीं रहता है
जो भी कुछ रहता है
भारी-भारी बैंचें
उस पर बैठीं यादें
भुलाने से भुलती नहीं
जीवन एक चक्करदार चक्कर है
पूरी यादों, अधूरे इरादों में
टूटे सपनों के चक्कर काटने का।

—जयश्री गोळे. द्वि. व. कला

# भुलक्कड हॉफमन

**शेख महजबीन**

बारहवीं शास्त्र

श्रीमान हॉफमन सुबह जल्दी घर छोड रहे थे, क्योंकि उनको बडे तडके ट्रेन पकडनी थी। इतने में उनकी पत्नी ने उनके हाथ में खत देते हुये कहा, " खत डाक घर में डालने मत भूलना ताकि मौसी ईदा कल घर पर आ सके। इस खत को आप ऑफिस पहुँचने से पहलही पोस्ट कीजिये, क्योंकि यह खत बहुतही जरूरी है। "

श्रीमान हॉफमन स्टेशन पहुँचे-उन्होंने ट्रेन पकडी और वे ठीक वक्तपर ऑफिस पहुँचे। अभी भी उनके पत्नीने दिया हुआ खत उनकी जेब में पडा हुआ था और श्रीमानजी खत पोस्ट करना भूल गये थे।

ऑफिस छूटने के बाद हॉफमन जी सीधे स्टेशन पहुँचे। तब एक अनजान आदमी ने कंधा हिलाकर उनसे कहा, " आप ने खत पोस्ट किया है या नहीं ? " हमारे श्रीमानजी को अभी याद आया और वे खत पोस्ट करने जा रहे थे कि एक अपरिचित महाशय ने चिल्लाकर उन से कहा, " खत डाकघर में डालना मत भूलना। "

जब हमारे महाशय खत पोस्ट करके स्टेशन पहुँचे तब एक महिला ने हँसकर पूछा, " क्या आप ने खत डाल दिया है ? " यह सुनकर हॉफमन महाशय को बहुत आश्चर्य हुआ और उन्होंने उस महिला से कहा, " भगवान की लीला देखो, सब लोगों को इसका पता कैसे चला की मुझे खत डालना है ! मुझे तो खत पोस्ट किये काफी वक्त गुजर गया है। " तब उस महिलाने मुस्करा कर कहा, " आप की कोट पर लगी हुई चिठ्ठी पर लिखा हुआ है की " कृपया मेरे पती को खत डालने की याद करा दीजिए, धन्यवाद ! "

( जर्मन लोककथा पर आधारित )

## हरे-राम, हरे-कृष्ण

चार दीवारों, रंगीन नजारों में ' जो ' है बैठा,<br>
' उसे ' खुश करने, आदमी शोषण करने पर ऐंठा।<br>
' उस ' तक पहुँचने की सीढी, दुःखी-पीडितों की सेवा।<br>
आदमी अगर यह जानता तो क्यों ' नाचता ', ' खाता ' मेवा ?<br>
जिधर नहीं, उधर भागना यह तो है मृग-तृष्णा।<br>
तू इतना समझता तो क्यों कहता हरे-राम, हरे-कृष्णा ?

**वर्मा जगदीश**, ग्यारहवीं विज्ञान

## गरीबी

मैंने देखा जिसके बोझ तले ' भारतीयता ' दबी आँसू बहा रही है।<br>
मैंने चाहा कि मैं उसे वहाँ से हटा दूँ<br>
कोठरीवालों को नोच लूँगा, कुटीरवालों को हँसा दूँगा।<br>
यों विचारों में खोया मैं चला जा रहा हूँ<br>
पल-पल, घडी-घडी जीवन में मैं ही ठोकर खा रहा हूँ।<br>
वही है, वही है जीवन में मेरे भी, वही है।<br>
क्यों कि वह शोषितों की निजी अमानत रही है।

**संजयकुमार भारद्वाज**, ग्यारहवीं विज्ञान

## माने या न माने

आधुनिक जीवन के कारखाने का
यन्त्र बनते जा रहा हूँ।
कितनी बार रिपेअर कराया
उलझने सुल्झी ही नहीं
बुढापे की किर-किर, किर-किर को
बन्द न कर सका
पढा-लिखा हुआ तो क्या हुआ ?
आखिर पुर्जे, पुर्जे ही रहे
तन, मन, मस्तिष्क का असहयोग
और सहयोग के संयोग की
या संपूर्ण वियोग की राह देख
प्रकृति का नियन्त्रण
माना मन, मानी नहीं बुद्धि
ऋद्धि तो हुई, हुई नहीं सिद्धि.

**कु. संजीवनी खाडिलकर**, ग्यारहवीं, कला

## जीवन राही

दुनिया की राहों, इरादों पर चलते रह दीवाने।
राह के अन्ततक चले चल
कभी न मुडना पीछे
हमेशा ही रहते आए हैं
अधूरे अरमान, इरादें
चलते चलते तीर लगेंगे, घायल होंगे सपने।
हाथ में बंधी यादों की
जंजीर कभी न टूटेगी
राहगीर ! यह है एक जलवाँ
किस्मत के हाथ है चाभी
हार का हार ही यहाँ पिन्हाना पडता है अनजाने।

**जयेश शाह**, ग्यारहवीं, वाणिज्य

## अधखिला

एक कली
डाल पर डोली
मेरा मन
बोला प्यार की बोली
किन्तु
वह खिली
खिलती ही गयी
दुनिया डोली
मैं भी डोलूँ ?
नहीं...
फिर...!
मैं मन ही मन
अनमन
आगे क्या ?
कौन जाने !
भूल जाऊँ ?
सपने अधूरे रहेंगे
तोड डालूँ ?
सपने टूट जाएँगे
मन दे दूँ ?
किन्तु...
प्रतिक्रिया का परिणाम !
मैं क्या जानूँ ?

**सुनिल पवार**, द्वि. व. कला

# अरे संसार संसार

**शिरीषकुमार सोनवणे**
प्रथम वर्ष, कला

प्राजक्ताची कळी उमलली की ती सुगंधाचेच निःश्वास बाहेर टाकू लागते. कोकिळेने तोंड उघडले की त्यादून संगीतच बाहेर पडू लागते. त्याचप्रमाणे खरा प्रतिभावान बोलू लागला की त्याच्या तोंडून आपोआप काव्यच बाहेर पडते. बहिणाबाई चौधरी ह्या अशाच प्रतिभावान कवयित्री होत.

बहिणाबाईच्या जन्माला १९८० च्या नागपंचमीला शंभर वर्षे पूर्ण झाली. या शंभर वर्षात महाराष्ट्रात अनेक कवी, महाकवी गाजून गेले. पण बहिणाबाईची गोष्टच न्यारी. बहिणाबाईनी ज्या कविता केल्या, त्या लिहायच्या म्हणून नव्हे तर आपोआप प्रकट झालेल्या आहेत.

बहिणाबाईना कविता कोणी शिकविल्या नाहीत तुम्हाला कविता रचायला कोण शिकविते, या प्रश्नाला त्यांनी कवितेतच दिलेले उत्तर फारच समर्पक वाटते...

माझी माय सरसोती
माते शिकवीते बोली
लेक बहिणाच्या मनी
किती गुपितं पेरली
धर्तीमधल्या रसान
जीभ माझी सवाहते
तव्हा तोंडातली चव
पिंडामधी ठाय घेते

तोंडातल्या चवीने पिंडात ठाव घेतला नाही तर त्या कवीचा उपयोग काय ?

रोजचे घरातले आणि शेतातले काम करता करता त्यांनी गाणी रचली. त्यातली थोडीशी कोणीतरी टिपून घेतली तर बरीचशी त्यांच्या बरोबरच गेली. अशी ही एक अशिक्षित आणि कष्टाळू स्त्री जात्यावर दळता-दळता किंवा चूल फुंकता फुंकता-

माय भिमाई माऊली
जशी आंब्याची साऊली

किंवा

माहेराची वाट
माते वाटे मखमल

असले जिवंत काव्य श्वास टाकावा इतके सहज कशी काय करू शकते ! बहिणाईच्या प्रतिभेची जातच मोठी निराळी आहे.

उन वाऱ्याची खेयता
एका एका कोंबादून
प्रकटले दोन पान
जसे हात जोडीसन

अशा नैसर्गिक वर्णनापासून तर...

लपे करमाची रेखा
माझ्या कुंकवाच्या खाली
पुसूनिया गेलं कुंकू
रेखा उघडी पडली

असे वैधव्याचे हृदयभेदक वर्णन त्यांच्या मुखादून बाहेर पडले आहे.

बहिणाबाई सकाळी उठून जात्यावर दळायला बसत. एका बाजूला जात्याचा आवाज सुरू होई आणि एका बाजूला बहिणाबाईच्या तोंडातून काव्य जात्यातल्या पिठा-सारखे सांडू लागते-

अरे घरोटा घरोटा
तुझ्यादून पडे पिठी
तसं तसं माझं गाणं
पोटादून हेत व्होटी

नंतर स्वंयपाक घरात जाऊन, चूल पेटवायला लागायच्या चूल पेटली नाही की त्या संतापून चुलीवर आपला राग काव्यातून काढत-

पेट पेट धुक्कयेला
किती घेशी माझा जीव
अरे विस्तवाच्या धन्या
कसं आलं तुते हिव.

चूल पेटली, तवा तापला, भाकरी भाजल्या जाऊ लागल्या की सगळ्या हाताला चटके बसू लागले की बहिणाईच्या मुखातून हृदयाला चटके देणारे बोल बाहेर पडू लागत-

अरे संसार संसार
जसा तवा चुल्ह्यावर
आधी हाताला चटके
तव्हा मिळते भाकर

सकाळचे घरकाम आवरून बहिणाबाई शेतात जाऊ लागत. जाता जाता रस्त्याच्या कडेला कडूनिंबाच्या झाडावरच्या लिंबोळ्या पाहून बहिणाईचे काव्य सुरू होई—

कडू बोलता बोलता
पुढे कशी नरमली
कडू निंबोणी शेवटी
पिकीसनी गोड झाली

शेतात कापणी असो, मळणी असो किंवा उपणाणी असो, सर्व ठिकाणी बहिणाबाईचे काव्य चालूच असे. मेंढयाभोवती बैल गरागरा फिरू लागत. बहिणाबाई म्हणू लागत—

पाय उचल रे बैला
कर बापा आता घाई
चालू देरे रगडन
तुझ्या पायाची पुण्याई

उपणणीच्या वेळी वाऱ्याने उशीर केला की बहिणाबाईनी मारलीच त्याला हाक ...

चाल येरे येरे वाऱ्या
येरे मारोतीच्या बापा
नको देऊ रे गुंगारा
पुऱ्या झाल्या तुझ्या थापा

बहिणाबाईच्या काव्याचे एवढेच वैशिष्ट्य नाही. मानवी जीवनाकडे बघण्याचे एक स्पष्ट आणि प्रभावी तत्त्वज्ञान त्यांच्याकडे होते. एकाद्या बुद्धिमान तत्त्वज्ञानाची किंवा महाकवीची जणु काही प्रतिभाच त्यांना प्राप्त झाली होती. मराठी काव्यात अमर होतील अशी अनेक सुभाषिते त्यांच्या काव्यात विखुरलेली होती. कशाचे काय म्हणूनही या काव्यात तर अशा सुभाषितांचा खजिनाच भरला आहे. खानदे... हिणाबाईंच्या कविता अभंगाप्रमाणे म्हटल्या ...गींच्या तोंडातून बहिणाबाईंचे ओवी-
किन्तु ...र वहात असते. मोठमोठ्या चौफेर
वह खिलंगातून हिंडताना, कापसाच्या शेता-
तून खिलती ...गेठूनतरी बहिणाबाईंची ओवी नक्कीच
ऐकू ...रून जाते.

दुनिया ...वठाय वठाय
उभ्या पिकातलं ढोर
किती हाकला हाकला
फिरी येतं पिकावर

...शा ह्या बहिणाबाई केवळ खानदेशाच्या नाहीतर आपल्या संपूर्ण महाराष्ट्राच्या होत्या. ३ डिसेंबर १९५१ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. सर्वच ग्रामीण जनतेला दुःखाचा धक्काच बसला असेल. या दुःखातून सावरण्यासाठी त्यांनी एक ओवी करून ठेवली होती.

कधी नगद उधार
सुखदुःखाचा व्यापार
अरे संसार संसार
असा मोठा जादूगार

## कविता जीवनाची

माझं जीवन एक कविता
या कवितेत—
मी सत्य
तू काल्पनिक
आता पाहायचंय
या कवितेचा—
अर्थ कसा लागतोय ते.

— सिद्धनाथ कुलकर्णी
द्वितीय वर्ष, कला

# असे उडते ग्लायडर

**उल्हास आर्यमाने**

बारावी वाणिज्य

ग्लायडर या शब्दाची व्याख्या एका वाक्यात करायची म्हटले तर ' यंत्राशिवाय चालणारे विमान ' अशी करता येईल. पण या व्याख्येत फारच उणिवा आ[illegible] त्यामुळे ग्लायडर म्हणजे काय हे सांगावयाचे [illegible] अशाच प्रतिभावान जड आहे पण हवेत उडू शकते अ[illegible] साधन असे म्हणावे लागते. उ[illegible] उडवतात कसे ? मशीनशिवाय [illegible]च्या नागपंचमील[illegible]कसा मिळतो ? हे समजण्यासाठी आपल्या महाराष्ट्रात अनेक काही भागांची माहिती करून घ्यावी लागे हेणाबाईची गोष्ट[illegible]रेचसे भाग ( उदा. पंख, रडर, टेलप्लेन ) एका [illegible] लिहाय[illegible] आकाराचे बनवलेले असतात आणि हे भाग बनवताना एक मुख्य तत्त्व लक्षात ठेवलेले असते. हवेचा झोत ( Air flow ) ग्लायडरच्या दिशेच्या बरोबर विरुद्ध असावा लागतो. ग्लायडरला उंची ( Lift ) देण्यासाठी हवेच्या झोताचा उपयोग होता.

पक्षी ज्या प्रमाणे स्वतःच्या पंखाच्या आधारावर हवेत भ्रमण करू शकतात, त्याप्रमाणे यंत्राने चालणारे विमान यंत्राचा वापर करून हवेत भ्रमण करू शकते. परंतु ग्लायडरला असे यंत्र नसल्याने त्याला सर्वस्वी हवेच्या झोतावर अवलंबून रहावे लागते. ग्लायडर ज्या वेळेस जमिनीवर यंत्राच्या साहाय्याने पुढे ओढले जाते त्या वेळेस अर्थातच त्याचे पंख सुद्धा त्याबरोबर ओढले जात असतात आणि ते पंख एका विशिष्ठ आकाराचे बनवलेले असतात. हवेचा झोत विरुद्ध असल्यामुळे तो झोत पंखां-वरून व खालून असा विभागून जातो. आणि विभागून गेलेला तो झोत पंखाच्या शेवटी एकाच वेळेस एकत्र होतो. वरून जाणारा हवेचा झोत खालून जाणाऱ्या हवेच्या झोतापेक्षा जोरात असतो. वेग वाढला की दाब कमी होतो हे शास्त्रीय तत्त्व बहुतेकांना माहीत असावे. त्यामुळे वरच्या बाजूस हवेचा दाब कमी होईल तर खालच्या हवेचा दाब मात्र कायम असणार ( म्हणजे वरच्या दाबापेक्षा जास्त असणार ) त्यामुळे तो भाग संपूर्ण वरच्या बाजूस उचलला जाईल. यालाच इंग्रजीत लिफ्ट ( Lift ) म्हणतात. याच सिद्धांताला ( वेग वाढवला असता हवेचा दाब कमी होतो ) बर्नोलीस सिद्धान्त ( Bernoullis Theorum ) म्हणतात.

ग्लायडरमध्ये म्हणा किंवा विमानात म्हणा सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे त्याचे दोन पंख. ( wings ) म्हणून इंग्रजीत त्याला मेन प्लेन ( Main Plane ) असे म्हणतात. बऱ्याच जणांचा असा समज असतो की जेथे [illegible] बसतात तो विमानाचा मुख्य भाग. पण ही कल्पना [illegible] आहे. एलिव्हेटर ( Elevator ), रडर ( Rudder ) आणि एलरन ( Aileron ) हे तीन भाग पायलटला ग्लायडर ताब्यात ठेवण्यास उपयोगी पडतात. एलिव्हेटर मागच्या बाजूला म्हणजेच टेलप्लेनच्या ठिकाणी असते आणि ते खालीवर करण्यासाठी त्याला एक तार जोडलेली असते. एलिव्हेटर हलत असताना टेलप्लेनचा पुढील भाग स्थिर ठेवून मागचा भाग जर खालीवर केला तर त्याचा उपयोग ग्लायडर खाली किंवा वर नेण्यास होतो. रडर आणि रडार यामध्ये फारच फरक आहे. बहुतेक जण त्याचा गोंधळ करतात. रडर ( Rudder ) मुळे ग्लायडर उजवीकडे किंवा डावीकडे वळविले जाते. या रडरचा उपयोग नावेच्या सुकाणूप्रमाणे केला जातो. एलरन या कंट्रोलचा उपयोगसुद्धा ग्लायडर वळविण्यासाठी केला जातो. आता प्रश्न असा पडेल की रडर असताना एलरन कशासाठी ? आपण सायकल चालवताना सायकल वळविण्यासाठी हँडलचा उपयोग करतो पण सायकल वळवताना आपला तोल सांभाळण्यासाठी ती थोडी तिरकी करतो. अगदी हीच गोष्ट विमानाच्या बाबतीत असते.

ग्लायडरची जी धावपट्टी असते तिच्या एका टोकाला ग्लायडर उभे केले जाते त्याच्या दुसऱ्या टोकाला एक मशीन असते. त्याला विंच मशीन म्हणतात व या दोहों-मधील अंतर दोन ते अडीच फर्लांग ठेवले जाते. विंच मशीन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून तार गुंडाळण्याचे एक मशीन असते आणि त्या तारेचे एक टोक विंच मशीनच्या चक्राला जोडलेले असते आणि दुसरे टोक ग्लायडरला जोडलेले असते. त्यानंतर विंच मशीन सुरू करतात त्यामुळे ग्लायडर विंचमशीनकडे ओढले जाते. ग्लायडरला पुरेसा वेग मिळाला की पायलट आपल्या हातातील स्टिक मागे ओढतो त्यामुळे एलिव्हेटर वर जाऊन शेपटावरील हवेचा दाब वाढतो व ग्लायडरचे नोज

वर उचलले जाते. त्यामुळे ग्लायडरला उंची मिळते. ज्या-वेळेस विंचमशीनची शक्ती संपल्याचे पायलटला जाणवते त्या वेळेस पायलट कॉकपीट मधील रिलीज-नॉब ओढतो. त्यामुळे विंचमशीनची तार गळून पडते.

ग्लायडर एकदा वर जाऊन खाली उतरले की त्याची एक फेरी पूर्ण होते त्याला इंग्रजीत लॉंच ( Launch ) असे म्हणतात. ग्लायडरची उंची ४०० फूटापर्यंत आली की ग्लायडर सुरवातीला उभे केलेले असते त्याच्या थोडे मागच्या बाजूस आणले जाते. नंतर पायलट आपल्या डाव्या हाताला असलेला एअरब्रेक ओढतो. त्यामुळे ग्लायडरच्या पंखावरील स्पायलर्स उघडले जाऊन ग्लायडरच्या पंखात हवा शिरते. अशा तऱ्हेने ग्लायडर जड होऊन खाली आले की पायलट आपल्या हातातील स्टिक पुढे करतो. त्यामुळे एलिव्हेटर खाली जाऊन शेपटीच्या खालील भाग जड होतो व ग्लायडरचे नोज खाली जाते व ग्लायडरच्या ३० ते ४० फूट पुढे पळत जाते. अशा तऱ्हेने ग्लायडर आपली संपूर्ण फेरी पूर्ण करते.

## कळीचे मनोगत

कळी मी,
सोनचाफ्याची,
निशिगंधाचा,
सुगंध मला,
सुख-दु:ख
काय माझे—हे
भ्रमराशिवाय
कळणार कुणाला ?
गोबरे गोबरे
माझे गाल सोनुली असते
माझी चाल.
भ्रमरा असते
बारीक नजर
म्हणूनच का
लागते त्याला खबर ?
आलिंगन मी
भ्रमरा देते
म्हणूनच मी, का
फुलात येते ?

—**विजय देगांवकर**
बारावी कला

# व्यथा-कुणा एकाची

**सुषमा कुलकर्णी**
अकरावी कला

रविवारची दुपार असावी. पाऊस कधीच पडून गेला होता. आता काळे ढगही दिसेनासे झाले होते. आकाश अगदी निरभ्र झाले होते. सगळीकडे स्वच्छ ऊन पडले होते. आणि मी मनाशी विचार करीत होतो. व्यक्ती समाजाभिमुख आहे असे म्हणतात, पण व्यक्ती नुसती समाजाला मानत असून चालेल का? समाजाला त्याची जाण पाहिजे ना! नुसते सौंदर्यावर जग चालते का? बाकी कशाचीच किंमत नसावी? ज्या समाजाने कळायला लागल्यापासून मला झिडकारले, त्या समाजाचे व आमचे नाते नेमके काय आहे?

अजूनही आठवतात ते शाळेतील दिवस. कधी नव्हे ते स्नेहसंमेलनाच्या नाटकात काम मिळाले. जगातील आठवं आश्चर्यच वाटले मला. पण ते आश्चर्य नसून जाणून बुजून नियतीने टाकलेला डाव होता. उत्साहाच्या भरात सर्व पाठांतर पूर्ण केले. अभिनयही वठवून घेतला. आणि तो काळाकुट्ट दिवस उजाडला. एका घाऱ्या-गोऱ्या मुलाला घेऊन त्याची आई शिक्षकांकडे आली आणि त्याच क्षणी माझ्या जीवनाचा आनंद घेऊन गेली. नाटकातून मला काढून त्याला घेतले. त्याला घेतल्याचे दुःख नाही. पण मला काढल्याचे मात्र नक्की. तेव्हापासून शाळा, मुलं, शिक्षक कधी आपले वाटलेच नाहीत मला. मनात आले की कुणीही मला चिडवावे, चेष्टा करावी. बस! हेच जीणं. कॉलेजातसुद्धा फरक पडू नये? घरी काय अन् बाहेर काय कोणी आपले नाही.

घरचा तर सगळा आनंदच. आई महिला-मंडळात, बाबा ऑफिसमध्ये, ताई नखऱ्यात, दादा मित्रांमध्ये. सर्व दंग आपल्या खेळात. आजपर्यंत एकही प्रसंग असा आठवत नाही की कुणी माझी आस्थेने चौकशी केलीय. उशीर झाला, लवकर आलो, वेळेवर आलो परिणाम एकच. अरे, आम्ही काही अभ्यास करीत नाही? आम्हाला कसली हौस नाही? पण आम्ही जन्माला आल्यापासून जाणतो ती बाबांच्या ओठांवरील सुत्र जरब अन् आईची कडाडती मुलुख मैदानासारखी तोफ.

कॉलेजमध्ये तेच. कुणाकडे लक्ष द्यायचे नाही म्हटले तर सुखाने जगू देतील तर नावाची शपथ. नोकरी म्हटलं तर स्मार्टनेस पाहिजे म्हणे! अक्कल काडीची नसली तरी चालेल. पण स्मार्टनेस पाहिजे. गुणांना किंमतच नाही? अर्थात, गुण आहेत हे जाणवले तरच हा प्रश्न ना! त्यासाठी ऐकावे लागते, एकत्र रहावे लागते. कुटुंबासारखे. खानावळीसारखे नाही.

हं! ही आमची एकूण कहाणी. एखादी व्यक्ती समाजाला, लोकांना, आईवडिलांना का नको असते? न्याय द्या. मला कुणाची सहानुभूती नकोय. मला न्याय हवा. न्याय नको मला, प्रेम हवंय. सांगा. माझ्यासारख्यांनी काय करायचे? कोठे जायचे? कोणासाठी जगायचे?

## मनीषा

पाहुनिया तुज मज शब्द फुटेना
        वाक्य जुळेना, मज गीत सुचेना
मनात आलं कायमचं तुझ्यात मिळावं
        लांबशी एक छान लाट व्हावं
मऊशार रेतीला स्पर्शून
        हळूच परतावं तुझ्या कुशीत
क्षणभर का होईना विसाव्याला!

—**सुजाता गानू**
बारावी वाणिज्य

# स्त्री जन्मा ही तुझी कहाणी

**अंजली मालुंजकर**

तृतीय वर्ष, वाणिज्य

जुल्मके तीर चले कुछ ऐसे, लूट गया दिलका बाग
दुनियाने जो जख्म दिया, वो बन गया गहरा दाग.

स्त्रीचा देह म्हणजे एक फुलपात्रच आहे.–
जीवनाच्या पवित्र जलाने भरलेले–
त्यात भावभावनांच्या, विचारांच्या, आशा आकांक्षांच्या विविध रंगीबेरंगी पुष्पांचा गुच्छ ठेवलेला असतो.

अशा ह्या फुलपात्राला जर अनीतीचा धक्का लागला, तर ते कोलमडून पडेल;
त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील;
जीवनाचं अमृत वाहून जाईल;
उरेल शेवटी जीवनाचा अंतिम क्षण.
त्या क्षणाची वाट पहात रहायचं.

सुख वा दुःख झेलत रहायचं. कितीही दुःख झालं तरी चेहेऱ्यावर ओढून ताणून हसू आणायचं.

कारण समाजाला कळता कामा नये– ही स्त्री दुःखी आहे.

समाज !
समाजाचं अवडंबर माजवलं गेलंय.
प्रत्येकाच्या मनात समाजाबद्दल भीती असते.

आपण अमुक–तमुक केलं तर समाज काय म्हणेल ? असाच प्रत्येकजण विचार करतो.

ती गोष्ट आपल्या हिताची असेल तरी आपण समाजाला घाबरतो.

का ?
असं का ? शेवटी समाज कुणी निर्माण केला ?
तुम्ही आम्हीच ना !

स्त्री ही निसर्गाची अगदी पवित्र व उदात्त आकृती आहे.
ती एक प्रबळ शक्ती आहे.
ही प्रबळ शक्ती म्हणजेच मंगल संस्कृती.
स्त्रीत्वाला झळ पोहोचली की हीच संस्कृती डागाळते.

संस्कृतीच्या मखरात अधिष्ठित झालेली स्त्री नैतिक बंधनात वेष्टलेली असल्याने अनिर्बंधित राहूच शकत नाही.
ती स्वैराचारी बनली की नीतिमत्ता कलंकित होते.
मूळची उदात्त, उच्च आकृती ढासळते.

" शिलाचरण हे तिला वरदान तर स्वैराचार हा शाप. " जेव्हा अनिर्बंध संचारात ती व्यभिचाराच्या दालनात प्रवेश करते त्याच वेळी तिच्या नीतीचे उंची अलंकार आपोआप गळून पडतात.

पुरुष स्त्रीच्या मनाची कदर कधीच करत नाही.
त्याचे प्रेम तिच्या आत्म्यावर कधीच नसते.
असते ते फक्त तिच्या शरिरावर.

स्त्रीच्या मनाचे रंग विटले की सगळी दुनिया बेरंगी होऊन जाते.

स्त्री ही सुखासुखी जोगीण होत नाही.

आयुष्य ही फुलबाग नसून ते समरांगण असते, हे स्त्रीला तेव्हा कळते, ज्यावेळी जन्मभर उराशी कवटाळलेल्या कल्पनाही अनुभवाच्या धक्क्याने हां हां म्हणता ढासळतात.

प्रेम हे काव्यासारखे असते.
ते करून होत नाही.
स्त्रीचे प्रेम हे हस्ताच्या पावसासारखे असते.

खेळताना हातात हुकमाचं पान नसले तरी डाव हा खेळावाच लागतो.

मग तो डाव पत्त्यांचा असो वा संसाराचा.

स्त्री जीवनाचं हे सारं स्वरूप समाजानेच ठरवायचं असतं.
तिचं अमृत बनवायचं की जहाल विष ?

लग्न हा एक मोठा अपघात आहे, हे तिला सगळे होऊन गेल्यानंतर समजून येते.

रंग लाती है मेहंदी, सूख जाने के बाद.
आदमी पछताता है, सब कुछ होने के बाद.

# लघुउद्योगातील आगळा कर्मयोगी

**रवींद्र एकनाथ कोठावदे**

तृ. व. वाणिज्य

'लघुउद्योगरत्न' श्री. आत्माराम रावजी भट उर्फ आप्पासाहेब यांच्या वयाला १२ मे १९८० रोजी ७५ वर्षे पूर्ण झाली. आप्पासाहेबांनी पुण्यास महाराष्ट्राचे औद्योगिक व व्यापारी नेतेपण आणले आहे. भट हे स्वतः कोणी भांडवलदार नाहीत, कारखानदार नाहीत, किंवा व्यापारीही नाहीत. तरीसुद्धा भारताच्या औद्योगिक नकाशात महाराष्ट्राला ठळकपणे उभे करण्याचे श्रेय आप्पासाहेबांनाच देण्यात येते. आप्पासाहेबांचे आयुष्य जणू उपेक्षित उद्योजकांचे प्रश्न हाताळण्यासाठीच आहे. ज्यात प्रसिद्धी कमी पण राष्ट्रीय दृष्ट्या फळ जास्त असेच काम आप्पासाहेबांनी घेतले.

१२ मे १९०५ रोजी रत्नागिरीला एका मध्यमवर्गीय चित्तपावन ब्राह्मण कुटुंबात आप्पासाहेबांचा जन्म झाला. आप्पा लहान व जन्मतः अशक्त म्हणून सर्वांचे लाडके होते. आप्पांचे प्राथमिक शिक्षण म्युनिसिपल शाळेत व माध्यमिक शिक्षण पटवर्धन मिडल स्कूल व रत्नागिरी हायस्कूलमध्ये झाले. १९२२ मध्ये आप्पासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले.

त्यानंतर आप्पासाहेबांचे महाविद्यालयीन शिक्षण एल्फिन्स्टन कॉलेज आणि सिडनहॅम (व्यापारी शिक्षणाचे) कॉलेज या दोन कॉलेजांत झाले. कॉलेजात आप्पासाहेब हुशार विद्यार्थी म्हणून प्राध्यापक व विद्यार्थि-वर्गात प्रसिद्ध होते. बी. कॉम्‌च्या दोन वर्षांच्या अभ्यासाकरता आप्पासाहेबांनी 'बँकिंग' हा ऐच्छिक विषय निवडला. 'रत्नागिरी जिल्ह्यातील पतपुरवठा' हा त्यांचा निबंध उत्कृष्ट ठरून कॉलेजकडून मार्च १९२६ मध्ये त्यांना ५० रुपयांचे पारितोषिक मिळाले. तसेच रुपयाचा दर १६ पेन्स असावा का १८ पेन्स असावा या विषयावरील निबंधस्पर्धेत खास विद्यार्थ्यांकरिता ठेवलेले २५० रुपयांचे बक्षीस आप्पासाहेबांना मिळाले. कॉलेज-जीवनात आप्पासाहेबांचा पुष्कळसा वेळ यंग इंडिया सोसायटी व यूथ लीगच्या कामात खर्च झाला. आप्पासाहेबांनी कॉलेज बँकिंग असोसिएशनपुढे व्याख्याने दिलेली आहेत. १९२९ च्या मार्च महिन्यातील एम्. कॉम्. च्या परीक्षेत उत्तीर्ण होणारे आप्पासाहेब हे एकमेव विद्यार्थी होते. आप्पासाहेबांची शैक्षणिक कामगिरी आजच्या वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना निश्चितच आदर्श ठरेल अशी आहे.



**श्री. आप्पासाहेब भट**

केसरीसारखी थोर परंपरा असलेल्या अग्रेसर वृत्तपत्राचे व्यवस्थापक या नात्याने आप्पासाहेबांनी उत्कृष्ट काम केले. जवळजवळ २५ वर्षे ते केसरीचे बिझिनेस मॅनेजर होते. आप्पासाहेब केसरीत आर्थिक, व्यापारविषयक आणि औद्योगिक विषयांवर माहितीपर टिपणे आणि लेख लिहीत. "मी केसरी कुलातला आहे. तेथूनच माझ्या कार्यास सक्रिय सहानुभूती, प्रोत्साहन लाभले," असे आप्पासाहेब कृतज्ञतापूर्वक सांगतात. महायुद्ध-काळात जरी वाटप पद्धतीने वृत्तपत्रांना कागद देण्यात येऊ लागला तरी आप्पासाहेबांनी कधी कागद कमी पडू दिला नाही की काळ्या बाजारातून खरेदी केला नाही. केसरी कचेरीतील जाहिरातींचे काम आप्पासाहेबच बघत.

आप्पासाहेबांचे अजून एक कार्यक्षेत्र म्हणजे वृत्तपत्र व्यावसायिकांना एकत्र आणून त्यांची संघटना उभारणे. भारतीय देशी भाषा वृत्तपत्रीय संघटना (Indian Languages Newspapers Association) या संस्थेची स्थापना व जोपासना आप्पासाहेबांनी केली. त्यांचे हे कार्य देशी भाषा वृत्तपत्रांच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिण्यासारखे आहे. आप्पासाहेबांनी व्यापारी महाविद्यालयात असताना बँकिंग नियतकालिकाचे दोन वर्षे संपादन केले. याच काळात आणि नंतर मुंबईच्या लोकमान्य आणि नवाकाळ आणि पुण्याच्या केसरी, मराठा, चित्रमयजगत, संपदा, सह्याद्रि या नियतकालिकांमध्ये आर्थिक विषयांवर लेखन केले.

भारत सरकारने १९५२ मध्ये नेमलेल्या वृत्तपत्र

आयोगावर ( प्रेस कमिशनवर ) आप्पासाहेबांची सदस्य म्हणून नेमणूक झाली. तेथेसुद्धा त्यांनी प्रत्येक गोष्ट तत्परतेने व निर्भिडपणे करून आपली छाप कायम ठेवली. लहान वृत्तपत्रांना, तसेच मध्यम वृत्तपत्रांनासुद्धा आर्थिक स्वास्थ्य लाभावे, किंमत–पृष्ठ–कोष्टक तयार व्हावे, त्यांच्या स्वतंत्र मताची जोपासना व्हावी, यांसाठी आप्पासाहेबांनी भगीरथ प्रयत्न केले. त्यांनी आपले सारे बुद्धिकौशल्य, संघटना-प्रचार कौशल्य, वादविवादपटुता पणास लावून जिद्दीने हे कार्य केले.

आप्पासाहेबांनी ३ नियतकालिके सुरू केली. पहिले म्हणजे मराठा चेंबरचे ' मासिक वृत्त, ' पुढे त्याचेच रूपांतर ' संपदा 'मध्ये झाले. आप्पासाहेबांनी सुरू केलेले दुसरे वृत्तपत्र म्हणजे देशी भाषा वृत्तपत्र संघाचे ' मन्थली न्यूज बुलेटिन. ' पुढे ह्याचाच विस्तार ' लँग्वेज प्रेस बुलेटिन ' मध्ये झाला. आप्पासाहेब दिल्लीच्या ' फेडरेशन ऑफ असोसिएशन्स ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज ऑफ इंडिया 'चे अध्यक्ष होते. तेथे त्यांनी " फसाय – [ F. A. S. I. I. ] बुलेटिन सुरू केले.

देशी भाषा वृत्तपत्र संघाच्या वतीने आणि भारतीय वृत्तपत्र व्यवसायातील तज्ज्ञ म्हणून आप्पासाहेबांना १९५४, ६० आणि ६१ मध्ये परदेशात जाण्याची संधी मिळाली. ब्राझीलमधील साऊ पॉलो येथे भरलेल्या पहिल्या जागतिक वृत्तपरिषदेसाठी आप्पासाहेब गेले होते. लंडनमधील बी. बी. सी. वर आप्पासाहेबांचे भाषण ध्वनिक्षेपित करण्यात आले. बँकॉक येथील परिषदेसाठी आप्पासाहेबांना तज्ज्ञ म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. अशा प्रकारे आप्पासाहेबांनी देशी वृत्तपत्र संघाला भारतातीलच नव्हे तर जगातील वृत्तपत्र सृष्टीत स्थान मिळवून दिले.

समजा कोयना वीज आली नसती तर महाराष्ट्राची काय स्थिती झाली असती ? हे चित्र डोळ्यासमोर आले म्हणजे आप्पासाहेबांच्या कार्याचे महत्त्व कळते. आप्पासाहेबांनी केवळ महाराष्ट्राच्या विकासाकरिता चिकाटीने, योग्य वेळी चळवळ उभारून कोयना वीज प्रकल्पाची योजना सरकारला कार्यान्वित करावयास लावली. त्यामुळे महाराष्ट्राची औद्योगिक व शेतकी प्रगती आप्पासाहेबांमुळेच झाली असे म्हटले तरी वावगे ठरू नये. कोयना वीज प्रकल्प कार्यान्वित करण्यामध्ये आप्पासाहेबांचा कोणताच वैयक्तिक स्वार्थ अजिबात नव्हता, हे येथे मुद्दाम लक्षात घ्यायला हवे.

यंत्रमाग-धंद्यामध्ये सुद्धा आप्पासाहेबांनी निरपेक्षतेने व निरसलतेने कार्य केले. अप्पासाहेब अक्षरशः यंत्रमाग धंद्याला लाभलेले एक बहुमोल रत्न होत. यंत्रमागांच्या बाबतीत शासनाला अवघड वाटणार नाही व कारखानदारांनाही डोईजड होणार नाही अशा पद्धतीने आप्पासाहेब कोणताही प्रश्न हाताळीत. गमतीने असे म्हटले जाते की आप्पासाहेब जनतेचे पौराहित्य करतात, पण दक्षिणा न घेता.

आप्पासाहेबांच्या जीवनाचे लघुउद्योग-विकास हे अविभाज्य अंग होते. महाराष्ट्रातील लघुउद्योग विकसित व्हावा म्हणून आप्पासाहेबांनी अपार कष्ट घेतले. लघुउद्योग म्हणजे आप्पासाहेब भट असे काहीसे समीकरण आज रूढ झाले आहे. उपेक्षित लघु-उद्योगांना मिळालेल्या प्रतिष्ठेचे श्रेय आप्पासाहेबांना देणे उचित ठरेल. लघुउद्योगांचा विकास व्हावा म्हणून आप्पासाहेबांनी संपदा, केसरी, मराठा चेंबर, सेंट्रल स्मॉल स्केल इंडस्ट्रीज बोर्ड व सेंट्रल ॲडव्हायजरी कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीज ( दिल्ली ), मुंबई स्टेट ॲडव्हायजरी कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीज, इंपोर्ट-एक्स्पोर्ट ॲडव्हायजरी कमिटी, फसाय, ( F. A. S. I. I. ). स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई महाराष्ट्र विधान परिषद, यांच्या माध्यमातून भाषणे, लेख इत्यादींच्या द्वारा सातत्याने प्रचार केला. मराठे चेंबरने स्थापन केलेल्या Small Scale Industries Wing चे आप्पासाहेब कार्यवाह होते. पुण्यातील काँग्रेस भवनावर ५ जून १९६० रोजी महाराष्ट्र विभाग काँग्रेसच्या लघुउद्योग समितीतर्फे लहान कारखाने व उद्योगधंदे यांच्या चालकांच्या भरलेल्या मेळाव्यात आप्पासाहेबांनी महाराष्ट्राच्या वतीने निवेदन सादर केले. आयात–निर्यात सल्लागार कौन्सिलचे ते सभासद होते. देशात पक्का माल तयार करण्याकरिता लागणारा कच्चा माल फार तर आयात करावा परंतु स्वदेशात तयार होणाऱ्या पक्क्या मालासारखा परदेशी पक्का माल आयात करण्यास बंदी असावी, या आप्पासाहेबांच्या सूत्राने भारतातील अनेक लहान-मोठ्या उद्योगांना संरक्षण मिळाले.

आप्पासाहेबांनी केवळ तीन वर्षांच्या कालावधीत देणग्या मिळवून लघुउद्योग महासंघाची स्वतःची वास्तू दिल्लीत उभी केली. " लघुउद्योग कुटी " असे नाव या वास्तुस देण्यात आले.

Small Business Development या विषयावर टोकिओमध्ये प्रॉडक्टिव्हिटी ऑर्गनायझेशनतर्फे आयोजित केलेल्या परिचर्चेत भाग घेण्यासाठी आप्पासाहेबांची निवड

झाली. " भारतातील लघुउद्योग " हा अभ्यासपूर्ण प्रबंध आप्पासाहेबांनी सादर केला. ४ थ्या पंचवार्षिक योजनेत लघुउद्योग विकास योजना करण्यासाठी स्थापण्यात आलेल्या कार्यकारी गटाचे आप्पासाहेब सभासद होते. दिल्लीच्या नाये (नॅशनल अलायन्स ऑफ यंग आंत्रप्न्यूनर्स) या संघटनेने आप्पासाहेबांना ' लघुउद्योग-रत्न ' हा बहुमान व सुवर्णपदक केंद्रीय उद्योगमंत्री सी. सुब्रह्मण्यम् यांच्या हस्ते १९ सप्टेंबर १९७२ या दिवशी दिले. इचलकरंजीच्या F. I. E. प्रतिष्ठानतर्फे दिल्या जाणाऱ्या पारितोषिकाचे आप्पासाहेब हे त्यांनी केलेल्या लघुउद्योग प्रयत्नांबद्दल प्रथम वर्षाचे मानकरी ठरले. आप्पासाहेबांनी भारताच्या अर्थकारणातील लघुउद्योगांचे महत्त्वाचे स्थान सरकारला आणि जनतेला आपल्या बुद्धिमत्ता विद्वत्ता आणि कर्तृत्वाच्या साहाय्याने पटवून देण्याकरिता आपले आयुष्य वेचले.

बँकेने सतत लघुउद्योगांबाबत धडाडीचे धोरण आखले पाहिजे अशीच आप्पासाहेबांची मनस्वी तळमळ आहे. लहान माणसाला बँकेने विसरू नये असे ते नेहमी आग्रहाने म्हणतात. १६।९।१९३५ रोजी स्थापन झालेल्या महाराष्ट्र बँकेचे, इवल्याशा रोपाचे आज मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाल्याचे दिसून येते. बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची स्थापना ही मराठा चेंबरच्या कार्यकारी मंडळाने विचारपूर्वक केलेल्या परिश्रमाचे फळ होय, असा गौरवपूर्ण उल्लेख प्रॉस्पेक्ट्समध्ये आढळतो. आप्पासाहेबांनी केवळ हितचिंतक हीच भूमिका घेतली. ते कधीही संचालक मंडळावर नव्हते अथवा त्यांनी कधीही बँकेच्या दैनंदिन कामात लक्ष घातले नाही. लघुउद्योगांना मदत करण्याबाबत कर्जाच्या अटींचा कडकपणा कमी करून घेण्याची व तारणापेक्षा उद्योजक महत्त्वाचा मानण्याची ही भूमिका आप्पासाहेबांनी सातत्याने मांडली. आप्पासाहेबांसारख्या कर्तबगार, सेवावृत्तीचा व निस्वार्थी नेता मिळाल्यामुळेच बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची स्थापना होऊन, वाढ होऊन तिला आजची प्रतिष्ठा प्राप्त होऊ शकली.

वयाच्या २९ व्या वर्षी आप्पासाहेबांनी मराठा चेंबरची स्थापना केली. यामागे प्रेरणा अशी होती की आप्पासाहेबांना स्वदेशी, औद्योगीकरण, संघटन या चळवळींनी भारून टाकले होते. आज सरकार दरबारी व जनमानसात ही संस्था मानाचे स्थान मिळवून आहे. मराठा चेंबरची स्थापना वर्षप्रतिपदेच्या दिवशी दि. १६-३-१९३४ रोजी झाली. मराठा चेंबरचे काम आप्पासाहेबांनी एकही पैसा न घेता केले. त्यामागे त्यांची निःस्वार्थी, निरपेक्ष बुद्धी, लघुउद्योजकांना मदत करण्याची प्रवृत्ती दिसून येते. त्यांनी चेंबरची नुसतीच स्थापना केली नाही तर निरपेक्ष त्यागी वृत्तीने संगोपन व संवर्धनही केले. चेंबरच्या कार्यासाठी पहिली देणगी आप्पासाहेबांचीच ठरलेली. भारत सरकारने अप्पासाहेबांना ' पद्मश्री ' हा बहुमान दिल्याबद्दल चेंबरने त्यांचा ५-३-१९७१ रोजी सत्कार केला. श्रीमान बाबुराव पारखे त्या प्रसंगी म्हणतात " मुंबईबाहेरील महाराष्ट्राचा औद्योगिक विकासाचा जणू पायाच भटसाहेबांनी घातला. " मुंबई सरकारच्या कम्युनिकेशन बोर्डावर १९४८-५६ पर्यंत आप्पासाहेबांनी मराठा चेंबरच्या वतीने काम पाहिले. शिवाजीनगरजवळील रेल्वेपूल पुणे-मिरज रेल्वे ब्रॉडगेज मार्ग, कोकण रेल्वे, इचलकरंजीचा पूल याबाबतीत आप्पासाहेबांनी आग्रह धरला, व ही बहुतेक कामे झाली आहेत. १९५०-१९७२ पर्यंत स्टेट ॲडव्हायजरी कौन्सिल ऑफ इंडस्ट्रीजवर चेंबरच्या वतीने आप्पासाहेबांनी काम केले. त्यात यंत्रमाग, लघुउद्योग, कोयना वीज प्रकल्प, औद्योगिक वसाहती, कामगारांकरिता घरे, असे अनेक प्रश्न सातत्याने मांडून त्यांचा पाठपुरावा केला. आयात-निर्यात सल्लागार कौन्सिलचे आप्पासाहेब पहिल्यापासून सभासद होते. देशात तयार होणाऱ्या मालावर आयातबंदी घालण्याची तसेच कच्च्या मालाची आयात करून देशातील उत्पादनात वाढ कशी करता येईल याची आप्पासाहेबांनी नेहमी दक्षता घेतली.

अप्पासाहेबांनी चेंबर मोठे केले. पण ते स्वतः मात्र " चेंबरने आपल्याला मोठे केले " असे कृतज्ञतापूर्वक सांगतात. आता चेंबरची सभासदसंख्या १२०० च्या घरात असून वार्षिक उत्पन्नाचा आकडा ४ लाख रुपयांच्या घरात आहे. चेंबरची स्थापना झाली तेव्हा महाराष्ट्रात व्यापारी अथवा उद्योगपती फारसे नव्हते. त्यामुळे चेंबरची स्थापना निराशाजनक वातावरणातच झाली. परंतु आज चेंबरने केलेल्या कार्याचा, पर्यायाने आप्पासाहेबांनी केलेल्या कार्याचा, उल्लेख येथे केल्यावाचून राहवत नाही.

आप्पासाहेबांनी एकाच वेळी अनेक समित्यांवर काम केले. त्यांच्यामध्ये बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि कर्तृत्व यांचा त्रिवेणी संगम झाल्याचे आढळून येते. त्यांच्याजवळ निर्भीडपणा, आग्रह आणि स्पष्टवक्तेपणा आहे.

आप्पासाहेबांसारखा कर्तबगार, सेवावृत्तीचा व निस्वार्थी नेता निपजल्यामुळेच लघुउद्योगाची वाढ झपाट्याने होऊ शकली व एकंदरीत आपल्या महाराष्ट्राचा विकास होऊ शकला.

'चंदनापरी झिजावे, कीर्तिरूपी उरावे " हे आप्पा-साहेबांनी कृतीत आणून दाखविले. एक आदर्श घालून दिला.

अशा ह्या आप्पासाहेबांना मी दीर्घायुरारोग्य चिंतितो व श्रीगजाननास प्रार्थना करतो की त्यांचे आशीर्वाद आणि मोलाचे मार्गदर्शन अनंतकाळ सर्वांना लाभो !

## विकीन म्हणतो स्वप्नांना

विकीन म्हणतो स्वप्नांना
घेतील काहो कुणी ?
उगीच बिचारी झुरून गेलीत
व्यर्थ माझ्या मनी
निळी, हिरवी स्वप्ने माझी
जपून ठेवलीत बालपणी
काळ्याभोर पापणी आड
जसे तुडुंबले खारे पाणी
पानाफुलांच्या, चंद्रसूर्यांच्या
अथांग निळ्या झिलईतून
माझ्या स्वप्नांच्या बिलोरी अंगातून
चांदणं गेलंय झिरपून
माझी मनस्थिती दुष्काळग्रस्त
हृदयावरती जखमा आहेत
डोळ्यांत माझ्या भयाकुल
विस्फाटलेली धरणी आहे
माझी स्वप्ने बेवारशी
आता माझ्याच अंगणी
विकीन म्हणतो स्वप्नांना
घेतील काहो कुणी !

— **आनंद दादु साळवे**
द्वि. व. वाणिज्य

# सामाजिक विषमता आणि आम्ही

**मोहिनी बडवे**

अकरावी वाणिज्य

[ बारामती येथील ' नवनिर्माण युवक संघटने 'ने आयोजित केलेल्या निबंध-स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त झालेला निबंध ]

एकदा फॉर्म भरताना मी एका मुद्यापाशी अडले; तो म्हणजे ' जात व पोटजात लिहा. ' काय लिहावे हेच सुचेना. मला ते माहीत नव्हते. मी ते विचारण्याकरता घरी जायला निघाले व जाता जाता मलाच माझे हसू आले व मनात विषण्णता भरून आली. माझ्या डोळ्यासमोर ' पतितपावन-संघटना ' व ' दलित पँथर ' या सारख्या संघटनांची नावे आली. जातियता पाळू नका असे म्हणणारेच फॉर्मवर भरायला सांगतात. अगदी सर्व ठिकाणी तो रकाना भरायलाच लागतो. त्यामुळे लहानपणापासूनच मुलांच्या मनावर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे त्याचेच संस्कार होतात.

मनूने हे चातुर्वर्ण्य निर्माण केले ते समाजस्थैर्यासाठी. त्यावेळी शूद्रांनासुद्धा मान मिळत होता. ते चारही वर्ण एकमेकांना पूरक असे होते. जसे आपल्या शरीराचे चार भाग पाडले तर ते एकमेकावर अवलंबून आहेत. पायाला आपण शूद्र समजतो पण त्या पायाला जाणीव असते की आपण मेंदूच्या आधारावर उभे आहोत व मेंदूला जाणीव असते की आपण शूद्र मानणाऱ्या पायांवरच उभे आहोत व आपली सर्व कार्ये चालू आहेत. त्याप्रमाणे सध्याचा बुद्धिजिवी वर्ग हा श्रमजिवी वर्गावर व श्रमजिवी वर्ग हा बुद्धिजीवी वर्गावर अवलंबून आहे. जर आपण शेतकऱ्याला शूद्र मानले आणि नुसत्या घरात बुद्धिजीवी वर्ग बुद्धी पाजळत बसले तर बुद्धिजिवी वर्गाला जेव्हा भुकेची जाणीव होईल तेव्हाच अप्रत्यक्षपणे शेतकऱ्याच्या अस्तित्वाची कल्पना येईल. म्हणजेच हे सर्व वर्ण एकमेकांना पूरक असे पाहिजेत.

" नमस्तक्षभ्यो रथकारेभ्यश्च वो नमो ! " या श्लोकात सुतार, भिल्ल, लोहार, निषाद या शूद्रानांही नमस्कार असो असे वेद म्हणतो; परंतु पुढे याच नमस्कार्ह जाती हीन व बहिष्कृत झाल्या. वेदकाळी उच्चनीच, श्रेष्ठ-कनिष्ठ अशी भावना नव्हती. बंधुता व स्वातंत्र्य या तत्वांचे ऋषी उपासक होते.

" अज्येष्ठासे अकनिष्ठास एते । संभ्रातरो वावृधु । सौभगाय ते अज्येष्ठी । उद्भिदो । अमध्यमासो मत्सा विवावृधु । "

पं. सातवळेकर म्हणतात, " समाजात उच्चनीच भेदभाव मानणे व कल्पिणे व ते जन्मसिद्ध असून कोणत्याही कारणाने नष्ट होऊ शकत नाहीत हे वैदिक धर्माच्या अगदी विरुद्ध आहे.

शूद्र राजाही होऊ शकतो, याबद्दल भीष्म सांगतात, " अपार व नौकाशून्य अशा संकटरूपी समुद्रामधे जो मूर्तिमंत नौकाच झालेला असतो तो जरी शूद्र असला तरी त्याचा सन्मान करणे सर्वथैव योग्यच ! " हे प्रवचनकार धर्म व जात यांचे महत्त्व सांगतात परंतु खऱ्या धर्माचे

" सत्यावीण नाही अन्य धर्म ।
मानवांचा धर्म । सत्यनीती हीच ।। "

हे रहस्य जे आहे, तेच मुळी त्यांना माहीत नसते. शूद्रांनी खिस्त धर्म स्वीकारल्यामुळे भट-ब्राह्मणांचे वर्चस्व कमी झाले व ते मिशनरींच्या नावे बोटे मोडू लागले, " खाणे थोडे व मचमच फार " या वृत्तीने. कोणत्याही दोन वर्गामधे एकही सम-आचार नसला पाहिजे असे हिंदूंचे धोरण होते. आटक नदीचे पलीकडे हिंदू लोकांपैकी कोणी जरी गेले तरी धर्मभ्रष्ट होतो, ही गोष्ट या ब्राह्मणांनी हिंदुधर्मात घुसडली व त्यामुळे इतरांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले. म. फुले म्हणतात,

" धर्म राज्यभेद मानवा नसावे ।
सत्याने वागावे ईशासाठी ।।
खिस्त, महंमद, मांग, ब्राह्मणासी ।
धरावे पोटाशी बंधुपरी ।।

आपण काही प्राण्यांना पवित्र मानून त्यांची पूजा करतो पण आपल्या सजातीयांना मात्र स्पर्श करत नाही. मग त्यांना बंधू म्हणून त्यांची सुखदुःखे समजावून घेणे हे दूरच राहिले.

ब्राह्मण-जोशी हे शूद्राच्या घरी मूल जन्मले अथवा लग्न निघाले की त्यांच्यापासून मात्र भरपूर पैसा उपटतात. शूद्रांना निरनिराळ्या बंधनांनी जोखडून टाकले होते. अस्पृश्यांनी घरे ठेंगणी आणि गावाच्या बाहेर बांधायची. गावातील विहिरी व पाण्याच्या इतर जागांवर पाणी भरण्यास त्यांना मनाई असे. रस्त्यावर थुंकण्याची बंदी होती. सकाळी उठल्याबरोबर त्यांचे दर्शन अशुभ मानले जाई.

"पडली छाया मनुजाची, विटाळ होता मनुजाला।
व्हावे स्नान सचैल, त्याला काय म्हणावे मूर्खाला ।।"

अशी या ब्राह्मण लोकांची विटंबना केली होती. शरीर-संरक्षक छत्री, पादत्राणे या वस्तू वापरण्यास त्यांना बंदी होती. राज्यकारभारात व कोणतेही पद ग्रहण करण्यास मनाई होती. ही सामाजिक बंधने असून त्यांच्यावर धार्मिक बंधने पण घातली होती. शूद्राला वेद पठनाचा तर नाहीच पण श्रवणाचा सुद्धा अधिकार नव्हता. त्यांना मंदिर-प्रवेशास बंदी होती. उच्चजातीच्या ब्राह्मणाकडून धार्मिक विधीसाठी व पौरोहित्य करून घेण्यासाठी बंधन होते. शूद्रांनी पूजा, अर्चा, होमहवन करण्यास बंदी होती. त्यांना सर्व प्रकारच्या बेड्यांनी जखडून टाकले होते व त्यांना शिक्षणा-पासून दूर ठेवले होते, हेही त्यांच्या दूरावस्थेतेचे एक कारण होऊ शकेल. त्यावेळचे भटपंत म्हणत होते की, "जर शूद्रांना शाळेत घातले तर हिंदुस्थानात केवढा मोठा गोंधळ माजेल."

सर्व गोंधळ, वादविवाद यांच्या मुळाशी हा जातीयवाद आहे. आसाममधे झालेली प्रचंड हानी, कारस्थाने याचे मूळ कारण जातीयवादच आहे. औरंगाबादमधे झालेले नामांतरण प्रकरण याचे कारण जातीयवादच होते. म्हणजे सजातीय बांधवात हे एक कलहाचे कारण होऊन बसले आहे.

त्यांच्यावर काही आर्थिक बंधने पण घातली होती. त्यामुळे मालमत्तेवर मालकी हक्क स्थापन करण्याचा त्यांना अधिकार नव्हता. दिवस-रात्र त्यांनी शेतावर काम करायचे व जे काही पीक मिळेल ते मालकाने खायचे असा प्रघात होता. त्यामुळे त्यांना पोटभर अन्न व वस्त्र हे मिळणेदेखील दुर्मिळ झाले. त्यांनी कोणते व्यवसाय करायचे यावर पण कडक निर्बंध असल्यामुळे पूर्वापार धंद्यात पोट भरत नसले तरी त्यांना दुसरा धंदा करून पोट भरण्याची मोकळीक नव्हती. व्यापार उदीम व इतर वस्तूंचे उत्पादन करण्याची त्यांना बंदी होती. या सर्व बंधनामुळे पिंजऱ्यातील वाघाप्रमाणे त्यांची स्थिती व ब्राह्मण मात्र एखाद्या रिंग-मास्टराप्रमाणे वागतात.

जातिप्रथेनेच समाजात माणूस माणसाला अस्पृश्य मानू लागला व हीन लेखू लागला. समाजात बालविवाह, हुंडा-पद्धती अशा अनेक समाजविघातक प्रथा निर्माण झाल्या. बहुतेक जातीचे लोक आपल्या अनादिसिद्ध धर्माविषयी अज्ञानी असल्यामुळे आपले सर्व लोकांमधील एकी नष्ट होऊन जातीयभेद निर्माण झाले.

या विषयावर दोन तास जरी भाषण केले तरी करता येईल पण जर स्वतःला बाणवायची वेळ आली तर ती आपण प्रसंगानुरूप पाळतो. कारण, याला कारणीभूत 'मी' नाही, हा म्हणणारा सर्व समाज मिळूनच याचा पाया आहे. मला व माझ्या मैत्रिणींना जातीयवाद, स्पृश्य-अस्पृश्य म्हणजे काय व ते भेद रोजच्या जीवनात कितपत अमलात आणतो हे विचारले तर याचे उत्तर देणे अशक्य आहे. कारण आपल्या शेजारी बसलेली व्यक्ती कोणत्या जातीची आहे हे माहीत नसते. आपण इतरांच्या घरी जातो, खातो; परंतु या सर्वांच्या जाती व पोटजाती माहिती असतातच असे नाही व त्यांची गरजही भासत नाही. पण हा प्रश्न सध्या राजकारणात मात्र जास्त प्रमाणात प्रमाणात बळावला आहे. रोजच्या जीवनात जातीचा संबंध जर ठेवला नाही तर ती हळूहळू नष्ट होईल. परंतु सरकारनेच जर जात उचलून धरली तर कठीण आहे. म्हणजे १५० वर्षे राज्य केलेल्या माय-बाप सरकार इंग्रजांनी जे 'फोडा व झोडा' धोरण अवलंबिले होते त्यात काहीच फरक रहाणार नाही.

सरकारने पण त्यांच्यासाठी काही कायदे व काही सवलती दिल्या आहेत. सरकार कोणत्याही बाबतीत लिंग, धर्म, जात, व्यक्ती, पंथ इ. दृष्टीने भेद करणार नाही. घाट, रस्ते, सिनेमागृहे, बागा इ. सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळल्यास तो गुन्हा मानला जातो. जर त्यांना शाळा-कॉलेजात प्रवेश दिला नाही तर तो गुन्हा मानला जातो. नोकरीच्या ठिकाणी किंवा लोकसभा मंत्रिमंडळ इ. ठिकाणी त्यांच्याकरता राखीव जागा ठेवल्या जातात.

जातियता नष्ट करण्याकरता वेळोवेळी विविध कायदे मंजूर केले गेले होते.

(१) जाती अयोग्यता निवारण कायदा (१८५०) : या कायद्यामुळे कोणत्याही व्यक्तीला तिच्या जातीच्या

आधारावर व्यवसाय, धंदा, नोकरी, शिक्षण इत्यादींकरता अपात्र ठरविले जाणार नाही.

( २ ) हिंदू ज्ञानोपार्जन कायदा ( १९३० ) : या कायद्यामुळे विद्यार्जनाचा हक्क फक्त वरच्याच जातीपुरता विशेषतः ब्राह्मणांकरता न रहाता तो सर्व जातीच्या लोकांना मिळण्याची तरतूद करण्यात आली.

( ३ ) हिंदू विवाह अयोग्यता निवारण कायदा (१९४६) : या कायद्यामुळे आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविण्यात आले. त्यापूर्वी अशा तऱ्हेने होणाऱ्या विवाहांना हिंदू धर्माची मान्यता नसल्याने ते कायद्याच्या दृष्टीने अमान्य समजले जात असत.

आता आपण जो समाज म्हणतो त्याला समाज कसा म्हणता येईल ? मानवसमूहात परस्पर भेद आहे व तो भेद असलाच पाहिजे असे जेथे शास्त्र आहे, त्या समाजाला ( समूहाला ) समाज कसे म्हणता येईल ? ते म्हणणेच शक्य नाही.

वर्णात वाद नव्हता; पण शूद्रात वाद झाला तो त्यांच्या कामामुळे ! इंग्रजांचे फोडा व झोडा हे धोरण अजूनही चालले आहे असे नाही का वाटत ?

कोणत्याही समाजात सुधारणा होण्यास आवश्यक गोष्ट म्हणजे तो समाज जागृत व्हावा लागतो. जेव्हा गुलामगिरीच्या बेड्या तोडून टाकण्यास तो समर्थ होईल तेव्हाच तो स्वातंत्र्य मिळवेल व ते टिकवू शकेल व तेव्हाच तो समाज खराखुरा स्वतंत्र होईल.

' कुंपणाने शेत खाल्ले ' अशी म्हण आहे ती जातिसंस्थेला लागू आहे. ती समाजाचे संघटन टिकवून विकास साधण्याच्या दृष्टीने अस्तित्वात आली. पण आज तिच्यामुळे समाज असंघटित होऊन त्याचा विकास खुंटला आहे असे आढळून येते. गुणांवरून जात ठरवण्याचे सोडून ती जन्मांवरून ठरू लागली. जातरूपी वाळवीने हा समाज पोखरून टाकला याचा व्यक्ती व समाज यांच्या आर्थिक जीवनावर विपरीत परिणाम झाला.

म. गांधींच्या मते अस्पृश्यतेचा उगम जन्मधर्मातून नव्हे तर खोट्या अहंकारातून झाला आहे. त्यांनी 'अस्पृश्य' हा अपमानास्पद शब्द काढून ' हरिजन ' हा शब्द दिला. ' हरिजन ' हे वर्तमानपत्र काढून समाजातील दोषांवर कडाडून हल्ला चढवला. हिंदुधर्माने निर्माण केलेल्या या दुष्ट प्रथेचे समूळ उच्चाटन करण्यासाठी १४ आक्टोबर १९५९ रोजी आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. लोकांच्या मनात याविषयीचे मनोरथ यायचे पण ते पाण्यातल्या बुडबुड्याप्रमाणे तसेच विरायचे. अस्पृश्यांना ते एखाद्या महारोग्याप्रमाणे वागवतात. "नरेच केला हीन किती नर ।" ही उक्ती येथे योग्यच ठरेल.

C. H. Colley याचा त्याविषयीचा एक सिद्धांत आहे. ते म्हणतात, " When a class is somewhat strictly herditory class we may call it a caste."

जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती स्वतःच्या मनातून स्पृश्य, अस्पृश्य भेद विसरत नाही तोपर्यंत कायदा करूनही काहीही होणार नाही. वाहतुकीची साधने बस, रेल्वे इ. मुळे सर्व लोक एकत्र येतात व त्यामुळे अस्पृश्यता पाळणे व टिकवणे अशक्य होऊ लागते. औद्योगिक क्रांतीमुळे निरनिराळे कारखाने निघाले त्यामुळे सर्व तऱ्हेचे लोक एकत्र येऊ लागले. शास्त्रीय शोधांमुळे बऱ्याचशा अंधश्रद्धा व खुळ्या समजुती, रुढी या नष्ट होऊ लागल्या आहेत. त्याप्रमाणे त्या संपूर्णतया नष्ट होतील.

" जन्मना जायते शूद्रः । संस्कारात् द्विज उच्यते । " त्याचप्रमाणे कोणताही मनुष्य जन्माला येतो तेव्हाच तो संपूर्णपणे या लालची, दुःखी जगापासून स्वप्नसृष्टीच्या एका अद्भूत जगात वावरत असतो पण त्याच्या मनावर आपणच संस्कार घडवत असतो.

अस्पृश्यांना वेगळा मतदार संघ नको म्हणून जसे म. गांधींनी आंदोलन केले व सध्याचे नेते पण तेच करत आहेत. सामाजिक विषमता मानणे हे मानवाच्या असंस्कृतपणाचे लक्षण आहे. माणूस इतक्या उच्चपदकोटिला पोहचून त्याकडे लक्ष देतो. प्रत्येक जातीस ठराविक स्वातंत्र्य असल्याने ती आपला विकास करत असते व पर्यायाने संपूर्ण समाज विकासाकडे जात असतो. आपल्या सरकारने लोकांना ज्या काही सवलती दिल्या त्या सवलती त्यांना आता अधिकारच वाटू लागल्या आहेत.

ही सामाजिक विषमता फक्त अस्पृश्य जातींवर नाही तर स्त्री-पुरुष, सरकारी नोकर व इतर यांच्यातही पसरली आहे. आपल्यामध्ये सध्या बेकारांची संख्या जास्त आहे यांच्यात झालेली विषमता भयंकर स्वरूपाची आहे.

" दुनियाने हमको क्या दिया है ।
दुनियासे हमने क्या लिया है ।। "

असे लोक का म्हणतात, कारण त्यांना वाटते की आपला दुनियेशी संबंध तुटला आहे. आपल्याला बेकार म्हणून जगावे लागत आहे.

हे विचार मनात येतानाच त्या फॉर्मवर कुठलाही जात, पोटजात लिहायची नाही. फक्त 'भारतीय' म्हणून लिहावयाचे असे मी ठरवले.

याचवेळी रामदासांची एक ओळ मला आठवली.

" त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्यबंध विमोचने ।
मोहीम मांडली मोठी । आनंदवनभूवनी ।। "

□ □

## बाळ झाला आजोबा

बाळ झाला आजोबा
काठी टेकीत चाले
स्वयंपाकघरात येऊन
आई जवळ बोले
' बरंऽका गऽ सून बाईऽऽऽ
भूक नाही मला
आजचा दिवस नको
मला जेवायला '
काय म्हणतेस ' असं का
थोडं तरी जेवा ? '
एवढा ग तुझा
आग्रह कशाला हवा ?
नाहीच तू ऐकत तर—
शिरा मऊ मऊ कर
म्हणतेस तर बापडा
खाईन बशी भर !

— **रवींद्र जगताप,**
अकरावी शास्त्र

# किरणोत्सर्जन व त्याचे उपयोग

नितीन कुलकर्णी
तृतीय वर्ष शास्त्र

किरणोत्सर्जन म्हणजे काय? यूरेनियम प्लुटोनियम, रेडियम यासारखे पदार्थ सतत किरणोत्सर्जन करत असतात. ह्या क्रियेमध्ये हे पदार्थ शक्तिमान असे कण किरणांच्या रूपात बाहेर सोडत असतात. ह्या कणांचे अल्फा कण ($\alpha$ Particles) बीटा कण ( $\beta$ Particles ) आणि गॅमा कण ($\gamma$ Particles) असे वर्गीकरण त्यांच्या शक्तीनुसार केले आहे. अल्फा कण हे कमी शक्तीचे तर गॅमा कण सर्वात जास्त शक्तीचे असतात.

किरणोत्सर्जनाचा उगम त्या पदार्थाच्या केंद्रका ( Nucleus ) मधून होत असतो; यालाच केंद्रीकीय किरणोत्सर्जन ( Nuclear Radiation ) असे म्हणतात. अशा ह्या किरणोत्सर्जनाचा आपल्या रोजच्या जीवनात कसा उपयोग होतो ?

किरणोत्सर्जनच्या निरनिराळ्या उपयोगात 'ट्रेसर–टेक्निक्' नावाचे एक महत्त्वाचे तंत्र आहे. ह्याचा उपयोग वैद्यक शास्त्रात मोठ्या प्रमाणात करतात. शरीरात आपण जी अन्नद्रव्ये घेतो, त्यांमधे आयोडीन नावाचे मूलद्रव्य असते. हे आयोडीन शरीरातील थायरॉइड ग्रंथीमधे साठवले जाते. जास्त वाढलेली थायरॉइड हे आयोडीन बराच काळ साठवून ठेवते. एखाद्या व्यक्तीस आयोडीन [ ($I^{131}$) NaI ह्या स्वरूपात) असलेले पाणी पिण्यास देतात. त्या वेळेस किरणोत्सर्जनाची मोजणी करणारे एक उपकरण गळ्याजवळ बसवतात. हे उपकरण ग्रंथीमधून येणाऱ्या किरणांची मोजणी करते व त्यावरून ग्रंथी जास्त वाढलेली, कमी वाढलेली किंवा नॉर्मल हे ठरवले जाते.

किरणोत्सर्जनाचा शोध घेणारे एक उपकरण ( Tracer ) शिशाच्या ( Lead ) आवरणाखाली ठेवतात. या आवरणात गॅमाकिरण लांब आणि अरुंद अशा मार्गानेच प्रवेश करू शकतात. हे उपकरण रोग्याच्या शरीराजवळ ठेवून शरीराची अतिशय बारकाईने तपासणी करता येते व त्यामुळे मेंदूतील गाठीची ( Brain-Tumour ) निश्चित जागा, आकार शोधून काढता येतो व डॉक्टरांना ऑपरेशन करणे सुलभ होते. रोग्याच्या शरीरातील रक्तप्रवाहाचा अभ्यास करण्यासाठी सोडियम ( $Na^{24}$ ) हे मूलद्रव्य रक्तात टोचतात. हे मूलद्रव्य किरणोत्सर्गी असल्यामुळे रक्तप्रवाहातील मार्गदर्शकाचे कार्य करते. ह्यामुळे रक्तप्रवाहातील अडथळे व रक्तप्रवाहातील दोष सुलभतेने शोधता येतात.

उद्योग धंद्यांमधे निरनिराळ्या पदार्थांचे गुणधर्म तपासण्यासाठी किरणोत्सर्गी पदार्थ व त्याचे शोधक ( Detectar ) यांचा उपयोग करतात. त्यामध्ये पदार्थांची व किरणोत्सर्जनाची एकमेकांवर काय क्रिया होते हे बघितले जाते. एखादी वस्तु कितीही बारीक अथवा जाड असो तिची अचूक जाडी ( Thickness ) ह्या पद्धतीमुळे मोजता येते. या पद्धतीत वस्तु गॅमा किरण किती प्रमाणात अडवते यावरून त्या वस्तूची जाडी मोजता येते.

एखाद्या अपारदर्शक भांड्यामधे द्रव भरला असता तो किती पातळीपर्यंत भरला आहे हे समजण्यासाठी किरणोत्सर्जनाचा उपयोग होतो. उदा. निरनिराळी केचप्स आणि सॉसेस कारखान्यात तयार होत असताना मोठमोठ्या भांड्यामधे ठेवलेली असतात. ही सर्व भांडी अपारदर्शक असतात; म्हणून ह्या भांड्यांमधील त्या द्रवाची पातळी कळण्यासाठी एक किरणोत्सर्गी यंत्र व डिटेक्टर त्या भांड्याच्या समपातळीत परंतु विरुद्ध बसवतात. नंतर ही दोन्ही उपकरणे वर खाली फिरवतात. जेव्हा ती त्या द्रवाच्या पातळी जवळून जातात तेव्हा डिटेक्टरमधील किरणोत्सर्गात एकदम बदल घडून येतो. त्यावरून भांड्यातील द्रवाची पातळी ठरवता येते.

विमान जेव्हा हवेत उंच उडत असते तेव्हा हवेच्या घर्षणामुळे विमानाच्या पंखांवर विद्युद्भार ( Charges ) तयार होतो. ह्या विद्युद्भारामुळे पंखांवर बर्फ तयार होण्याचा संभव असतो. हे टाळण्यासाठी विमानाच्या पंखांवर किरणोत्सर्गी उपकरणे ठेवतात व त्यामुळे पंखांवर बर्फ तयार होण्याचा धोका टळतो.

उंच उंच इमारतींवर किंवा टॉवर्सवर विद्युद्भारनाशक ( Lightning Rods ) उभे केलेले असतात. ते ढगातील वीज शोषून घेतात आणि जमिनीत सोडतात, हे आपणास माहीत आहेच. ह्या विद्युत्भारनाशकावर किरणोत्सर्गी उपकरण बसवून नाशकाची उंची परिणामकारकरीत्या वाढवत्या येते, व त्यामुळे नाशकावर तयार

होणारा स्थिर विद्युद्भार ( Static chargs ) सुलभतेने नाहीसा करता येतो.

आता किरणोत्सर्जनाचा जीवशास्त्रीय दृष्ट्या कसा उपयोग होतो ते पाहू.

शेतीमध्ये पिकांवरील जंतुनाशके प्रभावी करण्यासाठी सल्फर ( $S^{32}$ ) हे मूलद्रव्य जंतुनाशकात टाकले आणि ते पानांवर फवारल्यावर पानामधील किरणोसर्जन ( $S^{32}$ मुळे झालेले ) मोजले तेव्हा असे आढळून आले की जंतुनाशके पाण्यात मिसळून मारण्यापेक्षा तेलामध्ये टाकूग पिकांच्या मुळातून दिल्यास जंतुनाशके पानांवर योग्य तो परिणाम करतात.

किरणोत्सर्जनाने एखाद्या पेशीतील रेणूंची संख्या बदलून पेशीच्या जननक्रियेत बदल (change in genetic mutations) घडवून आणता येतो; ह्या गुणधर्मांचा फायदा घेऊन शास्त्रज्ञांनी त्यांना हव्या त्या जातीचे कीटक, वनस्पती थोड्या काळात तयार केल्या आहेत. पुरेसे रेणू बदलल्यास ती पेशी मरते. ह्या तत्वाचा उपयोग कॅन्सरच्या पेशी मारण्यासाठी होतो. ह्यामुळे कॅन्सरची तीव्रता कमी होते तर काही वेळेस कॅन्सर बरा होऊ शकतो.

किरणोत्सर्जनाने जीवाणु ( Micro organisms ) मरतात. त्यामुळे रेफ्रिजरेशनला पर्याय म्हणून किरणोत्सर्जनाचा उपयोग करतात.

तर अशा रीतीने किरणोत्सर्जन ही मानवी जीवनाच्या दृष्टीने मोठी उपयुक्ततेची बाब आहे. किरणोत्सर्जनाच्या शोधामुळे आजपर्यंत उद्योगधंद्यात लाखो रुपयांची बचत झाली आहे आणि वैद्यक शास्त्रातील त्याच्या उपयुक्ततेमुळे अनेकांचे प्राण वाचले आहेत. मात्र ह्या सर्वांचे श्रेय रात्रंदिवस मानवी कल्याणासाठी झिजणाऱ्या शास्त्रज्ञांना दिले पाहिजे.

## कसा मी आसामी

कसा मी असामी
कसा मी, असा मी
कधी पर्वतही क्षुद्र
कधी टाचणीचे छिद्र
कधी उंच गगनात
कधी जातो पाताळात
कधी अहंकार माणसाचा
कधी नम्रतेचा साचा
कधी गूढ अन् गंभीर
कधी देतो दुसऱ्यास धीर
कधी वागतो समतोल
कधी बिघडतो, जातो तोल
असा मी असामी
न कळे कसा मी,
न कळे कसा मी—

—संजय गोपाळ देशपांडे
द्वितीय वर्ष साहित्य

# अर्पायचंच राहून गेलंय....

**विजय देगावकर**

बारावी कला

काळ आपली पावलं उचलीत होता. दिवस उगवत होता, मावळत होता. जगाचे रहाटगाडगे गरगर फिरत होते. नित्यनियमाने, अखंडपणे,... याची आपणाला दखलच नव्हती. आपण गुंग होतो. वर्तमानात भविष्याची उमललेली बाग पहात. त्या बागेतील पुष्पांचा अनामिक सुगंध हृदयात साठवीत गोड हुरहूर हृदयात बाळगून गुंग होतो स्वप्नसृष्टीत.

'मनोद्यान' बहरलं होतं. आंब्यांची थोराड झाडं सर्वांवर जणू मायेचं छत्र धरून उभी होती. आभाळाला गाठण्याची दुर्दम्य इच्छा मनाशी बाळगून युकॅलिप्टस्‌ची झाडं उंच उंच वाढत होती. तू आणि मीसुद्धा रंगीत स्वप्ने पहात होतो. फुलपाखरांचे रंग डोळ्यात साठवत होतो. गोड अनामिक हुरहूर हृदयाशी कवटाळून.

बाग बहरली होती. डाळिंबे पिकली होती. डाळिंबातील मोत्यांचे दाणेमात्र तुझ्या रसरशीत अधारांवर नाचत होते. चमकत होते, पण संयम होता – बंधन होते, प्रीतीचे, उत्कट आणि निःस्वार्थ प्रीतीचे.

तू खूप खूप बोलायचीस आभाळाविषयी, त्याच्या अफाटतेविषयी. निसर्गात रमायचीस. तुझ्या गोष्टीत आभाळ निळं निळं आणि सागर हिरवा-निळा असायचा. तुला पुष्कळ मागायचं असायचं. ते मी तुला पुरवायचा प्रयत्न करीत होतो. तरीही सर्व काही अपुरं असायचं. खूप खूप काहीतरी द्यावंसं वाटायचं...पण काय तेच उमगायचं नाही. तू मला प्रतिभा दिलीस– मी तुला कविता अर्पण केली. प्रतिभा तुझीच होती तर कविताही तुझीच. माझी असून तुझीच. कारण प्रतिभा तू दिलीस ना!

आंब्याची झाडं मोहरानं ओथंबली होती, बहरली होती. कडुलिंबाचा दर्प दरवळत होता. तो हुंगावासा वाटत होता. तू आपल्या हृदयात तो भरून ठेवायचीस. अखेर स्मितहास्यानं तो तुझ्या मुखावर दृश्यस्वरूपात ओसंडायचा.

पण अचानक धुकं पसरलं, मोहोर गळून गेला, बहर करपला, सुगंध नाहीसा झाला आणि तुझ्या मुखावरचं स्मितहास्य तुझ्यासह हरवलं – तू धुक्यात हरवलीस. मी खूप शोध केला तुझा. आणि करतोय, करीत राहीन, आभाळाच्या अनंततेत, सागराच्या अफाटतेत. कारण तुला मला काही अर्पायचंय ना? तुला हवंहवंस वाटणारं, तुझं हृदय भरून देणारं, अनामिक हुरहूर लावणारं असं आणि असंच काहीतरी खूपखूप आणि अनंत, अथांग, निस्वार्थ आणि निष्पाप.

मी सर्वत्र भटकतो आहे, बाग सुकलेली आहे, पानं गळाली आहेत, सर्व ओसाड आहे. माझ्या भावना, माझी प्रतिभा, माझी कविता मला कोठेच भेटत नाही. बसस्टॉप रिकामा आहे. सर्व निघून गेलेत तरी मी सुन्नपणे खिन्न होवून उभा आहे. खिळलेला. सगळं कसं सुनं सुनं वाटत आहे. उत्कटता लोपली आहे प्रतिभा नष्ट झाली आहे. कविताही संपलीय, कारण उत्कट भावनांची प्रतिभा असल्याशिवाय का कविता सुचणार? सारं सारं कसं बेसूर आहे, भयानक आहे, भविष्य काळवंडलं आहे. आशेचे किरण नाश पावले आहेत. तरीसुद्धा निराशेवर पडदा टाकून आशेच्या मागे धावतो आहे काही तरी घेऊन तुला अर्पायला.

स्मृतीची पाने उलटत आहेत. पण भास व्हावेत तसे भासतात ते सारे प्रसंग. सारी स्वप्नं होती ती. खरंसुद्धा वाटत नाही. आपण एकदा प्रेम केलं होतं. उत्कट, अनन्त, भावना ओतून, सर्वस्व अर्पून. पण ते कितीही चांगलं अथवा वाईट असलं तरी सत्य होतं. मी फक्त तू दिलेल्या त्या क्षणावरच भरकटत आहे. वणवण चालली आहे. तुलाच देण्यासाठी काहीही जवळ नसताना, पण नसले तरी काहीतरी आहे ही भावना उराशी धरून. तुला वाटायचं आपणाला खूपखूप आकाशाचे रंग हवेत, सागरांच्या लाटांचे थैमान हवे, वाऱ्याचा वेग हवा, जीवनाची गूढरम्य स्वप्ने हवीत, धरती आकाशाचे मीलन हवे. मी ते ते तुला सर्व दिले, कल्पनेनं कवितेतून, वास्तवातून कारण प्रतिभा तू होतीस ना!

आता माझ्याजवळ काही नाही. होतं नव्हतं ते तुझंच होतं. स्मृतीचा भुंगा गुणगुणतो, पाने चाळतो, दोन नद्यांचा संगम होतो, कुठून आलेल्या माहीत नसतात. कोठे जायचे हे सुद्धा माहीत नसते पण आधार वाटतो. ओळख होते. एकरूप होतात आणि मार्गाला लागतात. अखेरपर्यंत एकत्र राहण्याचं वचन देऊन आणि घेऊन अनंतात विलीन होतात. तुला वाटायचं आपणही एकरूप होऊनच राहू – पण तू आता काय म्हणत असशील

मला माहीत नाही. पण एकरूपतेचं स्वप्न उराशी बाळगून मी तुला शोधतो आहे, शोधत राहीन अखेरपर्यंत, अनंतापर्यंत. मात्र तुझ्या आनंदासाठी जर — जर मला निखाऱ्यात पडावं लागलं तर हवंच आहे. जळून जाण्यासाठीच पतंगाची प्रीती ना ? मात्र मी जळताना ज्योती तू असावीस रसरशीत निखाऱ्यांचे डाळिंबी दाणे ओठांवर नाचवत !

क्षणाक्षणाने काळ पुढे जात आहे पण मी धुक्यातच भरकटतो आहे ... स्मृतीची पाने चाळवीत. डाळिंबाच्या झाडाखाली बसून, हातात हात घेऊन एकदा तू म्हणाली होतीस 'तू मला काय देशील ?' मी फक्त दृष्टी खाली केली होती. डोळ्यात पहायचं धैर्य झालं नाही मला. आणि एक स्तब्धता पसरली गूढरम्य, पण सुखद, काही वेळाने डोळ्यात पहात मीच बोलून गेलो 'सर्वस्व.' त्यावेळी तू मिठीत हरवून गेलीस. आणि तुझ्या डोळ्यातून हसऱ्या टपोऱ्या डोळ्यातून मौक्तिकांची वृष्टी झाली. मी ओंजळीत साठवून शब्दफुले तुला अर्पिली. तुझीच ती, कारण मोती तुझेच, शब्दफुले तुझीच असणारं. मोती नसते तर शब्दफुले उमललीच नसती. त्यांना एक सुगंध होता तुझ्याचमुळे. तुझी दृष्टी त्यांच्यावर पडली आणि अवकाशात संध्येचे रंग खुलावेत त्याप्रमाणे ती अनन्त रंगानी खुलून फुलली. मी ती तयार केली. तुझ्याचसाठी—केवळ तुझ्याचसाठी.

डाळिंबाच्या झाडाला पुन्हा बहर आला आहे. मंद अनामिक सुगंध पसरला आहे. माझ्या स्मृतीत गढलेल्या मनाला गोड गोड भास होत आहेत. डाळिंब पुन्हा बहरला, तशीच माझी प्रीत पुन्हा बहरेल असे वाटते आहे. धुके विरते आहे पण तू दिसत नाहीस. पुन्हा धुके पसरते व मनाचा गाभारा अभ्राच्छादित होतो. मूर्तीच दिसत नाही. मी मलाच विचारतो—असा मूर्तिभंग का व्हावा ? ती पुजली जाण्यापूर्वीच ? फुले निर्माल्य का व्हावीत ? ती वाहिली जाण्यापूर्वीच ? देव्हाऱ्यातून अचानक देवच नाहीसा झाला तर फुलांची ओंजळ कुणाला अर्पायची ? की देव येईपर्यन्त सांभाळायची ?

होय, मी पुष्कळ काही तुला द्यायचं ठरवलंय, पण तुझाच पत्ता नाही. शब्दफुले विरहाने करपत आहेत, समुद्र एकदम शान्त आहे, आकाश ढगाळलेलं आहे. वातावरण कुंद आहे, माझ्याजवळचे डाळिंबाचे झाड हळूहळू सुकत आहे. डाळिंबेही सुकतील व त्यातील मोती इतस्ततः विखुरतील. गोळा करताना येण्यासारखे आहेत ते. माझी ओंजळ आता भावफुलांनी, विरहाचा गंध असलेल्या भावफुलांनी ओथंबली आहे, ती तुला अर्पण करायची आहे. पुष्कळ काही मनात दाटून राहिलं आहे ते ते सारं तुला अर्पायचं आहे, मलाच अर्पायचंय तुला पण ···

अर्पायचंच राहून गेलंय ···

## " वार्ता "

कुणाजवळ देऊ नयेत
आपल्या दुःखाची कोमेजली फुले
कारण वाऱ्याबरोबर त्याचे निःश्वास
दाही दिशांना पसरतात.
मग होते काय ?
मग आपण ज्या झाडाजवळ जाऊ
ती झाडे फुले देण्याऐवजी
काट्यांनी डसतात.
कारण आपल्या कोमेजल्याची वार्ता
आधीच तिथे पोचलेली असते.

**— रेणू आयंगार**
प्रथम वर्ष शास्त्र

# जग एक रंगभूमी

**देवदत्त द. पाठक**
बारावी वाणिज्य

रंगभूमीच्या एका विंगेमधून पाहतोय तो सारं. तोच, तोच घडवतोय सारं; एक अदृश्य शक्ती, एक अदृश्य सूत्रधार, माणूसरूपी कलाकारांच्या कृतीने घडवून आणतोय सारं. त्याच्याच हातून फिरत आहेत या जगरूपी रंगभूमीच्या दोऱ्या. कधी दुःखाच्या प्रसंगातून तर कधी हास्याच्या कल्लोळातून तो निर्माण करतोय नवीन नाती, नवीन संघर्ष. तोच आहे खरा कर्ता आणि करविता. कोण आहे हा अज्ञात आणि अजात सूत्रधार ? फक्त परमेश्वर......

होय परमेश्वर. तोच आहे जगरूपी रंगभूमीला घडवणारा आणि नाश करणारा. त्यानेच निर्मिलेली आहे ही रंगभूमी. त्याच्या अनाकलनीय दिग्दर्शनाखाली वावरत आहे जगातली प्रत्येक व्यक्ती ... हा प्रत्येक कलाकार परमेश्वराच्या दिग्दर्शनाखाली आपले संवाद म्हणत आहे. उत्कृष्ठ अभिनय करीत आहे. तसे करीत राहणे हे तर त्यांचे कर्तव्य आहे. कोणाला सांगायला नको आहेत संवाद. कोणी करायला नको आहे अभिनय. प्रत्येकाला माहीत आहेत संवाद. प्रसंगानुरूप बोलण्याचे. प्रत्येक व्यक्ती ही एक स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. प्रत्येकाच्या स्वभावात आहेत अतोनात बदल.

या रंगभूमीवर नाटक चालले आहे. अनेक रसांचे. वासनेच्या पोटी जन्माला येतो आहे कामरस; एखाद्या चळवळीतून भडकतो आहे माणसांचा क्रोधाग्नी, लोभापायी उलथापालथ होत आहे या लोकशाहीची; राखरांगोळी होणार की काय या जगाची ? मत्सरापोटी माणूस ओढतो आहे पाय एकमेकांचे; पण त्याचवेळी फुलतो आहे शृंगार सुवासिनीचा; पण याचवेळी जाणेल का कुणी या सामान्य जीवाचे दुःख. ही सत्यता आहे फारच भीषण. पण हे सर्व घडत आहे याच जगरूपी रंगभूमीवर. पण तरीसुद्धा ही नवीन रंगभूमी हवी आहे. कारण यातूनच होत आहे माणसाचे मन जागृत.

तरीसुद्धा माणसाला आपले काम पार पाडावयाचे आहे. एकाच वेळी हा कलाकार पार पाडत आहे अनेक भूमिका. एकाशी तो बोलतो प्रेमाने, पण त्याचवेळी तो बोलतो दुसऱ्याशी कुत्सिततेने. प्रत्येकाचा भूमिकेकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. प्रत्येक प्रसंगाचे वातावरण आहे निराळे. हीच तर आहे ही किमया या सूत्रधाराची. कलाकाराने आपली भूमिका चोख केलेली चांगली. जर तो चुकला तर संपलाच.

परमेश्वराने जन्म दिला आहे, त्याचा पुरेपूर उपयोग करून घ्यायला पाहिजे प्रत्येक कलाकाराने. या सर्वांचा उद्देश हाच आहे की परमेश्वराच्या कार्यात आपण पण थोडा हातभार लावला पाहिजे. या रंगभूमीवरची पात्रे आहेत नानाप्रकारची. प्रत्येक पात्राचा विषय वेगळा आहे. त्याच्या विषयाचे कार्यक्षेत्र आहे नेहमीच वेगळे. प्रत्येकाची रंगभूमीही वेगळी आहे. प्रत्येक विषयाचे वातावरण वेगळे आहे. असे असूनही या सर्व पात्रांचा, घटनांचा परिणाम हा एकच आहे. यात आहे लोकरंजनाची वृत्ती परमेश्वराने निर्मिलेली. पण ह्यामधे कधीही गोंधळ होत नाही; गुंतागुंत होत नाही, हेच तर खरे आहे आश्चर्य या अफाट जग–रंगभूमीचे. ही ताकद आहे फक्त परमेश्वरात. फक्त परमेश्वरच करू शकतो याचे नियोजन. तोच आहे फक्त एक आदर्श दिग्दर्शक, कलाकार या जगरूपी रंगभूमीचा.

## गंधरहित बकुळ

तू अशी दूरदूर
मनी वाटे हुरहूर
मी इथे व्याकुळ
गंधरहित बकुळ

**सुजाता गानू**
बारावी वाणिज्य

# अवचटांची ' माणसं '

## प्रदीप देसाई

बारावी कला

( ग्रंथ परीक्षण – **' माणसं '** – लेखक : अनिल अवचट )

**पुस्तकाचे स्वरूप**:–'माणसं' हे एक नुकतेच काही महिन्यांपूर्वी प्रसिद्ध झालेले अनिल अवचटांचे समाज-जीवनाचा विषय असणारं, अभ्यासपूर्वक पाहाणीनंतर लिहिलेलं असं पुस्तक आहे. यातील सर्व लेख—यापूर्वीच ' मौज 'च्या दिवाळी अंकांतून आणि ' पुरोगामी सत्य-शोधक 'च्या मार्च १९७८ च्या अंकातून प्रसिद्ध झालेले आहेत.

या संकलनातील प्रत्येक लेख वेगवेगळा लिहिला गेला आहे. त्यामुळे प्रत्येक जातीची, प्रत्येक समाजाची एकसुरी समस्या आलेखित झालेली नाही, तर खरोखर प्रत्येक समस्या विचारीपणाने, वेगळेपणाने, मांडली गेली आहे. वेगवेगळ्या वेळी प्रसिद्ध झालेल्या या लेखांचे एकत्रित महत्त्व काही वेगळे आहे.

### पुस्तकाचा विषय :

सर्व लेखांचा विषय हा एका व्यापक सामाजिक समस्येचा, लोकजागृतीचा, सामाजिक बंधुत्वाच्या जिव्हाळ्याचा आहे. तो काही निराश—कृतिहीन लोकांना नकोसा वाटणारा आहे. पण प्रत्येक प्रकरणाचा, लेखाचा अलग अलग अभ्यास-विषय मात्र वेगवेगळा आहे. सर्वांत पहिले प्रकरण आहे ' माणसं. ' या लेखांत विशेषतः उस्मानाबाद, नगर, सोलापूर आणि लातूर या भागांतून दुष्काळापायी कंगाल होऊन पोटापाण्याला, किमान उद्योग मिळवण्यासाठी पुण्याकडे आलेल्या लोकांचे, त्यांच्या शहरातील वाढत्या झोपडपट्टीच्या समस्यांचे, आणि त्यांनी अवलंबलेल्या उद्योगांचे-व्यवसायांचे वर्णन केले आहे. या वर्णनातून त्या लोकांची दयनीय अवस्था तर जाणवतेच, पण त्याच बरोबर त्यांचे सध्याचे पोटाचे हाल आणि पुढे निर्माण होणारी अतिरेकी परिस्थिती डोळ्यापुढे येताच त्यांच्याकडे केवळ सहृदयतेने पाहाणाऱ्यांची कीव येण्याच्याही पलीकडची स्थिती प्राप्त होते. त्यांचे वर्णन अभ्यासता पोटांत एक प्रकारचे काहूर उठते.

मनुष्य असाहाय्य झाल्यावर कोणत्या थराला पोहोचतो याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. चांगली घरंदाज माणसे, शेतमजूर, बऱ्यापैकी उद्योग-व्यवसाय असणारी माणसे, असाहाय्य बनून, टी. सी.—कंडक्टरच्या शिव्या खाऊनही निर्लज्ज बनून मारझोड सहन करूनही, विनातिकीट प्रवास करताहेत. पुण्यात आल्यावर अतिशय घाणीत, झोपडपट्टीत आणि तेही त्यांच्या अगोदरपासून राहाणाऱ्या झोपडपट्टी-वासियांचा जाच सहन करत राहाताहेत. पोटासाठी म्हणून मजुरीची कामे शोधतात, ती वाटेल त्या मजुरीवर करण्यास तयार होतात. ती मिळणे अशक्य होतं तेव्हा भंगार मिळवून ते डेपोला घालण्यासारख्या विनाभांडवली धंदा सुरू करतात. पण पुढे अशाच प्रकारचे असंख्य लोक या भागात आल्याने तो धंदा अशक्य होतो. शेवटची पायरी म्हणून ते भिका मागून पोट भरण्याचा प्रयत्न करतात. अशाच लाचारीतून चोरी गुन्हेगारी वृत्ती निर्माण होते आणि ते किरकोळ भुरट्या चोऱ्या सुरूही करतात. त्यामुळे ते वेळोवेळी पकडले जातात. मग मारहाण ही ठरलेलीच. पण मूळ मनात पापभावना नसते. खाण्यापिण्याच्या आबाळीमुळे शारीरिक कमजोरी आलेली असते. सामान्य,मध्यमवर्गीय यांना जवळ करत नाहीतच. शिवाय ज्यांच्या प्लॉटमध्ये जागेत हे आपल्या झोपडपट्ट्या उभारतात त्या मालकानेही हुसकावले की मग मात्र त्यांच्या पाठीशी कोणीही नसल्याने यांची स्थिती अक्षरशः जनावरापेक्षाही वाईट होते. केवळ मरत नाही म्हणून जगणारी ही ' माणसं. '

### ' कोण माणसं कोण जनावरं '

या लेखात आपल्यापुढं प्रश्न उभा राहतो—' खरंच शेतकऱ्यांबरोबर तो करेल तितका वेळ त्या सोबत काम करणारी आणि भरपूर खाऊन स्वच्छंदपणे आराम करणारी ती जनावरं की भवानी पेठ, माल धक्का, सरकारी गोडाऊनात दिवसातल्या २४ तासांपैकी १८-२० तास रक्ताचं पाणी करणारे, अर्धपोटी संरक्षणहीन स्थितीत जगणारे हमाल म्हणजे जनावरे ? ' हा लेख वाचल्यावर वाटतं आपण आजवर फक्त समोरून एखादं कपाट हातगाडीवरून वाहणारा किंवा पाठीवरून एक धान्याचे पोते वाहणारा कामगार पाहिला. आम्ही हमाल पाहिला तो तेवढाच. पण प्रत्यक्षात मात्र पेठेत काम करणाऱ्या हमालाची स्थिती किती भयानक आहे ? त्याचे जीवन अतिशय खडतर असते. एकदा वयात आल्यावर तो धंद्यात पडतो. धंद्याला

अनुसरून अवयवही आवश्यक क्षमता धारण करतात. अंगाला एक साचेबंद वळण लागते आणि आयुष्यभर नको वाटले तरी तेच काम करावे लागते.

कामगारांच्या कामात एक प्रकारची यांत्रिकता आलेली असते. तो ठराविक आसाला गुंफला जातो. तो व्यवसाय तो पुढे कधीही सोडू शकत नाही. या साचेबंदपणामुळे त्याच्या खाण्या-पिण्याच्या सवयी बदलतात. त्याचे जीवन उध्वस्त करतात. मनुष्यत्वापासून त्याला लांब नेतात. उदाहरणार्थ, गुळाच्या हमालाची पाठ अतिशय कठीण बनते. भिंत दगडापेक्षाही कणखर रूप ती धारण करते आणि तो हमाल त्याच्या जीवनात तसाच दगड बनतो. पोती वाहाणाऱ्या कामगाराची मान बसते. तो कमरेत कायमचा वाकतो. आणि आयुष्यातही पुन्हा ताठ होऊ शकत नाही. मिरची गुदामातील कामगारांची संपूर्ण शरीराची जळजळ तर कधीच थांबत नाही. ठसका, मळमळीच्या भीतीने त्याला जेवण पूर्ण घेणंही अशक्य असतं. त्यामुळं तो नेहमी कमवूनही कमीत कमीच खाऊन जगतो आणि आयुष्यभर, खाण्याच्या संदर्भात असंतुष्ट राहातो. खत-सिमेंटातला हमाल टी. बी. सारखे असाध्य रोग धारण करतो आणि त्यातच अंत पाहातो. अशाच प्रकारची प्रत्येक हमालाची अवस्था असते. वास्तविक पाहाता शेट लोकांनी त्यांना थोडा न्याय दिला तर ते सुखी बनतील. पण अद्याप असाहाय्य हमालांपाठीशी ठाम शक्ती नाही, त्यांची प्रभावी संघटना नाही. त्यांना कोणी वाली नाही. या ठिकाणी सर्व असाहाय्य हमालांचे वर्णन करून शेवटी अवचटांनी सरकारी गोडाऊनातील संघटनेच्या मार्गाने सुखी झालेल्या हमालांचे उदाहरण देवून या प्रकारातून सुटण्याचा मार्गही दिला आहे. सामान्य हमाल तर हे पुस्तक वाचणार नाहीत. तरीही हा मार्ग सुचवलाय याचे कारण आपण या समस्येची उकल या मार्गाने करू शकतो. आपण सामान्यांनी हा प्रश्न समजावून घेऊन हाताळणे श्रेयस्कर ठरेल.

**वस्त्या माणसांच्या :–**

लोक परिस्थितीमुळे, दारिद्र्यामुळे दरिद्री, ओंगळ, घाणेरडे बनून विटाळतात. आणि तशाच घाण वातावरणाच्या सततच्या सहवासाने त्याबद्दल त्यांच्यात घृणेऐवजी आपुलकीच निर्माण होते. प्रथम अशा प्रकारची माणसं शेतमजूर असतात, छोटे शेतकरी असतात, अगदी किरकोळ कामं करणारी साधी फाटकी माणसं असतात पण ती गावाकडे असतात. त्यामुळे किमान दोन वेळचे पोटभर किंवा अल्पसे का होईना अन्न मिळवतात आणि कोणाच्याही जाचाशिवाय वावरतात. पण एखादं वर्ष दुष्काळ पडतो. पाऊसच येत नाही. मग शेतात धान्याचा कण पिकत नाही अशा वेळी किमान पोट चालण्यासाठी सरकार, दुष्काळी कामाच्या योजना काढतं. कसेबसे ते वर्ष पार पडते. पण जर पुढेही काही मोजकीच वर्षेही दुष्काळाचं साम्राज्य राहिलं तर परिस्थिती सरकारच्याही आवाक्याबाहेर जाते. मग या असंख्य दुबळ्या, हतबल अशा सामान्यांचा प्रश्न बिकट बनतो. प्रथम ते पोटासाठी घरातील भांडी विकतात, वस्तू विकतात, त्या संपल्यावर शिल्लक असते राहाते घर, पण ते तर वाडवडिलांचे. त्या मागे त्यांच्या भावना गुंफलेल्या त्यामुळे ते न विकताच हे लोक किमान जगता येईल या आशेने शहराचा रस्ता धरतात. विना तिकीट प्रवासाला सुरवात करतात बसमधून कंडक्टर मध्येच उतरवतो म्हणून रेल्वेने येतात. आधी रेल्वे स्थानकासमोरच्या मोकळ्या जागेत विसावतात. पुढं पुलाखालील मोकळ्या जागेत टेकण्याचा प्रयत्न करतात. पुढे शक्य झाले तर एखाद्या आधीच्या झोपडपट्टीत शिरकाव करतात. दोन वाकवलेले बांबू आणि तरट ठोकून त्यावर मिळेल तो माल लादतात. अशी झोपडी तयार होते. हा खर्च साधारणपणे १५–२० रुपये येतो.

शहरात आल्यावर हाती मिळेल, तो व्यवसाय ते सुरू करतात. भंगार विकणे, मिळवणे, मजुरीची कामे, हातगाडीवरून भाजी विकणे, वगैरे. यापुढेही जाऊन पैसा जास्त मिळण्यासाठी दारू गाळणे वगैरेही ते सुरू करतात. वस्तीतला एखादा माणूस दादा असतो. त्याचेच सर्वत्र वर्चस्व असते. झोपडपट्टीची जागा कोणत्याही प्रकारची असते. गटारी, कॅनॉल, ओढे, नदी, यांकाठी, टेकडीवरही असू शकते. घाणेरडेपणा तर फारच. सुरक्षितताही मुळीच नसते. टेकडीवरून कधी दरड कोसळते. तर छोट्याशा पुरात झोपड्या वाहून जातात, कोसळतात हा त्रास वेगळाच. पण एकदा आपत्तीतून निसटल्यावरही ती मूळ जागा आपल्याला मिळू शकेल की नाही अशी भीतीही असतेच मनात. यांचे व्यवसाय समाजाशी निगडीत असल्याने त्याजवळच त्यांना राहावे लागते. त्यामुळे ते दाटीदाटीने राहातात. संडास एखादाच, तोही फुटून घाणीचे तळे झालेला आणि त्या भोवती सारी वस्ती असते. प्रत्येक झोपडीच्या अंतर्भागातही डुकरासारख्या गलिच्छ, प्राण्यांचाही सर्रास वापर असतो. अशा प्रकारचे हे वर्णन अतिशय गलिच्छ, किळसवाणे वाटणारे असले तरी

अवचटांच्या शैलीतून वाचतानाच आपण न कळत त्या ठिकाणी पोचल्यागत वाटते. ते किळसवाणे जग समोर साकार होते.

**अनिकेत ':—**

या लेखाची सुरवात अवचटांनी अतिशय आकर्षक केली आहे. प्रथमतःच भटक्या, विमुक्त जाती आणि जमातींचे लोक त्यांच्या परंपरागत ठराविक उर्साला, जत्रेला जमण्याच्या त्यांच्या रूढीचे वर्णन केले आहे आणि त्याच्यातच त्यांचे देव, बळी देण्याच्या विविध पद्धती, शारीरिक ठेवण आणि त्यांचे रूढ व्यवसाय यांचेही वर्णन केले गेले आहे.

पुढे प्रत्येक भटक्या जमातींचे अलग अलगपणे सूक्ष्म अवलोकन केले आहे. त्यांचे पुरातन कालापासून चालत आलेले व्यवसायच ते अद्यापही करताहेत, त्यामुळे त्यांचे स्वतःचे आणि समाजाचे काय काय फायदे होतात, हेही फार सुंदर पद्धतीने सांगितले आहे. उदाहरणार्थ, वैदू लोक जंगल दऱ्यांतून फिरतात. काष्ठ, मुळी, साली जमा करतात. औषधं म्हणून गावात विकतात. वास्तविक त्या-बद्दल त्यांना प्रशिक्षण नाही, ज्ञान नाही. त्यामुळे बऱ्याचदा औषधाचा वाईट परिणाम होतो. त्यांना मार बसतो. असा तोटा होतो तर बऱ्याचदा त्यांना अनेक औषधे माहीतही असतात. ते खेड्यांतून फिरतात तेव्हा त्यांना आणिक प्रशिक्षण मिळाल्यास खेड्यात अनायास डॉक्टर, वैद्यक मिळतील. नाहीतरी आमचे सुशिक्षित पदवीधर डॉक्टर खेड्यात जातच नाहीत. वैदूंचा मुख्य व्यवसाय असाध्य शिकारी करून पोट भरणे हा होय ते मोठ्या सुसरी, कासव वगैरेंच्या शिकारी करतात म्हणून ते आक्रमकही असतात. ते बोलके आहेत. माणूस आणि आसपासची परिस्थिती पाहून खोटे रचलेले भविष्यही हे लोक सांगतात. त्यातही काही वेळा मार खातात.

या आदिम समाजात अघोरी देवता आणि अघोरी उपासना यांचे प्राबल्य असणे साहजिक आहे. माणसाचे ज्ञानच इतके अपुरे आहे की दैनंदिन जीवनाव्यतिरिक्त काही घडल्यास त्याला तो चमत्कार वाटतो. उदा. एखाद्या स्त्रीला जुळे जन्मले तर तिने व्यभिचार केला असे मानून तिला देहान्त देतात. नैसर्गिक वातावरणात फरक पडल्यास प्राण्यांचे बळी वगैरे प्रकार सुरू होतात. देव-देवतांपाशी यांच्या भावना फारच गुंफल्या गेल्या आहेत. बळी देण्याचे तर इतर समाजात नेहमीपेक्षाही वेगळे मार्ग, पद्धती अवलंबतात. उदा. रेड्याच्या मानेला भोक पाडून धमनी तोडून एकातून रक्त देवीवर सोडायचे तर दुसरी-कडून लोकांनी पोटभर ते प्यायचे. किंवा गर्भधारी शेळीचे जिवंतपणी पोट फाडून आतील कवळ्या जीवाच्या रक्ताने देवीला आंघोळ घालणे वगैरे.

कितीही उच्च स्तरावरील गुन्हे घडले तरी अद्याप सर्वसामान्यांप्रमाणे ते कोर्ट-कचेरीत येत नाहीत तर टोळीतील पंचायतीद्वाराच ते मिटवले जातात. प्रत्येक पंचायतीचे नियम, शिक्षा वेगवेगळे असतात. अघोरी असतात. निर्णय सामान्यांना न मानवणारे असतात.

अवचटांचे भटक्या जाती-जमातींचे वर्णन वाचल्यावर वाटू लागते की अडाणी, ओंगळ, अर्थहीन जीवनाला अर्थ नाही असे मानणे चुकीचे आहे त्यांना आपण सहकार्य द्यायला हवे, सहजीवन द्यायला हवे, त्यांचेही जीवन सुसह्य बनून त्याला स्थैर्य प्राप्त होईल, असे काही करायला हवे. या लेखाच्या अखेरीस आदिम भटक्यांना दिलेली उपमा फारच सूचक आहे. ते म्हणतात, " भट-क्यांचे जग पाहाताना, हिरवळींचा शोध घेत हिंडणाऱ्या आफ्रिकन हत्तींच्या कळपांची आठवण होते. हे हत्ती गेला हजारो वर्षे त्याच मार्गाने स्थलांतर करीत मूळ ठिकाणी परत येतात. या भ्रमंतीत एखाद्या वर्षी उन्हाळा खूप कडक लागला की कुठले पाणी आणि कुठली हिरवळ? आधी पडलेले हत्तींचे सांगाडे हुंगत ते हत्ती त्याच मार्गाने पुढे जात राहतात. टिकतात ते जातात पुढे; नाही ते तिथेच हाडे टाकतात. "

**' अंधेरनगरी निपाणी :—**

विडीकारखानदारांच्या गुलामगिरीखाली अनेक हतबल, शक्तीहीन विडीकामगार भरडले जात होते. निपाणी एक प्रकारची अंधेरनगरीच बनली होती. तिथल्या कामाच्या, राजकारणाच्या विशिष्ट साच्याबाहेर तिथल्या बातम्या जाऊच शकत नव्हत्या. विडीकामगारांच्या समस्या जगाला कळूच शकणार नव्हत्या. अशाच प्रकारचे खडतर जीवन जगणारे अन्य अनेक व्यवसायी इतरही अंधारनगऱ्यांत जीवन कंठत असतील पण या ठिकाणी अवचटांनी निदान एखादी नगरी तरी उजेडात आणायला मदत केली तिला प्रकाश—मार्ग दाखवला म्हणायला हरकत नाही. यावरून या समस्येची साधारण कल्पना येते. आणि जगतात उद्योगातून होणारी पिळवणूक जाणवते.

विडी कामगारांना मुळात सरकारने ठरवलेला भाव कारखानदार देतच नाही. मिळतो तो फारच थोडा. इतका थोडा की कुटुंबात प्रत्येकाचे हात चालले तरच प्रत्येकजण किमान निकृष्ट जेवण एक वेळेलाच जेवू शकेल. ही मोठी हलाखीची स्थिती. पण याची पुढची पायरी म्हणजे यांचे लगाम पूर्णपणे शेठकडे असतात. ते लोक निमप्रतीच्या विड्या छाट विड्या म्हणून काढतात. त्या हिशेबातून वजा करतात. त्या छाट नसतानाही रागाने, सूड भावनेने किंवा छळण्याकरता काढल्या जातात. स्त्री-कामगारांच्या छाट विड्या कमी काढतात म्हणून खेपेला नवरे आपल्या बायका-पोरींना पाठवतात तर या वेळी कारखानदारांचे मुनीम स्त्रियांचे हात दाबणे किंवा वक्ष-भागावर विडीची बंडले फेकून मारणे वगैरे चावट चाळे करतात. शेट आणि त्याची मुले यांच्या तर या स्त्रिया म्हणजे जणु खाजगी संपत्ती असते. कोणत्याही प्रकारे त्यांचा ते सर्रास वापर करतात. 'या जगांतील समस्त दुःखांचे कारण म्हणजे दुर्बलता होय. आपण शक्तीहीन आहोत म्हणूनच आपल्याला दुःख भोगावे लागते.' हे स्वामी विवेकानंदांचे वाक्य या उदाहरणात सार्थ वाटते. या ठिकाणी कामगारांची कोणत्याही प्रकारची संघटना नाही. ज्वलंत नेतृत्व नाही. म्हणजेच पाठीशी खंबीर शक्ती-धैर्य नाही आणि याचाच फायदा समस्त कारखान-दार उठवतात.

दिवसातील बहुतेक वेळ विडी वळण्यासाठी पोक काढून बसावे लागल्याने आणि झोपडपट्टीत, घाणेरड्या-ओल्या जागेत राहिल्याने त्यांच्यात रोगांचे प्रमाणही फार मोठे आहे.

**'माणसं'चे समाजशास्त्रीय महत्त्व:—**

एकंदर या पुस्तकाचं समाजशास्त्रीय दृष्ट्या फार महत्त्व आहे. समाजाच्या प्रत्येक घटकाने एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे की आपण ज्या समाजात जन्मलो त्याचं आपणावर ऋण आहे. आपण त्याचे काही देणं लागतो. तेव्हा त्या प्रत्येकाने हे पुस्तक वाचून मार्गदर्शन मिळवून, सामाजिक समस्या उकलून घेवून यथाशक्ती मदत करणं अत्यंत आवश्यक आणि अनिवार्य आहे.

जगात आपल्या अवती-भवती कोणत्या गोष्टी चालल्यात चालताहेत याची दखलही सामान्य माणूस घेत नाही. अशा वेळी त्याला जागृती देण्याचा, मार्गदर्शन करण्याचा छोटासा प्रयत्न अवचटांनी या पुस्तकामार्फत केला आहे. समाजात काही वर्ग किती निम्न तळाला आहेत, मागास आहेत, त्यांच्या समस्या काय आहेत? आणि सारांशाने त्यांना आज कोणत्या, कशा प्रकारच्या शक्तीची गरज आहे? याची थोडक्यात पण स्पष्ट उकल अवचटांनी केली आहे.

समाजशास्त्राबरोबरच या मागचा आर्थिक प्रश्नही स्पष्ट होतो. प्रत्येक व्यक्तीही जशी गरिबांत गरीब राहाते आहे तशीच एकंदर समाजाची आणि राष्ट्राचीही आर्थिक प्रगती होत नाही. आज भारतातील आर्थिक सत्ता ठराविक लक्ष्मीपुत्रांच्याच हातात एकवटलेली आहे. केंद्रीकरण झाले आहे. समाजाच्या निम्न थरातील लोक किमान एक वेळेलाही पोटभर चांगले अन्न खाऊ शकत नाहीत. सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा आहे की पैशाच्या जोरावर सर्वच क्षेत्रांत अशा धनिकांचे वर्चस्व आहे. म्हणून यात शासनाने निस्पृह कार्य करण्यासाठी आपली शक्ती वापरावी. योग्य योजना आखाव्यात आणि एकंदर व्यक्तिपासून राष्ट्र उभारणीपर्यंत मदतीचा हात दिला पाहिजे.

अवचटांनी पुस्तकात वर्णनातून समस्या मांडली आहे, यरीचशी उकल केली आहे. तर प्रस्तावनेत ना. ग. गोरेंनी "मेलेल्यांना जाळावे लागते, जळलेले उभारावे लागते, नागडे उघडे केलेल्यांना पुन्हा धडुते नेसवावे लागते. आपल्या डोळ्यांतील आसवे आपल्यालाच आपल्या हातांनी पुसावी लागतात आणि फाटून चिंध्या झालेल्या जीवनाला पुन्हा टाके घालावे लागतात." अशा प्रकारची वाक्ये सांगून त्यातून आपल्या कर्तव्याची जाण दिली आहे. याचा अर्थ असा की समाजजीवन हेही अशाच प्रकारचे आहे. ते पुनःपुन्हा ठेचकाळत, घायाळ आणि रक्तबंबाळ होत कालक्रमण करीत आलेले आहे. तेव्हा घडणारं ते घडतच असत, विश्वाचं चक्र अविरत फिरतच असतं, फक्त त्यात परस्पर सहकार्यानं परस्परांचे जीवन सुसह्य, सुखी करणं माणसाच्या हाती असतं.

अनिल अवचटांच हे एक अभ्यासपूर्ण पुस्तक आहेच, याद्वारे त्यांनी सामाजिक समस्यांची बऱ्याच प्रमाणात उकल केली आहे. त्या साहाय्याने प्रत्येकाने समाजाशी आपले नाते आणि कर्तव्य जाणून सामाजिक ऋण फेडण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. मराठी साहित्यात इतका पूर्वाभ्यास करून, तन्मयतेने सामाजिक जाणीव करून घेऊन प्रगल्भ लेखन केलेली पुस्तके अभावानेच आढळतात. त्या अर्थाने मराठी अवचटांकडून एक दिव्य योग साहित्याला दान मिळाले आहे असे म्हणायला हरकत नाही.

# प्रकल्प अहवाल : एक अनुभव

**चंद्रशेखर ढबू, महेश लेले, धनंजय प्रभुणे, प्रकाश नामजोशी, आय्. बी. सिंग**

द्वितीय वर्ष वाणिज्य

१० वी पास झाल्यानंतर आपण सर्व कॉलेजला येतो त्यावेळी शास्त्र किंवा वाणिज्य यांपैकी एक शाखा निवडतो. सध्याच्या दोन-तीन वर्षातला अनुभव असा आहे की वाणिज्य शाखेकडे विद्यार्थ्यांचा कल फार आहे. वाणिज्य शाखेत आपण सर्व दररोजच्या व्यवहारातले शिक्षण घेतो. पण असा प्रश्न निर्माण होतो की आपण जे पुस्तकांत शिकतो ते खरोखर व्यवहारात आहे काय ? या प्रश्नाच्या उत्तराची एक दिशा शोधावी म्हणून आपल्या महाविद्यालयाने 'प्रकल्प अहवाल' [ Project Report ] ही स्पर्धा सुरू केली. सन १९८० मध्ये आम्ही चौघेजणांनी या स्पर्धेत भाग घेतला.

तळेगाव ते पुणे हा आमचा दररोजचा प्रवास. त्यामुळे स्पर्धेसाठी विषय निवडला गेला तो ट्रेन मध्येच. अर्थातच आम्ही सर्वांनी रस्त्यावरील वाहतूक' [ Road Transport ] हा विषय निवडला.

'रस्त्यावरील वाहतूक' या विषयावरील माहिती गोळा करीत असता आम्ही प्रवाशांची वाहतूक हा विषय बाजूला ठेवला. फक्त 'मालाची वाहतूक' ( Goods Transport ) या विषयाचा विचार केला. सर्वसाधारणपणे सामान्य व्यक्तीसमोर रस्त्यावरील वाहतूक म्हणजे फक्त वाहनांच्या साहाय्याने केलेली वाहतूक डोळ्यासमोर येते. पण खोलवर विचार केला तर ही वाहतूक हमालापासून ( Headloads ) सुरू होते तर याचा शेवट ट्रक, एस्. टी येथे होतो.

हमाल लोक थोडे का अंतर होईना पण मालाची वाहतूक करतात. त्यांचे शारीरिक श्रम हे त्यास कारणीभूत आहेत. त्यांचे जीवन हे एक वेगळ्याच प्रकारचे आहे. त्यांची जवळकीने चौकशी केल्यानंतर असे दिसून आले की या लोकांचा नित्याचा आहार म्हणजे केवळ मिसळ पाव. एवढ्याच आहारावर राहून शंभर-दीडशे किलोची ओझी हे हमाल लोक उचलत असतात. मिळेल त्या पैशांत संध्याकाळची भाजी, भाकरी आनंदाने खातात. एक दिवस काम मिळाले नाही तर घरातील सर्व कुटुंबाला त्या दिवशी जेवण नाही अशी त्यांची बिकट परिस्थिती असते.

दुसरा अनुभव आम्ही घेतला तो ढकलगाडी ( Handcarts ) चालविणाऱ्यांकडून, तसेच बैलगाडी ( Bullock carts ) यांच्या साहाय्याने मालाची वाहतूक करणाऱ्यांकडून. त्यांना ५०० ते २००० रुपयांपर्यंत भांडवल गुंतवावे लागते. ढकलगाडीवाले रोज जेमतेम २०–२५ मैल वाहतूक करतात. कधी त्यांना ४०–५० रु. मिळतात तर कधी केवळ १० रुपयांवरच समाधान मानावे लागते. या लोकांची भाऊगर्दी विशेषतः शहरात बाजार-आवारात दिसून येते. बैलगाडीवाल्यांबद्दल आम्ही एका खेडेगावात जाऊन माहिती मिळविली आणि असे दिसून आले की शेतकरी लोक हा व्यवसाय एक जोडधंदा म्हणून करतात. कारण हिवाळ्यापासून पावसाळा सुरू होईपर्यंत शेतीची कामे विशेष नसतात. आणि जवळच्या शहरांपासून खेडेगावापर्यंत इतर ट्रक, मेटॅडोर वगैरे जडवाहनांना सोयीस्कर असे रस्तेही उपलब्ध नसतात. एकदम छोट्या, खडकाळ रस्त्यांवर बैलगाडी, ढकलगाडी, हमाल याशिवाय मालाची ने आण करण्यास दुसरा पर्यायच नाही.

याशिवाय आपण नेहमी पाहातो ती एस्. टी., ट्रक, टेम्पो यांच्याविषयी माहिती गोळा करताना खूप त्रास पडला. तसे पाहता ट्रकड्रायव्हर्स वगैरे लोकांनी त्यांच्या अनुभवानुसार खरीखुरी माहिती दिली. दिवस-रात्र त्यांना शेकडो मैल सलग प्रवास करावा लागतो. चौकशीत असे निष्पन्न झाले की ८० % ड्रायव्हर्स हे मद्यपान सेवन करतात. व त्यांच्या अतिसेवनामुळे अपघात होण्याची जास्त शक्यता असते. घाटगे पाटील ट्रान्सपोर्ट कंपनी सारख्या प्रसिद्ध, अद्यावत् कंपनीच्या मॅनेजरनी आम्हास जेवढी हवी तेवढी माहिती, इतकेच काय पण आपणास रोज किती नफा होतो हे सुद्धा आनंदाने सांगितले.

या सर्व माहितींवर आम्ही Road Transport हा प्रकल्प अहवाल सादर केला.

□ □

# अभ्यास यात्रा

**कु. उमा महाजनी, कु. स्मिता नाखीसकर**
तृतीय वर्ष शास्त्र

कॉलेजच्या शेवटच्या वर्षी दक्षिण भारतातील कन्याकुमारी, रामेश्वर, त्रिवेंद्रम अशी शहरे बघण्याचा योग येईल असे स्वप्नातसुद्धा आम्हाला वाटले नव्हते. परंतु 'अगा नवल वर्तले' आणि जानेवारी ८१ मध्ये आमच्या प्राणिशास्त्राच्या विद्यार्थ्यांची अभ्यास यात्रा ( Study tour ) संपन्न झाली.

पूर्वी ठरल्याप्रमाणे आम्ही विद्यार्थिगण २ जानेवारीला संध्याकाळी सात वाजता पुणे स्थानकावर आलो. आमच्या सहलीचे नेतृत्व करणारे प्रा. दांडेकर आणि प्रा. भोंडे आमची वाटच पहात होते. ठीक आठ वाजता 'जयंती जनता' ने स्थानकात प्रवेश केला आणि डबा शोधण्याची धावपळ सुरू झाली. सामानासह आम्ही आत घुसलो आणि आम्हाला शुभेच्छा देण्यासाठी आलेल्या नातेवाईकांचा भावपूर्ण निरोप घेत गाडीने स्टेशन सोडले.

जवळ जवळ ४०–४५ तासांचा हा गाडीतला प्रवास एरव्ही कंटाळवाणा झाला असता. परंतु गप्पागोष्टी, गाणी, वेगळ्या तऱ्हेचे जेवण नास्ता या गोष्टीत वेळ कसा निघून गेला हे कोणालाच समजले नाही. ४ तारखेला सुमारे तीन वाजता त्रिवेंद्रम या केरळच्या राजधानीत प्रवेश केला. स्नान आणि नास्ता उरकून आम्ही प्राणिसंग्रहालय बघण्यासाठी टॅक्सीने निघालो. तेथे आम्हाला ठाणा कॉलेजची मुले भेटली. सर्वांशी ओळखी करून घेऊन त्यांच्याबरोबर ग्रुपफोटोही काढला. त्रिवेंद्रमच्या दोन दिवसांच्या मुक्कामात तेथील प्रसिद्ध पद्मनाभम् मंदिर, शंखमुखम् बीच व कोबालम बीच पहाण्याचा कार्यक्रम झाला. कोबालम बीचवर अभ्यासोपयोगी असे विविध प्रकारचे समुद्रप्राणी गोळा करण्यात आम्हाला चांगलेच यश आले. इतर ठिकाणी सहसा न आढळणारी विष्णूची शयनी मूर्ती हे या मंदिराचे वैशिष्ट्य. मंदिर फारच भव्य व प्रेक्षणीय असून छतावरचे नक्षीकाम व खांबावर कोरलेल्या विष्णू, लक्ष्मी, सरस्वती यांच्या मूर्ती डोळ्याचे पारणे फेडीत होत्या. आपल्या समजुतीच्या बरोबर उलट ब्रह्माचा जन्म नाभीतून झालेला येथे दाखवलेला आहे. देव एकच परंतु प्रत्येकाच्या जन्मकथा प्रत्येक प्रांतात वेगवेगळ्या दिसतात. अष्टकोनी, मध्यम खांबाचे वैशिष्ट्य म्हणजे टिचकी मारताच प्रत्येक खांबातून निरनिराळ्या स्वरांचे कर्णमधूर आवाज ऐकू येतात. आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे येथील मारुतीला लोण्याने मढवून दुसऱ्या दिवशी हे लोणी प्रसाद म्हणून वाटले जाते. व या प्रसादाने रोगनिवारण होते अशी श्रद्धा या लोकांच्या मनात रुजलेली आहे. विशेष म्हणजे हे लोणी वितळत नाही.

आमचा पुढचा मुक्काम कन्याकुमारीला झाला. कन्याकुमारीचे स्थान विवेकानंद स्मारकाबद्दल प्रसिद्ध आहे. तसेच कन्याकुमारीच्या देवळाबद्दल देखील विख्यात आहे. शंकर आपल्याला 'वर' मिळावा म्हणून तपश्चर्या करीत बसलेली ही कन्यका अजून कुमारिकाच राहिली आहे. येथे नांगरलेल्या बोटीतून आम्ही विवेकानंद स्मारक पाहिले. कुणाही नास्तिकाला नतमस्तक करेल असेच हे स्मारक. येथील प्रशस्त हॉलमध्ये स्वामी विवेकानंदांची ब्रॉंझची मूर्ती उभी आहे व ध्यानधारणेला योग्य असा वेगळा हॉलही आहे. येथील स्वच्छता सुद्धा वाखाणण्यासारखी आहे. कन्याकुमारीचे वैशिष्ट्य असलेला सूर्योदय व सूर्यास्त आम्ही डोळ्यात साठवून घेतला. अगदी आधाशी नजरेने हे दृश्य आम्ही टिपून घेतले.

७ जानेवारीला आम्ही कन्याकुमारीहून मदुराईला रात्री पोहोचलो व दुसऱ्या दिवशी येथील प्रसिद्ध मीनाक्षी मंदिर पाहिले. अतिशय भव्य गोपुरे, छोट्या छोट्या रंगीत पण प्रमाणबद्ध अशा देवादिकांच्या मूर्ती व आजूबाजूला शंकर–पार्वती, नटराज, विष्णू यांच्या मूर्ती ही या देवळाची वैशिष्ट्ये होत. डोळ्याचे पारणे फिटेल असेच या मंदिराचे बांधकाम आहे.

मदुराईहून आम्ही कोडाई कॅनॉलकडे कूच केले. तेथे चहा जेवण करून थोडीशी अभ्यासाबाबत चर्चा केली. या ठिकाणी आमचा मुक्काम "सेक्रेट हार्ट कॉलेज" येथे होता. तेथील फादर मंडळी अतिशय अगत्यशील वाटली. थंडी बरीच असल्यामुळे त्यांनी उबदार कोटही आमच्या हवाली केले.

दुपारचे जेवण झाल्यानंतर कोडाई कॅनाल बोटक्लबमध्ये आम्ही बोटिंग केले. १० तारखेला १०·३० वाजता तेथील म्युझियम बघण्यास गेलो. छोटेच परंतु व्यवस्थित आखणी असलेल्या या म्युझियममध्ये सर्व प्रकारचे प्राणी, पक्षी, सापळे, सर्पांचे काही प्रकार ठेवलेले आहेत. प्रा. भोंडे व प्रा. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली

आम्ही या प्राण्यांचा अभ्यास केला. रात्रीची आमची गाण्यांची, गप्पांची, नकलांची मैफल साजरी झाली. आमची सहचरी कु. मंगला साने हिने नकलांचा कार्यक्रम फारच सुरेख रीतीने सादर केला. नकला बघून आमची हासता हासता पुरेवाट झाली.

तेथून आम्ही १२ तारखेला ६ वाजता रामेश्वरला पोचलो. सकाळी ८ च्या सुमाराला तेथील समुद्रात सापडणारे विविध प्रकारचे व वैशिष्ट्यपूर्ण मत्स्य नमुने प्रा. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली गोळा केले. जेवण करून १२·३० च्या सुमारास भारतातील प्रसिद्ध रामेश्वर मंदिर पाहाण्यास गेलो.

तेथून आम्ही मद्रासला आलो. तेथे मद्रास म्युझियमला भेट दिली. चार मजली म्युझियममध्ये अनेक विभाग होते व प्रत्येक विभागात वर्गीकरण केलेले प्राणी, शिल्पे, वनस्पती मांडून ठेवल्या होत्या. तेथील मांडणी अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आणि अभ्यासाला प्रेरणा देणारी होती.

मद्रासमधील प्रसिद्ध सर्पालय व मत्सालय आम्ही पाहिले. आतिशय खोलगट भागात असलेले वेगवेगळ्या जातीचे विषारी व बिनविषारी सर्प वर उभे राहून निरीक्षण करण्याची सोय येथे आहे.

निरनिराळ्या प्रकारचे मासे प्रत्यक्ष पोहताना कसे दिसतात याचे निरीक्षण आम्ही करू शकलो.

१५ तारखेला सकाळी ९–३० च्या मद्रास-दादर एक्सप्रेसने मद्रासचा निरोप घेतला आणि परतीच्या प्रवासाला लागलो. अनेक प्रकारच्या आठवणी घेऊन, अभ्यासात मौलिक भर टाकून, आतिशय मनोहारी अशी निसर्गदृश्ये डोळ्यांनी टिपून घेऊन, आम्ही आमची वैशिष्ट्यपूर्ण सहल पूर्ण केली. आम्ही बरीच ठिकाणे हिंडलो, वेगवेगळ्या प्रकारचे, बोलीचे प्रदेश पाहिले आणि अपूर्ण असे एक सहजीवन समृद्ध केले.

□□

## ' पाखरू '

ते छोटे पाखरू पाहून
माझे मन गेले भारून
त्याच्या डोळ्यात करुणा होती,
गवतावर विखुरले मोती
आईला डोळे शोधत होते,
आभाळ सारे न्याहाळत होते
त्याच्या आर्त हाकेला,
कुठेच साद मिळत नव्हती
तेवढ्यात त्या पाखराला
लागली चाहूल आईची
डोळे त्याचे आनंदले,
दृष्टभेट धाईची
साऱ्या विश्वाला विसरून,
ते आईच्या कुशीत विसावले
दोघांचे ते प्रेम पाहून,
माझेही डोळे पाणावले

**कु. अंजली शा. मालुंजकर**
तृतीय वर्ष वाणिज्य

# कौतुक

संगीता उम्ब्रेकर
अकरावी कला

: १ :

लोकांची भाषणं
भाषणांत अधूनमधून टाळ्यांचा प्रचंड कडकडाट
प्रत्येक वक्ता सुगंधाचं गुणगान गात होता
तिच्याविषयी गौरवानं, फक्त गौरवानं बोलत होता
भाषणातल्या प्रत्येक शब्दासरशी आनंदित होत होती
ती फुलाबाई – सुगंधाच्या घरची एक झाडूवाली
कौतुकाच्या प्रत्येक शब्दाबरोबर फुलाबाईचा आनंद फुलत होता
तो आनंद तिच्या हृदयात मावत नव्हता.
हृदय फोडून बाहेर येणारा आनंदातिरेक तिला सहन होत नव्हता
पण तिला जणु शाप होता
तिला आपला आनंद उघडपणे व्यक्त करता येत नव्हता
सभागृहाच्या कोपऱ्यात कडेला उभं राहून ती आपल्या
उतू जाणाऱ्या आनंदाला कसं बसं आवरीत होती.
सुगंधा स्टेजवर होती नि फुलाबाई एका कोपऱ्यात
फुलाबाईही खरं तर स्टेजवरच तिच्या बाजूला...
पण...

: २ :

फुलाबाई तरुण नि सुंदर
त्यातून ती अस्पृश्य
घरात कुणाचा आधार म्हणून नाही
कामावरच तिची नि त्याची ओळख झालेली
तिला जगाची माहिती नव्हती
तशीच त्याचीही नव्हती
तो प्रेमाचे खेळ खेळे
फुलाबाईला ते सारं खरं वाटे
एवढा मोठा घरंदाज मुलगा आपल्यावर प्रेम करतोय
या भावनेनं ती फारच सुखावली होती
थोड्याच दिवसात तो दूर झाला
धोका आहे हे समजताच जणू दूर झाला
पण फुलाबाईनं त्याच्यावर मनापासून प्रेम केलं होतं.
त्यामुळं त्याचा अंकुर जगवायचा, वाढवायचा असा तिनं निश्चय केला
एका सुरेख मुलीला तिनं जन्म दिला
नक्षत्रासारखी गोड मुलगी
पण ही अस्पृश्य

त्यातून तिचा जन्म म्हणजे...
फुलाबाई सतत विचार करीत बसे तिला मांडीवर घेऊन
शेवटी तिनं एक धाडसी बेत केला.
शेजारच्या गावचा सावकार मुलासाठी जपतप करी
पण देवानं त्याला दान दिलं नव्हतं
फुलाबाई उठली
तिनं सुगंधाला पोटी धरलं
तिचे मुके घेतले प्रेमानं
तिला न्हाऊ घातलं आसवांनी
सावकाराच्या दारात तिला ठेवून फुलाबाई जड अंतःकरणानं
आपल्या गावी परतली.

: ३ :

मग फुलाबाईचा एक नित्याचा कार्यक्रम असे
काहीतरी निमित्त काढून ती सावकाराच्या गावी जाई.
दुरूनच सुगंधाला पाही.
तिच्या गोड कौतुकाच्या गोष्टी ऐकायला मिळाल्या
तर मनोमन आनंदित होई
सुगंधा शाळेत पहिली आली
सुगंधा कॉलेजात पहिली आली
सुगंधा मेडिकलला गेली
यातल्या कित्येक गोष्टी फुलाबाईला नीट कळतही नसत.
पण मुलीचं कल्याण होतय हे समजे
ती मनोमन देवाचे आभार मानी

: ४ :

आजही फुलाबाई देवावर निहायत खूष होती.
सुगंधाचा सत्कार पाहात होती
तिच कौतुक ऐकत होती
देवाला हात जोडता जोडता फुलाबाई म्हणत होती
" परमेसरा एवढी किरपा केलीस
आता येकच कर
पोरीला पोटी धरता येईल
कौतुकानं तिचा गाल कुस्करता येईल
तिची ' आये ऽऽ ' अशी हाक ऐकता येईल
असं काई कर बाबा
परमेसरा मला पुन्ह्यादा तिची आई कर "

# एक पत्र

नीलिमा शिकारखाने
द्वितीय वर्ष वाणिज्य

प्रिय
लिहू की नको ? .....पण
लिहिलेच आता. हं......
प्रिय
आज आठ दिवस झाले
एका अगोचर नजरेनं अर्थातच तू विचारशील,
आठ दिवस कसले ?
तुझं अर्थपूर्ण हसणं आणि
जिवणीच्या कडेचा पांढुरका प्राण यांची शपथ—
जीवघेणी चेष्टा अशी पुन्हा करू नकोस
तू पाठमोरी होतेस तेव्हा
नागिणीसारखा विळखा घालतो
तुझा शेपटा
आणि
एकांतात माझं कण्हणं मीच ऐकत बसतो
मला पूर्ण प्रतिबिंब परिचित आहे
तुझ्या जीवन सरोवरात
उंच उंच मनोरे
आकांक्षाचे
शिक्षणाचे
गौरवाचे आणि
वाद-स्पर्धेच्या करंडकाचे सुद्धा !
तरीही
मला वाटलं
मी पाहिलं आणि सरोवरात
कडेकडेनं;
हसलेके तरंग उठले वाटतं !
मी पाण्यात हात घातले
माहीत नाही
हाताला पाणी लागणार की नाही
कदाचित;
माझे हात कोरडे....कोरडे !
फार पूर्वी
Once upon a time ( चुकभूल देणे घेणे )
एका सुंदर वास्तु-शिल्पावर मान टेकली होती.
जाग आली तेव्हा
मस्तकातून चार वेदना-पक्षी

चार दिशाना फरार झाले
वेदनांची घरटी अजूनही
निष्पर्ण काटक्यांच्या संगे !
तेव्हापासून
मान कधी टेकवलीच नाही
शैशवाची आठवण
अस्वस्थ करते कधी
कधी स्नेहाची
मायेची कूस हवीशी वाटते
या आदिमायेचा पान्हा
अवचित क्षणाला
भर माध्यान्ही
फुटतो
आणि
मी चिंब ओला
भावनांच्या पावसाने
स्नेह, माया, आणि प्रेमाने !
छपराखाली चार भिंती
दगड-माती शेणाच्या
अजूनही शोधतोय मी
ते स्निग्ध डोळे !
उजेडात देवघरातील समईच्या
इतकी वर्षे लोटली,
चहाच्या कपात मदिरा आली
तरीही
मी अतृप्त; मी प्यासा; मी गुरुदत्त !
वय वर्षे २५
निर्व्यसनी, अव्यंग – चार आकडी पै...पै
एक शरीर मागतय का कोणी ?
नको, नको
रंग नको, नागीण नको
हवय फक्त
मन !
संपृक्त – एकमेकांच्या
भावनांना – संवेदनांना आणि
अवचित दुःखक्षणांना सुद्धा ! उमगणारे
तुला माहीत आहे ?
वेदनांच्या कट्यारीला मूठ असते.
एकांताची !
हे आत्म निवेदन...कशासाठी...कोणासाठी ?

साध्य काय ?
आदि अंतापासून चालत आलेल्या ‘ बापां ’च्या वासनेतून निर्माण
झालेले आयुष्य
उदासवाण्या क्षणांच्या टिकल्या लावलेलं आयुष्य लाथाडून द्यावं
वाटतं कधी तरी असंच
आणि
त्याच क्षणी शेजारच्या खुर्चीचं रिकामेपण जाणवतं
आग्रह नाही
अभिमान नाही
क्रांती बीज नाही
पण दुःख आहे
म्हणूनच
म्हणावंसं वाटतं
अग आज आठ दिवस झाले
कदाचित
एका अस्वस्थ नजरेनं दुरून पाहशील
आणि म्हणशील,
खुळा आहेस
समजून चुकला असशील असं मला वाटलं !
आणि
हेच मी पण म्हणतोय
मी समजलो नाही
हे रोपटं वाढू लागलंय
क्षणार्धात
त्याच्या असंख्य फांद्या मला घेरतील
पानांच्या असंख्य नजरा मला वेडावतील
बुंध्यापाशी मी वेडा
पायाच्या अंगठ्याने माती उकरीत असेन
पण तेव्हांही
मी दिवस किती झाले हेच विचारेन
म्हणून म्हणतोय
घाल घाव बुंध्यावर
त्वेषाने
द्वेषाने
अहंकाराने
म्हणजे उरलेली निष्पर्ण घरटी सुद्धा
पाताळात चिरनिद्रा घेतील
पाषाण डोळे माझे
अंतापर्यंत
क्षितीजरेषा ओलांडून जातील

आणि म्हणतील
खुदा हाफिज !
या स्वगतात
मी तू ही पात्रे निव्वळ काल्पनिक
कोणत्याही जिवंत वा मृताशी संबंध नाही
वाटल्यास निव्वळ योगायोग समजावा
आणि एवढं असूनही
या स्वगतात
एक पॉझ आहे
केवळ तुझ्यासाठी
तुझं स्वगत ऐकायला !
हे केवळ स्वगत
एक काव्य
Traditional प्रेमचिठ्ठी असं म्हटलंच पाहिजे का ?
नको, निदान आज तरी नको
कारण
आता फक्त आठच दिवस लोटले आहेत.
अष्ट दिशांचे दिक्पाल जागत आहेत.
एका पॉझ मधील स्वगत ऐकायला
जय-विजय यांच्या बरोबर
पराजय देखील उभा आहे.
अखेरचा पडदा पाडायला ! !

## ती चांदरात....

आठवते मज अजुनही ती धुंदभरी चांदरात
मोगरा बहरला होता, मोहकला होता परिजात
रातराणीच्या सुमनांचा धुंद गंध येत होता
प्रकाशलेल्या चांदण्या रात्री हात तुझा हाती होता
वारा बेभान होऊन मधुर गीत गात होता
नभी चंद्र हसून प्रीत तुझी-माझी पहात होता.
वाटले नव्हते दोघांनाही शीतल दर्या खवळेल म्हणून
वाटले नव्हते येईल तुफान प्रीत जाईल वाहून.

**कु. विजया कृष्णकांत काकडे**
प्रथम वर्ष शास्त्र

# मुलाखत : एका ' गंभीर ' प्राचार्यांची

**शुभदा थिटे**

द्वितीय वर्ष कला

[ १९८०–८१ ह्या शैक्षणिक वर्षी प्राचार्य स. य. गंभीर आपल्या अध्यापनाची पंचवीस वर्षे पूर्ण करीत आहेत. त्या निमित्ताने विद्यार्थिनी कु. शुभदा थिटे हिने घेतलेली ही त्यांची मुलाखत. ]

**शुभदा थिटे :** सर, आपल्या महाविद्यालयीन-अध्यापनाच्या कालावधीस यंदा २५ वर्षे पूर्ण होत आहेत. १९८०–८१ हे आपल्या अध्यापनाचं रौप्यमहोत्सवी वर्षच आहे म्हणाना ! मी आपलं अभिनंदन करते, आपल्या शुभेच्छा व्यक्त करते आणि हेच निमित्त साधून आपल्या पुढं काही प्रश्न ठेवते. आपण त्याची मनमोकळी उत्तरं द्यावीत ही विनंती.

**प्राचार्य गंभीर :** अभिनंदन व शुभेच्छा यांबद्दल आभार व्यक्त करण्याऐवजी आनंद व्यक्त करतो. कारण तुम्ही या महाविद्यालयाच्या, म्हणजेच माझ्या विद्यार्थिनी आहात. विद्यार्थ्यांचे चार गोड शब्द शिक्षकाला अपार समाधान देणारे असतात. तुमच्या प्रश्नांची मी सविस्तर व मनमोकळी उत्तरं देईन, असं मी तुम्हाला आश्वासन देतो.

[ यापुढे क्रमाने प्रश्न व त्यांची उत्तरे आहेत. ]

आपलं ' करियर ' आपण कसं घडवलं ? अध्यापनाच्या क्षेत्राकडं आपण का व कसे वळलात ?

माझं ' करिअर ' मी घडविलं असं म्हणण्यापेक्षा ते आपोआप घडलं असं म्हणणं योग्य ठरेल. याचं मुख्य कारण म्हणजे आमच्या घरचं वातावरण. माझ्या भावांमध्ये मी सर्वांत धाकटा. सर्व भाऊ व बहिणी ' स्कॉलर ' असल्यामुळं वर्गात कुणाचा पहिला नंबर आला नाही तर त्याला आपण नापास झाल्यासारखं वाटत असे. घरात असलेल्या अशा स्पर्धेच्या वातावरणाचा प्रभाव नकळत माझ्यावर पडला आणि त्यामुळं माझं 'करिअर' आपोआप घडत गेलं असावं असं मला वाटतं.

अध्यापनाच्या क्षेत्राकडं सुद्धा मी असाच नकळत ओढला गेलो. आमच्या महाविद्यालयाच्या ( अहमदनगर कॉलेज ) बी. एस्सी. च्या पहिल्या बॅचचा प्रथम वर्गात पास झालेला मी एकमेव विद्यार्थी. पुणे विद्यापीठात एम्. एस्सी. साठी दाखल झालो. दोन वर्षांनी एम्. एस्सी. परीक्षेत पुन्हा पहिला वर्ग मिळाला. आणि निकालाच्या दुसऱ्याच दिवशी माझ्या प्राचार्यांचं पत्र मिळालं. पत्रात त्यांनी माझ्या अभिनंदनाबरोबरच मी अहमदनगर कॉलेजमध्ये अध्यापनासाठी यावं अशी इच्छा व्यक्त केली होती. दुसरा काहीही विचार न करता मी त्यांची इच्छा प्रमाण मानली आणि तेव्हापासून अध्यापनाच्या व्यवसायास प्रारंभ झाला. अर्थात् त्या काळात — १९५६ साली — अध्यापकाचे जीवन सुखासमाधानाचे होते, त्या व्यवसायास सामाजिक प्रतिष्ठा होती, पगार फारसा नसला तरी पुरेसा निश्चित होता, इत्यादी गोष्टी-सुद्धा मी या व्यवसायाकडे आकर्षित होण्यास अप्रत्यक्षपणे कारणीभूत असाव्या. वडील एज्युकेशनल इन्स्पेक्टर ज्येष्ठ बंधू प्राध्यापक आणि एक भगिनी शिक्षिका असल्या-मुळे—सुद्धा कदाचित मी हा व्यवसाय स्वीकारला असेल.

अध्यापनकार्याची पंचवीस वर्षे पुरी होण्याच्या निमित्ताने मागे वळून पाहताना आपल्याला काय वाटते ? कोणत्या विशेष गोष्टी आठवतात ?

यंदाच्या शैक्षणिक वर्षी माझी अध्यापनाची २५ वर्षे पूर्ण होत आहेत, या निमित्तानं मागे वळून पाहताना माझ्या मनामध्ये पूर्णपणे समाधानाची भावना आहे. या कालावधीत मला अनेक प्रकारचे अनुभव आले, विविध प्रकारच्या विद्यार्थ्यांशी माझा संबंध आला. तथापि माझ्या सर्व विद्यार्थ्यांकडून मला सदैव प्रेम व आदर मिळाला. विद्यार्थ्यांशी मी समरस होऊ शकलो. स्वतःहून स्वीकारलेलं अध्यापनाचं काम माझ्या कुवतीनुसार प्रामाणिकपणे पार पाडू शकलो. सहकाऱ्यांशी मैत्रीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध ठेऊ शकलो. अनेक संस्थांमध्ये काम केले व प्रत्येक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा विश्वास संपादन करू शकलो. एकंदरीत माझी सामाजिक जबाबदारी माझ्या परीने पार पाडली आहे असं मला वाटतं.

या कालावधीतील मला आठवणाऱ्या विशेष गोष्टींचा जेव्हा मी विचार करू लागतो, तेव्हा मनामध्ये इतक्या आठवणी गर्दी करतात की त्यापैकी कोणत्या आठवणी येथे नमूद कराव्यात याचा प्रश्न पडतो.

एका वर्गात किती विद्यार्थी असावेत, याला सुरुवातीच्या काळात मर्यादा नव्हती. अध्यापनाच्या पहिल्या

तासालाच मला २०० विद्यार्थी असलेल्या वर्गाला शिकवावे लागले. विद्यार्थ्यांच्या टाळ्या आणि स्टँपिंगमुळे मला पहिली पाच मिनिटे बोलताच आलं नाही. कारण माझं बोलणं कुणाला ऐकूच जात नव्हतं. त्यातच मला हसू येऊ लागलं. त्याचा परिणाम मात्र उलटा झाला. मी निघून जावे यासाठी होत असलेल्या आवाजांचे अभिनंदनात रूपांतर झाले व मी तास यशस्वीपणे घेऊ शकलो. हा माझा पहिला तास माझ्या दृष्टीने अविस्मरणीय ठरला आहे.

मी शिकविलेल्या अनेक विद्यार्थ्यांनी विद्यापीठ परीक्षांत प्रथम क्रमांक मिळविला आहे. तथापि पहिल्या वेळी विद्यार्थ्याने माझ्या विषयात विद्यापीठात सर्वोच्च गुण मिळविले त्यावेळी मला झालेला आनंद अजूनही आठवतो.

आणखी एक गोष्ट जी सतत घडत असते ती सांगावीशी वाटते. रस्त्याने जात असता किंवा एस. टी. स्टँडवर किंवा स्टेशनवर किंवा दुसऱ्या एखाद्या गावाला गेलो असताना अचानक कुणी अनोळखी इसम समोर उभा राहतो आणि म्हणतो, "सर, मला ओळखलंत का?" नंतर ओळख पटते, तो माझा गतकालातील विद्यार्थी असतो, यशस्वी जीवन जगत असतो. अशा भेटींपासून आणि त्यावेळच्या संभाषणात त्या विद्यार्थ्यानं माझ्याविषयी व्यक्त केलेल्या प्रेम व आदरभावापासून मनाला अतिशय समाधान वाटते. आज माझे असंख्य विद्यार्थी डॉक्टर, इंजीनिअर, कॉन्ट्रॅक्टर, व्यापारी वगैरे अनेक व्यवसायात यशस्वीपणे वावरत आहेत, मोठमोठी जबाबदारीची पदे भूषवीत आहेत, हे पाहून माझे अध्यापकीय जीवन कृतार्थ झाल्याची भावना मनाला सुखद दिलासा देते.

या पंचवीस वर्षांच्या काळात आपल्यासमोर विद्यार्थ्यांच्या दोन पिढ्या घडल्या आणि आणखी एक घडत आहे. तेव्हा आपण विद्यार्थी असतानाचा काळ, वीसेक वर्षांपूर्वीचा विद्यार्थी, गेल्या दशकातला विद्यार्थी आणि आजचा विद्यार्थी यांत आपणास कोणता व कसकसा फरक झालेला दिसतो?

महाविद्यालयीन वातावरणाशी विद्यार्थिदशेची सहा वर्षे आणि अध्यापनाची पंचवीस वर्षे असा एकूण एकतीस वर्षांचा माझा परिचय आहे. या काळात विद्यार्थ्यांची रहाणी, वर्तन, विचारसरणी, शैक्षणिक दृष्टिकोन यांमध्ये सतत बदल झाल्याचे मी पाहिले आहे. असा बदल होण्याची अनेक कारणे सांगता येतील, परंतु माझ्या मते सभोवतालची सामाजिक परिस्थिती हे या बदलाचे सर्वात महत्त्वाचे कारण आहे.

सुमारे वीस वर्षांपूर्वी पदवीधर विद्यार्थ्याला सहज नोकरी मिळत होती किंवा स्वतंत्र व्यवसाय करण्याची सुविधा होती. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासात मनापासून रस घेत. कालांतराने उपलब्ध झालेल्या ई. बी. सी., पी. टी. सी. वगैरे सवलती त्यावेळी नसल्या तरी अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुद्धा शिक्षण घेण्याची दुर्दम्य आकांक्षा विद्यार्थ्यांमध्ये आढळून येई. विद्यार्थ्यांची एकंदर संख्या कमी असल्यामुळे त्यांचा प्राध्यापकांशी जवळून संबंध येई, विद्यार्थी व प्राध्यापक यांच्यामध्ये जिव्हाळा असे व सर्व महाविद्यालयामध्ये अतिशय सामंजस्याचे वातावरण दिसे.

त्यानंतर मात्र ही परिस्थिती बदलत गेली. विद्यार्थ्यांना विविध शैक्षणिक सवलती उपलब्ध झाल्या आणि त्यांची संख्या वाढत गेली. तथापि उपलब्ध नोकऱ्यांची संख्या न वाढल्यामुळे पदवीधर बेकार होऊ लागले. अशा पदवीधरांची संख्या सातत्याने वाढू लागली. परिणामतः आजच्या विद्यार्थ्यांच्या मनात शिक्षणाबद्दल मोठ्या प्रमाणात औदासिन्य दिसू लागले आहे. आपण शिक्षण का घेतो आहोत याविषयी त्यांच्या मनात संभ्रम आहे. प्रत्येक ठिकाणी प्रचंड स्पर्धेत उतरण्यासाठी आवश्यक ती मानसिक तयारी त्यांची होऊ शकत नाही. एकंदरीत आजचा महाविद्यालयीन युवकांची ध्येये स्पष्ट नाहीत व त्यामुळे तो दिशाहीन अवस्थेत सापडला आहे.

खरं तर माझ्या वेळचा विद्यार्थी आणि आजचा विद्यार्थी यांच्यामध्ये फरक नाही. फार तर असे म्हणता येईल की आजचा विद्यार्थी अधिक उत्साही, अधिक चौकस, अधिक बोलका आहे. परंतु वादळात सापडलेल्या जहाजासारखी त्याची स्थिती आहे आणि त्यामुळे त्याच्या सुप्त शक्तीला योग्य दिशेने वाट मिळत नाही. आणि म्हणूनच विद्यार्थ्यांच्या असंतोषाचा क्वचित् प्रसंगी भडकाही उडाल्याचं निदर्शनास येतं.

कधी कधी मला वाटतं की मी विद्यार्थी असतानाची परिस्थिती आज निर्माण झाली, आपल्याला हव्या त्या अभ्यासक्रमाला लायक विद्यार्थ्याला प्रवेश मिळू शकला आणि नोकरी किंवा व्यवसाय करू इच्छिणाऱ्या प्रत्येक पदवीधराला योग्य संधी प्राप्त होऊ शकली तर आजचा

## प्राचार्य सदाशिव यशवंत गंभीर यांचा व्यक्तिपरिचय



**जन्म : ११ जुलै १९३३.**

**शैक्षणिक गुणवत्ता :** शालान्त परीक्षा : १९५० : विशेष गुणवत्तेसह प्रथम श्रेणी; बी. एस्सी. परीक्षा : १९५४ : पुणे विद्यापीठ : प्रथम श्रेणी; एम. एस्सी परीक्षा : १९५६ : पुणे विद्यापीठ : प्रथम श्रेणी; एम. एस्सी परीक्षेकरिता पदार्थविज्ञान विषयांतर्गत ' इलेक्ट्रॉनिक्स ' विषयाचा विशेष अभ्यास.

**अनुभव :** अहमदनगर महाविद्यालय : ७ वर्षे प्राध्यापक, शिवाजी महाविद्यालय सातारा, वारणा महाविद्यालय, वारणा आणि मॉडर्न महाविद्यालय, पुणे : १४ वर्षे प्राध्यापक व विभाग प्रमुख; शिवाजी विद्यापीठात पदव्युत्तर वर्गांचे अध्यापन.

**प्रशासकीय अनुभव :** १९७५ पासून पुणे येथील प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य. १९७५–७८; संस्थेच्या प्राथमिक विद्यामंदिरचे प्रमुखाध्यापक; १९७८ पासून संस्थेच्या बिझिनेस कौन्सिलचे सदस्य; १९७८–७९ मॉडर्न महाविद्यालयाचे उपप्राचार्य; १९७९ पासून मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य.

**शिक्षण क्षेत्रातील कार्य :** शिवाजी विद्यापीठ विज्ञान विषयाच्या अभ्यासमंडळाचे सदस्य ( १९६३ ते ७० ) आणि त्याच मंडळाचे अध्यक्ष. (१९६६–७९). शिवाजी विद्यापीठ विज्ञान विद्याशाखेचे सदस्य ( १९६३–७० ). शिवाजी विद्यापीठ सिनेटचे सदस्य ( १९६९–७० ) पुणे विद्यापीठ विज्ञान विषयाच्या अभ्यासमंडळाचे सदस्य ( १९७० पासून ). पुणे विद्यापीठ विज्ञान विद्याशाखेचे सदस्य ( १९७० ते ७९ ).

**लेखन :** उच्च माध्यमिक स्तरावरील सात क्रमिक पुस्तकांचे लेखन. ( त्यातील चार पुस्तकांना शालान्त परीक्षा मंडळाची मंजुरी ). महाविद्यालयीन स्तरावरील आठ पुस्तकांचे लेखन. ( त्यातील चार पुणे विद्यापीठ अभ्यासमंडळाने शिफारस केलेली. )

**शिक्षणेतर उपक्रम :** विद्यार्थिदशेत आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट आणि कबड्डी स्पर्धेत सहभाग. क्रिकेट, खोखो, टेनीस, बॅडमिंटन, व्हॉलीबॉल इत्यादीमध्ये पारितोषिके. प्राध्यापक या नात्याने क्रीडा संघटनेशी निगडित. क्रीडा संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्य.

---

विद्यार्थी पूर्वीच्या विद्यार्थ्यांपेक्षा काकणभर सरसच आहे, हे स्पष्ट होईल.

अध्यापक व विद्यार्थी यांचे संबंध तणावपूर्ण आहेत असे आजूबाजूचे वातावरण पाहता आपणास वाटते का ? कोणत्या गोष्टींनी तणावाची परिस्थिती टाळता येईल वा तणाव कमी होतील ?

अध्यापक व विद्यार्थी यांचे परस्परसंबंध तणावपूर्ण आहेत असं मला तरी मुळीच वाटत नाही. असे तणाव कधी कधी जाणवतात ही गोष्ट खरी असली, तरी ते पेल्यातील वादळासारखे तात्पुरत्या स्वरूपाचेच असतात. ह्या तात्पुरत्या तणावांचं मूळसुद्धा विद्यार्थ्यांच्या प्रचंड संख्येमध्ये सापडतं. विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे विद्यार्थी व अध्यापक यांच्यामधील अंतर वाढलं आहे. परिणामी या दोन घटकांमधील परस्पर विश्वासाची भावना दिवसेंदिवस कमी होऊ लागली आहे. विद्यार्थ्यांबरोबरच अध्यापकांचीही संख्या वाढली आहे. यापैकी सर्व अध्यापक केवळ आवड म्हणून या व्यवसायाकडे आकर्षित झाले आहेत असं नाही. त्याचप्रमाणे सर्वच विद्यार्थी खऱ्या अर्थाने शिक्षणार्थी नाहीत. अशा परीस्थितीत क्वचित प्रसंगी केवळ गैरसमजामुळे तणाव निर्माण होतात; परंतु आधी म्हटल्याप्रमाणे ते लवकरच निवळतात. मला वाटतं की अध्यापकवर्गानं विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेण्याचा आणि त्यांना मदत करण्याचा प्रयत्न केला आणि विद्यार्थ्यांनीही त्यांना योग्य तो प्रतिसाद दिला तर असे किरकोळ तणावसुद्धा निर्माण होणार नाहीत.

विद्यार्थ्यांकडून आपल्या काय अपेक्षा ? (अर्थात् अभ्यास सोडून)

आपण निवडलेल्या अभ्यासक्रमासंबंधी जास्तीत जास्त ज्ञान मिळवण्याचा विद्यार्थ्यांनी सर्वतोपरी प्रयत्न करावा अशी माझी विद्यार्थ्यांकडून प्रमुख अपेक्षा आहे. याशिवाय माझ्या इतर अनेक अपेक्षा आहेत. माझ्या मते शालेय जीवन आणि शिक्षण पूर्ण केल्यानंतरचे जीवन यांच्यामधील संक्रमणावस्था म्हणजे महाविद्यालयीन जीवन होय. या जीवनामध्ये अध्ययनाबरोबरच सभोवतालच्या सामाजिक जीवनासंबंधी माहिती मिळवण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला पाहिजे. यासाठी त्यांनी अभ्यासेतर उपक्रमांमध्ये सक्रिय भाग घ्यावयास हवा. भावी आयुष्यात आपल्या ज्ञानाबरोबरच निरोगी शरीरसंपदेची आवश्यकता असते. त्यासाठी विद्यार्थ्यांनी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थ्यांनी काहीतरी उपयुक्त छंद जोपासला पाहिजे. त्यासाठी संगीत, वादन इ. कला, विविध खेळ, वक्तृत्व, ट्रेकिंग वगैरे उपक्रमांपैकी आपल्या आवडीच्या उपक्रमात मनापासून भाग घेतला पाहिजे. आगामी आयुष्यात अधूनमधून जाणवणाऱ्या मानसिक औदासीन्यातून सुटका होण्यासाठी असा छंद अतिशय उपयोगी पडतो. त्याचप्रमाणे विद्यार्थिजीवनातच चांगले मित्र जोडले पाहिजेत. त्यांची मैत्री आयुष्यभर आपली साथ करते. नंतरच्या आयुष्यातही मित्र जोडता येतात. परंतु खरी निर्व्याज आणि निस्वार्थी मैत्री केवळ विद्यार्थिजीवनातच होऊ शकते.

माझ्या स्वतःच्या आयुष्यात माझ्या महाविद्यालयीन जीवनाची सहा वर्षे अत्यंत समाधानाची अशी गेली आहेत, तशी माझ्या विद्यार्थ्यांची सुद्धा जावी असं मला वाटतं.

प्राचार्य म्हणून काम करताना आपणास विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणते अनुभव येतात ?

प्राचार्य या नात्याने काम करताना विद्यार्थ्यांच्या बाबतीत येणारे अनुभव बऱ्याच अंशी समाधानकारक असतात. अर्थात काही चमत्कारिक अनुभवही आले आहेत. सर्वसाधारणपणे विद्यार्थ्यांचे बोलणे, वागणे वगैरे नम्रपणाचे असते. विद्यार्थी अनेकदा चुका करतात, परंतु प्रांजळपणे त्यांची कबुलीही देतात. काही विद्यार्थी मात्र चूक करूनही नाकारण्याचा प्रयत्न करतात. चूक केल्याबद्दल रागावून बोलण्याऐवजी त्या चुकीमुळे विद्यार्थ्यांचे नुकसान कसे होऊ शकते, हे त्याला पटवून देऊन अशा चुकीच्या पुनरावृत्तीपासून त्याला परावृत्त करता येते, असा माझा अनुभव आहे. अर्थात् मीही माणूसच असल्यामुळे सातत्याने स्थितप्रज्ञ राहू शकत नाही व त्यामुळे काही वेळा मी रागावतो. असे असूनसुद्धा विद्यार्थ्यांनी कधीही गैरसमज करून घेतला नाही, याचे मला समाधान वाटते.

कधीकधी मात्र वेगळेच अनुभव येतात. परवाचीच गोष्ट सांगतो. महाविद्यालयात स्नेहसंमेलन प्रसंगी प्रत्येक वर्गाचा करमणुकीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे करण्याची प्रथा आहे. अशा वेळी प्राचार्यांनी, उपप्राचार्यांनी यावे अशी विद्यार्थ्यांची खूप इच्छा असते व ते आवर्जून बोलावतात. प्रत्येक ठिकाणी थोडा वेळ का होईना पण जावे लागते. असाच एका वर्गात गेलो. तेथे इलेक्ट्रिक गिटारवर काही गाणी वाजवलेली ऐकली. शेवटचे गाणे ‘ दम मारो दम ’ हे होते. त्याचे पाश्चात्य स्वर कानात असताच दुसऱ्या वर्गात गेलो तर तेथे सर्व मुलेमुली हात जोडून उभी होती आणि साने गुरुजींचे ‘ जगाला प्रेम अर्पावे ’ हे गीत गाइले जात होते. विश्वास ठेवा अगर ठेवू नका, पण हे गाणे अगदी हृदयाला हेलावून आणि मनाला धक्का देऊन गेले. कदाचित अगदी भिन्न वातावरणामुळे तसे झाले असेल; परंतु परिणाम मात्र खूप जाणवला. दोन्ही वर्गात याच महाविद्यालयाचे विद्यार्थी होते, परंतु त्यांच्या विचारात किती फरक होता ?

अशा प्रकारचे अतिशय विविध व वैचित्र्यपूर्ण अनुभव नेहमी विद्यार्थ्यांच्या बाबतीत येतात.

शिक्षण व जीवन यांबाबत आपण काही चिंतन केले आहे काय ?

शिक्षण व जीवन याबाबत चिंतन करण्याइतका मोठा विचारवंत मी नाही. माझ्या परीनं काही प्रमाणात याबाबत मी विचार केला आहे. शिक्षण हे जीवनाभिमुख असावयास पाहिजे असं मला वाटतं. आजचं शिक्षण विद्यार्थ्याला सुशिक्षित बनवतं त्याबरोबरच त्याला सुसंस्कृत बनवतं की नाही याचा विचार झाला पाहिजे. त्यासाठी शिक्षणपद्धती आणि अभ्यासक्रम यांच्यामध्ये बदल होणे आवश्यक आहे.

माझ्या मते माध्यमिक शिक्षण सर्वांना मिळालं पाहिजे.

त्यानंतरचं शिक्षण मात्र विद्यार्थ्यांची आवड आणि कुवत यावर अवलंबून राहिलं पाहिजे. सध्या आपण पाहतो की एस. एस. सी. नंतर विज्ञान व वाणिज्य या शाखांकडेच सर्व विद्यार्थ्यांचा ओढा असतो. तो थांबला पाहिजे. त्यासाठी आय्. टी. आय्; फूडक्राफ्ट इन्स्टिट्यूट, इंजिनियरिंग डिप्लोमा संस्था वगैरेमध्ये शिकविल्या जाणाऱ्या व्यवसायोपयोगी अभ्यासक्रमांसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश दिला पाहिजे. बौद्धिक कुवत असणाऱ्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश दिला पाहिजे. असे झाले तरच अभ्यासक्रम राबविता येतील आणि गुणवत्तेतही सुधारणा होईल.

प्रत्येकाला संपन्न व समाधानी जीवन जगता आले पाहिजे. केवळ संपत्ती, उच्चपद किंवा बहुमान यामुळेच जीवन संपन्न होते असे मुळीच नाही. तर आपल्या ठराविक चाकोरीत जगत असताना आपले अंगीकृत कार्य प्रामाणिकपणे आणि 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' या विचारसरणीने पार पाडावयाचा प्रयत्न करणारा प्रत्येकजण एक समृद्ध आणि सुखी जीवन जगत असतो, अशी मला खात्री वाटते. यासाठी प्रत्येकाला त्याची सामाजिक जबाबदारी समजली पाहिजे आणि त्याची योग्य मानसिक घडण झाली पाहिजे. ज्या शिक्षणाद्वारे हा हेतू साध्य होईल तेच खरे शिक्षण होय असे मला वाटते.

## अंधार जळतो आहे

घनगंभीर या डोळ्यात माझ्या
आता पेटते सुरूंग आहेत
ते फुटण्याआधी थोडी
कैफियत मांडतो आहे
दु:खाने मुक्कामाला
का माझ्याच अंगणी यावे
का दारिद्र्याने पाणी
माझ्याच घरी भरावे
उपेक्षिताने आता काय काय अपेक्षावे
मातेनेही येथे मातापण नाकारावे
कल्लोळ माझ्या भावनांचा
जाणला नाही कोणी
माझ्याच ओठी यावीत
का दु:खाची ही गाणी
का शब्दांनीही व्हावे
अस्पृश्य माझ्या ओठी
पापणीच्या या पोकळीत
आता अंधार जळतो आहे
घनगंभीर या डोळ्यात माझ्या
आता पेटते सुरूंग आहेत

**आनंद दादू साळवे**
द्वि. व. वाणिज्य

# अशीही एक सफर

**मृणालिनी देशमुख**
तृ. व. वाणिज्य

परवा काय झालं, मी गेले माझ्या संशोधक ( प्रसिद्धी-पराङ्मुख ) काकांकडे. विज्ञान विषयाचा त्यांचा अभ्यास अगदी दांडगा ! गणित तर ते नेहमीच करत असतात. रसायन न्याहाळणे हा त्यांचा छंद. ते तयार करताना अगदी जेवणाची सुद्धा शुद्ध रहात नाही. आता माझा आणि गणित शास्त्राचा अगदी छत्तिसाचा आकडा. दहावीनंतर त्याच्याकडे अगदी ढुंकून सुद्धा पाहिलेले नाही. तेव्हा काय जे १०० मार्क मिळवले तेवढाच काय तो अस्मादिकांचा पराक्रम ! तर मी त्यांच्याकडे गेले. ते कोणाला तरी रागवत होते. म्हटलं, चुकली आपली वेळ. कशावरून तरी आपल्याला आता बोलणी खावी लागणार. तसे ते फार विक्षिप्त. कुणावरही कधीही रागवायला कमी करत नाहीत.

पण परवा मात्र मला पाहिल्याबरोबर त्यांना फार आनंद झाला. घरची चौकशी करून आपल्या क्रांतिकारी शोधाची माहिती मला सांगायला लागले. मात्र, ती सांगण्यापूर्वी त्या माणसाला जायला सांगायला विसरले नाहीत. त्यांनी एक यंत्र तयार केले होते. त्या यंत्रातून शतकांचा प्रवास करता येईल असे त्यांचे म्हणणे होते. फक्त पुढे किंवा मागे किती गेलय हे समजत नव्हतं. यासाठी एखाद्या माणसाने तो प्रवास करणे आवश्यक होते. मी एकदम म्हटलं, 'मी जाते'. मला पाठवायला तसे ते तयार नव्हते. पण शेवटी एकदाचे तयार झाले. आणि मी त्या यंत्रात जाऊन बसले. काकांनी माझ्याजवळ स्वसंरक्षणार्थ रिव्हाल्वर व खायला पदार्थ दिले होते. आणि एकदोन तासात परत यायला सांगितले होते. परतपरत सूचना केल्या. मला पण आता थोडी भीती वाटायला लागली. पहिली भूत भविष्य ( काय असेल ते ) प्रवासी मी ! कसा प्रसंग येतोय नी कसा नाही ! पण आता मागे हटायचे नाही ! आता निर्धार केला. देवाचे नाव घेतले. ( एकाच नाही जेवढे आठवतील तेवढ्या सगळ्या. ) डोळे मिटून बसले.

किती वेळ गेला समजले नाही पण आजूबाजूला पाहिले तर एक अद्ययावत फर्निचरने भरलेले असे घर होते. तिथल्या टिपॉयवर पेपर पडलेला होता. म्हटलं पाहूया भाषा तरी वाचता येते का ? वरचं नाव पाहिलं तर ' केसरी ' ऑ ! चक्क मराठीत लिहिलेलं. पेपरवर पहिल्याच पानावर जाड टाईपमध्ये लिहिलेलं होतं ' षण्मल ग्रहावरील राक्षसी लोक आपल्या पृथ्वीवर हल्ला करण्यास येत आहेत. तरी सर्वांनी सहकार्य करावं. वॉशिंग्टन, दिल्ली, रंगून, व्हेनीस येथे प्रमुख केंद्रे स्थापली आहेत. तेथे जाऊन सैन्यात भरती घ्यावे. लोकांनी सर्व प्रकारची तयारी करावी. ' मी आपली वाचतच सुटले आश्चर्याने ! ' अवकाशातील वसाहत क्र. १ व ४ यांनी आपल्याला सहकार्य करावयाचे नाकारले आहे. त्यामुळे हेरगीरीचा संभव. लघुग्रहांवरील वसाहतींना धोका. तेथे त्वरित यानांची मदत आवश्यक. सौर उर्जेचा काटकसरीने वापर करावा व नेहेमी सर्व प्रतिरोधक सुटात रहावे. शक्य असलेल्यांनी सागरी वसाहतीत रहावे. '

पेपरच्या दुसऱ्या पानावर एका बाजूला बाजार भाव लिहिले होते. भात २०० रु. किलो, पोळ्या १०० रु. शेकडा, भाकरी ५० रु. शेकडा, साखर २५० रु. किलो, गोडेतेल १००० रु. किलो. बापरे ! पगार पुरणार कसा ? काय ही महागाई. आपल्या वेळेस बरे होते. वाचकांच्या पत्रात–पृथ्वी ते शुक्र ५७ क्र. चे यान फारच उशिरा सुटते, कामावर जायला उशीर होतो, तरी ते लवकर सोडावे.

मनात आले मानवाने २०० वर्षांत किती प्रगती केली. बाजूला कसलातरी आवाज झाला म्हणून मागे वळून पाहिले. तसेच खिशातील रिव्हाल्वरही चाचपून पाहिले. बाजूला एक बाई उभी होती. ( ९ वारी साडीत ) तिने त्याचा काहीही उपयोग होणार नाही हे नाव घेऊन सांगितले. टेलीग्राफी यंत्राने तिला माझ्या मनातले सर्व काही समजले होते. तिने सांगितल्यानुसार एका यांत्रिक मानवाने ( ज्याला बोलता येत होते ) सर्व घर दाखवले. कितीतरी वस्तू सौर उर्जेवर चालणाऱ्या होत्या. मिली सेकंदसुद्धा तेथे महत्वाचे होते. त्यांनी मला फळ नामक काहीतरी पदार्थ खायला दिला. वेगळ्याच चवीचा तो पदार्थ मला आवडला.

पण आता वेळ झाली होती. रहावंसं वाटत होतं, अधिक माहिती प्राप्त करून घ्यावीशी वाटत होती, पण निघाले. माझ्या शतकात माझ्या घरी त्यांचा निरोप घेतला. ज्या खुर्चीत आले तेव्हा बसले होते, त्या खुर्चीत बसले आणि...

आणि दुसऱ्याच क्षणी मी माझ्या शतकात माझ्या काकांच्या घरी होते. शेजारी काका आश्चर्यानंदाने उभे होते. मी यंत्रातून बाहेर आल्याबरोबर ते म्हणाले 'आलीस ? कशी ट्रीप झाली ? कुठे गेली होतीस ? भविष्यकाळात की

भूतकाळात ? काय काय पाहिलस ?' मी म्हटलं 'अहो ! अहो जरा दम तर खाऊ द्या. एक एक प्रश्न विचारा. २ शतकांचा एवढा मोठा प्रवास केला मी. सगळ्या गमती जमती सांगते.'

अशी माझी पहिली अवकाश नाही ! नाही ! चुकले भविष्यसफर. आवडली का ? विश्वास नाही ना बसत पण हे सगळ खरं आहे. □ □

## याच औद्योगिक शहरात

कारखान्याच्या चिमणीने ओकलेल्या धूरात
बरबटलेला सूर्य उगवलाय– या औद्योगिक शहरात
रेमंड वुलन्सच्या भिंतीखालच्या छपरात
केकाटतयं एक मरतुकडं कुत्रं
थंडीने काकडल्यामुळे– याच औद्योगिक शहरात ।
स्वत:ला लाज वाटते म्हणून
पेन्शनर बापाला गिरणीवर
बाजरी दळायला पाठवणारे सुपुत्र–याच औद्योगिक शहरात
आपल्या आईच्या वृद्ध मंगळसूत्राची
जीर्ण दोरी तुटू नये म्हणून
लोकलच्या गर्दीत मंगळसूत्र खेचणारे
मवाली बेकार– याच औद्योगिक शहरात ।
स्वत:च्या प्रियेशी हलका-फुलका
प्रणयालाप न करता आल्याने
दिवसाढवळ्या बलात्कार करणारे
खदखदणारे ज्वालामुखी–याच औद्योगिक शहरात ।
परीक्षेतील प्रश्नपत्रिका, जशीच्या तशी
न सांगितल्यामुळे
आंदोलन करू पाहणारे
ज्ञानी विद्यार्थी एकलव्य–याच औद्योगिक शहरात ।
कॉलेजमध्ये रोमिओ ज्युलिएट शिकताना
निस्सीम प्रेमाने भारावून रडणारे
केवळ हुंडा नाही म्हणून
गुणवान मुलीलासुद्धा छळणारे
' सेंसेटीव्ह ' युवक– याच औद्योगीक शहरात ।
प्लॅटोनिक प्रेमाच्या नावाखाली
पोटं फुगवणारे
आणि मातृत्वालाच छिनाल बनवणारे
उदात्त प्रेमवीर– याच औद्योगिक शहरात ।
तगडी देणगी देऊन
विधवाश्रम काढणारे
आणि त्यानंतर अनाथ बालकाश्रमांची
गरज निर्माण करणारे
दानशूर श्रीमंत रावसाहेब–याच औद्योगिक शहरात ।
न्याय्य आंदोलनाच्या नावाखाली
बंधुत्वाचं धरण फोडून
जातीयतेचा महापूर पसरवणारे
बुळबुळीत ऑक्टोपस– याच औद्योगिक शहरात ।
नांगराच्या फाळाने देशाच्या ललाटी
भाग्यरेषा लिहिणारांना
तोच फाळ देशाच्या कपाळमोक्षासाठी
उगारायला लावणारे
संधिसाधू खुर्चीभक्त– याच औद्योगिक शहरात ।
कामगारांच्या मागण्यांसाठी
संप हरताळाचे नगारे वाजवणारे
समझौता ( की सौदा ) झाल्यावर
स्वत:च कुंभकर्ण होणारे
लोकप्रिय कॉम्रेड– याच औद्योगिक शहरात ।
काचेची तावदानं बनवणाऱ्या
कारखान्याच्या गुदामात
खळ्ळ्खन फुटलीय एका अहिल्येच्या
पातिव्रत्याची काच–याच औद्योगिक शहरात ।
कारखान्याच्या चिमणीने ओकलेल्या धूरात
सूर्याच्या तेजस्वितेवरच आलीय आच—
म्हणूनच तर—
पांढराशुभ्र सूर्य
काळ्याकुट्ट अंधाराला
देऊ पहातोय लाच–याच औद्योगिक शहरात ! !

**—वि. पा. निपाणेकर**
तृ. व. कला

# विद्यार्थी आणि राजकारण

**दीपक बिचे**
द्वितीय वर्ष वाणिज्य

पूर्वीप्रमाणे आज विद्यार्थिजीवन हे केवळ विद्यार्जनाशीच निगडित राहिलेले नाही. समाजातील अनेक घटनांशी, त्यांच्या सादपडसादांशी विद्यार्थिजीवनाचा आज निकट संबंध येतो. समाजाच्या इतर अंगांप्रमाणेच विद्यार्थिजीवनावरही राजकारणाचा चांगलाच प्रभाव आहे. ह्या राजकारणामुळे विद्यार्थिवर्गाला अनेक मूलभूत तशाच व्यावहारिक अशा प्रश्नांत गोवण्यात येते. त्यापैकी कित्येक प्रश्न तर विद्यार्थिजीवनाशी अप्रत्यक्षच काय पण दुरूनही संबंधित नसतात. विशिष्ट परिस्थितीत राजकीय स्वार्थ जपणाऱ्या राजकारणी मंडळींमुळे भुलावलेले विद्यार्थी एका वेगळ्याच दिशेला भरकटतात. यातून विद्यार्थ्यांचे हित क्वचितच साधते. बहुतेक वेळा विद्यार्थ्यांचे नुकसान होण्यापलीकडे, शैक्षणिक वातावरण दूषित होण्यापलीकडे काहीच साधत नाही.

शिवाय विद्यार्थिदशेत व्यक्तीला आपल्या जबाबदारीचे योग्य आकलन झालेले असतेच असे नाही. सर्वसाधारणतः या वर्गात जोशपूर्ण वागण्याची भावना मोठ्या प्रमाणात असते. या वयात त्वरित निर्णय घेण्याची प्रवृत्ती असते. या प्रचंड विद्यार्थिशक्तीचा वापर योग्य निर्णय घेण्यावर अवलंबून असतो. समाजजीवन निरुत्साही करून टाकणाऱ्या गोष्टी, शिक्षणक्षेत्रात दिवसेंदिवस दिसून येणारी उदासीनता, विद्यार्थ्यांची शिक्षणविन्मुखता या गोष्टी विद्यार्थिजीवनावर परिणाम करीत असतातच. पुन्हा विद्यार्थ्यांत जात, उत्पन्न, प्रदेश, निवडलेला शिक्षणक्रम यामुळे अनेक थर असतात. या वेगवेगळ्या थरांतील विद्यार्थी बऱ्याच वेळेला आपापल्या थरापुरता संकुचित दृष्टीकोन ठेवूनही वागत असताना दिसतात. शिवाय विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा एक स्वाभाविक भाग म्हणून विद्यार्थी अनुकरणशील असतात. विद्यार्थ्यांच्या या संकुचित वृत्तीचा, अनुकरणप्रियतेचा फायदा अर्थातच संधिसाधू राजकारणी उठवितात. अशा रीतीने विद्यार्थ्यांचे राजकीय जीवन हे बहुतांशी कोण्या परक्या नेत्याच्या व संघटनेच्या – विद्यार्थीजगापासून दूर असणाऱ्या शक्तीच्या – हाती असते.

राजकारणातील मुत्सद्दी व डावपेचपटू मंडळी आवश्यक अशा शक्तीच्या शोधातच असतात. महाविद्यालयातील वर्गप्रतिनिधीपासून विद्यापीठ-प्रतिनिधीपर्यंतच्या सर्व निवडणुकांना राजकारणाचे मुखवटे चढविले जातात. वास्तविक या निवडणुका म्हणजे विद्यार्थ्यांना लोकशाही पद्धतीचे अप्रत्यक्ष शिक्षण देणाऱ्या बाबी ठरायला हव्यात. परंतु त्या आजच्या डागाळलेल्या लोकशाहीतील निवडणुकांप्रमाणेच लढविल्या जातात. त्यातून विद्यार्थ्यांत गट तयार होतात; त्यांच्यात तंटेबखेडे होतात आणि परिणामी शैक्षणिक वातावरण गढूळ होते. कारण महाविद्यालयातल्या निवडणुका बहुतांश वेळा शिक्षणक्षेत्राबाहेरच्या प्रश्नाला केंद्रस्थानी ठेवून लढविल्या जातात.

वास्तविक विद्यार्थी व प्रचलित दूषित राजकारण या दोन गोष्टी एकत्र यायला नकोत. विद्यार्थ्यांनी आजूबाजूच्या समाजाचे निरीक्षण करायला हवे. त्या निमित्ताने त्यांनी राजकारणाचा परिचय तेवढा करून घ्यावा. राजकारण खेळू नये.

## वेदना

बर्फाळ पावसासारखी रात्र अचानक कोसळूनी यावी
अनामिक धडकी आज उरात कसलीशी भरावी
आकाशी चांदण्यातला चंद्र असाच मरून पडावा
अढळ तारा ध्रुवाचा जरा दचकलेलाच दिसावा
ऐकुनी तुझ्या वेदना प्रेम मीही सुन्न व्हावे
वाटते संमोहजाल सोडुनि भिक्षूत जाऊन बसावे
पावसाने दाखवाव्या वाटा काळोखलेल्या नभाला
उरात मी माझ्या वेदनांचे गंध जाळीत बसावे

**प्रकाश माधव शेठ**
तृ. व. वाणिज्य

# जनमानसाचे तीन आरसे

'केसरी,' 'सकाळ' आणि 'तरुण भारत' ही पुण्यातून प्रसिद्ध होणारी तीन अग्रेसर वृत्तपत्रे चालू वर्षी आपापले अनुक्रमे शताब्दिमहोत्सव, सुवर्णमहोत्सव व रौप्यमहोत्सव साजरे करीत आहेत. त्या निमित्ताने आमच्या महाविद्यालयातील सीमा कुलकर्णी, ज्योति गिरमे, मृणाल कानडे, माधवी गन्धे, शुभदा थिटे, मृणालिनी: देशमुख, आणि विद्या गोडखिंडी या विद्यार्थिनींनी या वृत्तपत्रांच्या संपादकांच्या घेतलेल्या मुलाखती येथे छापत आहोत. सुरुवातीला मुलाखतीस आधारभूत अशी प्रश्नावली छापली असून त्यापुढे क्रमाने 'केसरी', 'सकाळ' व 'तरुण भारत' यांच्या संपादकांच्या मुलाखती छापल्या आहेत.

## प्रश्नावली

- आपले वृत्तपत्र सुरू करण्यामागचा आद्य संपादक-संस्थापकांचा उद्देश कोणता ? वृत्तपत्र पुण्यातच की सुरू केले ?
- सुरुवातीच्या आणि आजच्या खपाची आकडेवारी काय आहे ?
- आपण वृत्तपत्राची राजकीय पक्षाशी बांधिलकी मानता का ? आपण वृत्तपत्राची राजकीय विचाराशी बांधिलकी मानता का ?
- शासनाच्या धोरणांचा आपल्या वृत्तपत्रावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दवाव आहे का? आपल्या वृत्तपत्राला वैचारिक स्वातंत्र्य आहे की नाही ?
- आपल्या वृत्तपत्राचे स्वातंत्र्यपूर्व काळातील शासनाशी संबंध आणि स्वातंत्र्योत्तर काळातील शासनाशी संबंध यांत काही फरक झाला आहे का ?
- राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रांतील बातम्यांना वृत्तपत्रप्रसिद्धीत आपण कोणता क्रम देता ?
- आपले वृत्तपत्र विद्यार्थ्यांच्या प्रश्नांत कितपत रस घेते ?
- निवडणुकीच्या काळात आपले वृत्तपत्र लोकमताची निर्मिती किती प्रमाणात करू शकते ? आपल्या वृत्तपत्रामुळे निवडणूक निकालाचे चित्र काही प्रमाणात बदलले आहे, असा दावा आपण करू शकाल का ?
- आपले वृत्तपत्र आर्थिक-दृष्ट्या स्वयंपूर्ण आहे का ? सरकारी सहकार्य, जाहिराती, शुभराशी वगळल्या तर आपण आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण राहू शकाल का ?
- एका बाजूला वैचारिक खाद्य पुरविणे आणि दुसऱ्या बाजूला शुभराशी छापणे हे विसंगत नाही का ?
- वृत्तपत्रात भविष्य छापण्याने लोक प्रयत्नवादी बनण्याऐवजी दैववादी बनतात असे आपणास वाटत नाही का ?
- आपल्या कर्मचाऱ्यांचे आपणास कितपत सहकार्य लाभते ? वृत्तपत्राच्या आजवरच्या आयुष्यात कर्मचाऱ्यांचे किंवा त्यांच्या गटांचे संप किती वेळा झाले ? का झाले ? तडजोड कशा प्रकारे झाली ?
- प्रेस ॲक्टच्या संदर्भात आपल्या वृत्तपत्राचे सरकारशी वाद झाले आहेत का ? किती वेळा ? त्यांचे स्वरूप व निर्णय काय होते ?
- 'वाचकांचा पत्रव्यवहार' या सदरातील पत्रांच्या खरेपणाबद्दल काय सांगू शकाल ? शासकीय कर्मचाऱ्यांनी वृत्तपत्रातून पत्रे लिहिण्यावर बंदी घातली आहे. त्याबाबत तुमचे काय मत आहे ?
- आपल्या वृत्तपत्राबाबतच्या आपल्या उद्दिष्टांबाबत आणि समाजातील स्थानाबाबत आपण समाधानी आहात का ?

## केसरी

आद्य संपादक : **कै. गोपाळ गणेश आगरकर**

विद्यमान संपादक : **श्री. चंद्रकांत घोरपडे**

आगरकर-टिळकांचे वास्तव्य पुण्यात होते आणि पुणे हे राजकीय चळवळीत महत्त्व पावलेले शहर होते त्यामुळे 'केसरी' पुण्यातच सुरू केला. 'केसरी'च्या अगोदर निघालेली बरीच वृत्तपत्रे होती. त्यांपैकी काही सरकार-धार्जिणी होती. तेव्हा आपल्या जनतेचे एखादे तरी वृत्तपत्र असावे, त्यात भारतवासीयांची बाजू निःपक्षपातीपणे मांडली जावी असे टिळक-आगरकरांना वाटले. त्यातूनच 'केसरी'चा जन्म झाला.

साधारणतः वृत्तपत्र पहाटे ३॥ ला छापून तयार असावे लागते. म्हणजे ते पुण्यात सकाळीसकाळीच लोकांच्या हातात पडते. पण पुण्यात छापलेले वृत्तपत्र मुंबईत पोहोचून त्याचे वितरण होईपर्यंत खूप उशीर होतो. त्यामुळे मुंबई आवृत्तीची आवश्यकता भासते. कारण मुंबईकर सकाळी लवकर घराबाहेर पडतात. त्यामुळे महाराष्ट्राच्या अंतर्भागातील वाचकांप्रमाणे त्यांच्या घरी वृत्तपत्र उशिरा पोहोचून चालत नाही. शिवाय पुण्या-मुंबईतील वाचकांची अभिरुचीही वेगळी असते. त्यामुळे वेगळ्या आवृत्तीची गरज असतेच.

'केसरी' सुरवातीस साप्ताहिक होता. तेव्हाचा खप चौदा-पंधरा हजारांइतका होता. टिळकांच्या लोकप्रियतेच्या वाढीबरोबर 'केसरी'चा खपही वाढू लागला. आज 'केसरी' चा खप ८२ हजारांच्या घरात आहे. रविवार आवृत्तीचा लाखाच्या आसपास.

वृत्तपत्राची एखाद्या राजकीय पक्षाशी बांधिलकी असण्याची गोष्ट 'केसरी'स मान्य नाही. तुमच्या व अन्य काहींच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही कॉंग्रेस (आय) पक्षाला पाठिंबा देतो असे सर्वत्र मानले जाते. पण हे सर्वस्वी खरे नाही. कॉंग्रेस (आय) च्या ज्या गोष्टी आम्हाला पटत नाहीत त्यावर आम्ही टीका करीत आलेलो आहोत. उदाहरणार्थ, अध्यक्षीय पद्धत या देशात यावी असे म्हणणाऱ्यांवर आम्ही टीका केली आहे. शेवटी अनेक पक्षांतून एखाद्या पक्षाची निवड करावीच लागते. अगदी अलिप्त राहून चालत नाही. त्यामुळे आमचा कॉंग्रेस (आय) पक्षाला पाठिंबा आहे.

मात्र वृत्तपत्र हे कोणत्याही एकच एक राजकीय विचाराचे बांधिलकी मानणारे असावे असे आम्हास वाटत नाही. त्यामुळे एकाच राजकीय विचाराची बांधिलकी आम्ही पत्करलेली नाही. आम्हास जो विचार योग्य वाटतो त्याला आम्ही पाठिंबा देतो; जो वाटत नाही त्याला विरोध करतो. उदाहरणार्थ, शेतकरी आंदोलनामुळे फक्त श्रीमंत शेतकऱ्यांचा फायदा होईल, बाकीच्यांचा होणार नाही, असे वाटल्याने व जे राजकीय नेते हे आंदोलन चालवीत होते त्यांची भूमिका न पटल्याने आम्ही त्याला विरोध केला. यामुळे आमच्यावर टीका होईल याची आम्हाला कल्पना होती. पण आम्हाला जे पटले नाही ते आम्ही अजिबात मानलेले नाही.

शासनाचा आमच्या वृत्तपत्रावर दबाव नाही. आमचे ट्रस्टी श्री. जयंतराव टिळक जरी महाराष्ट्र शासनाचे मंत्री असले तरी आम्हाला पूर्ण वैचारिक स्वातंत्र्य आहे. आम्ही जे लिहितो ती आमचीच मते असतात. वृत्तपत्रावर निर्बंध वगैरे आणण्याच्या गोष्टी अलीकडे बोलल्या जाऊ लागल्या आहेत. पण त्या आम्हास अजिबात मान्य नाहीत. वृत्तपत्र कोणत्याही दडपणापासून मुक्त असावे असेच आम्हास वाटते.

स्वातंत्र्यपूर्व-काळातील 'केसरी' चे शासनाशी असलेले संबंध आणि आजचे संबंध यात निश्चितपणे फरक आहे. तेव्हा टिळकादी नेत्यांची भूमिकाच परकीय सरकारच्या विरोधी होती. ती कॉंग्रेसधार्जिणी होती. आज आमचे शासनाशी संबंध चांगले आहेत. मात्र याचा अर्थ आम्ही सरकारधार्जिणे झालो आहोत असा नव्हे.

राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा सर्वच प्रकारच्या बातम्यांना सारखेच स्थान द्यायचा प्रयत्न असतो. पण अर्थातच ते शक्य होत नाही. कारण सध्या आपले सगळेच जीवन राजकारणमय झाले आहे. लोकही इतर प्रकारच्या बातम्यांपेक्षा राजकीय बातम्यांतच जादा रस घेतात. त्यामुळे आमचाही नाइलाज होतो. हे चित्र बदलायला हवे. लोकशिक्षणाच्या दृष्टीने सर्व बातम्यांना सारखे स्थान हवे, हे आम्हाला पटते. पण ही स्थिती यायला काही काळ लागेल.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांत आम्हाला खूपच रस आहे. त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी आमचे वृत्तपत्र नेहमी प्रयत्नशील असते. मात्र तुम्ही म्हणता त्याप्रमाणे सामाजिक वा राजकीय प्रश्नांवर जशा खास पुरवण्या काढल्या जातात, तशा विद्यार्थ्यांच्या प्रश्नावर काढलेल्या नाहीत. परंतु इतर उपक्रम खास विद्यार्थ्यांसाठी असे केलेले आहेत. उदाहरणार्थ, गेल्या डिसेंबरमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी काही उपक्रमात विशेष प्राविण्य मिळविलेले आहे, त्यांची छायाचित्रे व माहिती आम्ही मागवलेली होती. त्याशिवाय विद्यार्थ्यांच्या (आरोग्यविषयक) प्रश्नांची सोडवणूकही काही नामवंत डॉक्टरांकडून आम्ही करणार होतो. पण या उपक्रमास विद्यार्थ्यांचा योग्य प्रतिसाद मिळाला नाही. तरीही हा प्रयोग येत्या जुलैमध्ये आम्ही पुन्हा करणार आहोत.

निवडणूक काळात लोकमताची निर्मिती आम्ही एका मर्यादेपर्यंतच करू शकलो. तुम्ही शहरात राहता. त्यामुळे शहरातील हवा बदलत आहे, असे तुम्हाला जाणवते. शहरातील लोकांवर आम्ही काही परिणाम करू शकतही असू, पण खेड्यात तसा होत नाही. कारण तेथील लोकांची

मते ठाम असतात. वृत्तपत्रांची निवडणूक वार्तापत्रे ही त्यांच्यासाठी तरी ' फक्त वाचण्यासाठीच ' असतात.

आमच्या वृत्तपत्रामुळे निवडणुकीच्या निकालाचे चित्र बदलले आहे असे आम्हास अजिबात वाटत नाही. वृत्तपत्रांचे एकूण क्षेत्रच यर्यादित असते. त्यामुळे निवडणूक निकालावर आम्ही फारसा परिणाम घडवू शकत नाही. जशी हवा असेल तसाच निकाल लागतो. विजयाचे वृत्तपत्रांना दिले जाणारे श्रेय हे नाममात्र असते, असे मला तरी वाटते.

आम्ही आर्थिकदृष्टया स्वयंपूर्ण आहोत. सरकारी जाहिराती वगैरे वगळल्या तर आम्ही स्वयंपूर्ण राहू शकणार नाही. कारण वृत्तपत्र ही अशी एकच चीज आहे की जी उत्पादनखर्चापेक्षा कमी किंमतीत विकली जाते. अशी कमी किंमत ठेवण्यामागे ते ( वृत्तपत्र ) जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचावे हा एकमेव हेतू असतो. या कमी किंमतीमुळे आम्हाला जी तूट येते ती भरून काढण्यासाठी जाहिराती या आवश्यकच असतात. लो. टिळकांच्या काळातही ' केसरी 'त जाहिराती छापल्या जात. त्यांच्यावर याबाबत टीकाही झाली होती. पण ही तडजोड स्वीकारण्यावाचून वृत्तपत्रांना पर्यायच नसतो.

एका बाजूने वैचारिक खाद्य पुरविणे आणि दुसऱ्या बाजूला शुभराशी छापणे हे विसंगत आहे, असे कसे म्हणता येईल ? समाजात अनेक प्रवृत्तींचे, अनेक अभिरूचीचे लोक असतात. त्या सगळ्यांसाठी आमचे वृत्तपत्र आहे. त्यामुळे सगळ्यांच्या आवडी-निवडी आम्हांला बघाव्याच लागतात. आमच्या हातात असलेल्या आठ पानात आम्हाला सर्वांच्या आवडीचे सगळे बसवावे लागते. ज्या सामाजिक घटकाला जे पाहिजे तेते तो त्यातून घेतो.

भविष्य छापल्याने लोक प्रयत्नवादी बनण्याऐवजी दैववादी बनतात असे आम्हास वाटत नाही. जे खरोखरच भविष्यावर विश्वास ठेवणारे आहेत त्यांना ते कुठूनतरी वाचल्याशिवाय चैन पडतच नाही. मग आमच्या वृत्तपत्रातून त्यांना ते मिळाले तर कुठे बिघडते. दैववाद कमी झाला पाहिजे हे खरे. पण केवळ भविष्य न छापल्याने तो कमी होणार आहे थोडाच ? आम्हाला सर्वांच्या आवडीनिवडी विचारात घ्याव्या लागतात. भविष्याचे पान त्यावर विश्वास नसणाऱ्यांसाठी नसतेच. आपले वृत्तपत्र सर्वांपर्यंत पोचावे, आपले विचार सर्वांना कळावेत असे वाटत असेल तर त्या वृत्तपत्रात सर्व प्रकारच्या गोष्टी असाव्या लागतात. नवीन सुरू केलेल्या ' सरगम ' या सदराच्या निमित्ताने एखादा तरुण ते विकत घेईल. मग ' सरगम ' बरोबरच माझा अग्रलेखही असेल तो वाचेल. यात सर्वांचाच फायदा आहे. आणि शेवटी आम्ही तर एक व्यवसाय करीत आहोत. व्यवसायात अशा तडजोडी असतातच.



कर्मचाऱ्यांचे सहकार्य आम्हास उत्तम लाभते. त्याबाबतीत आम्ही भाग्यवान आहोत. पूर्वीच्या काळात किती व का संप झाले याची माहिती माझ्याकडे लगोलग उपलब्ध नाही. पण अलीकडच्या काळात एक संप झाल्याचे मला माहिती आहे. तो १९७२–७३ च्या सुमारास झाला. हा संप अर्थातच आर्थिक प्रश्नाबाबत होता. ' केसरी 'ला मिळणाऱ्या आर्थिक फायद्याचा काही भाग जर व्यवस्थापकीय मंडळींना मिळत असता तर स्वतःच्या फायद्यासाठी व्यवस्थापकांनी संप हा प्रतिष्ठेचा प्रश्न केला असता. पण ' केसरी 'चा फायदा ट्रस्टमध्ये जमा होतो. व्यवस्थापकांना वैयक्तिक लाभ काही नसल्याने ते कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांचा सहानुभूतीने विचार करतात.

प्रेस ॲक्ट हा विषय फार जुना आहे त्या संदर्भात सरकारशी वाद झाले आहेत. कारण, काय लिहावे आणि काय लिहू नये हे सरकारने त्या कायद्याद्वारे स्पष्ट केले आहे. आणि ते आम्हाला मान्य नव्हते. अर्थात हा विषय आता बराच मागे पडला आहे.

' वाचकांचा पत्रव्यवहार ' मधील पत्रे वाचकांनीच लिहिलेली असतात याबद्दल मला खात्री आहे. याबाबतीत कर्मचाऱ्यांच्या सभ्यपणावर माझा विश्वास आहे. हां, आता वाचकांच्या तक्रारी खऱ्या की खोट्या याची छाननी करण्याची यंत्रणा मात्र आमच्याजवळ नाही. कारण वाचकवर्ग इतका प्रचंड आहे की अशी यंत्रणाही करता येणार नाही. शासकीय कर्मचाऱ्यांनी वृत्तपत्राद्वारे आपल्या तक्रारी मांडू नयेत हे जे मुख्यमंत्र्यांचे म्हणणे आहे ते आम्हाला मान्य नाही. लोक तक्रारी देणार आणि आम्ही त्या छापणार. आम्ही शासनाचा प्रत्यक्ष निषेध करीत नसलो तरी अशी पत्रे छापून अप्रत्यक्ष निषेधच करत नाही का ?

कोणताही मनुष्य पूर्णपणे समाधानी नसतो. समाधानी नसणे ही त्याची प्रवृत्ती असते. आम्हीही आमच्या वृत्तपत्राबाबत पूर्णपणे संतुष्ट नाही. आमचे वृत्तपत्र आज हजारो लोक वाचतात. पण ते अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावे असा आमचा प्रयत्न राहील. त्यासाठीच आम्ही प्रत्येकाची आवड-निवड लक्षात घेऊन तडजोड करीत असतो. उद्दिष्टांच्या दिशेने आमची वाटचाल सुरू आहे आणि एक दिवस आम्ही ते सहज साध्य करू शकू.

## सकाळ

आद्य संपादक : **कै. ना. भि. परूळेकर**

विद्यमान संपादक : **श्री. श्री. ग. मुणगेकर**

'सकाळ' चे संस्थापक डॉ. ना. भि. परूळेकर यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे की पुणे शहराचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत खूप मोठा वाटा आहे. पुणे हे सांस्कृतिक शहर आहे. पुणे हे असे शहर आहे की जेथून सर्व ठिकाणी प्रभाव पडणे शक्य आहे. त्यामुळे 'सकाळ' पुण्यात सुरू करण्यात आला.

'सकाळ'चा खप लाखाच्या घरात आहे. 'रविवार 'सकाळ'चा १ लाख २१ हजाराच्या आसपास. दिनांक १ ऑगस्ट १९८० रोजी 'सकाळ'ची कोल्हापूर आवृत्ती सुरू झाली.

'सकाळ' राजकीय पक्षाशी बांधिलकी मानत नाही. 'सकाळ' ला पूर्णपणे वैचारिक स्वातंत्र्य आहे.

स्वातंत्र्यपूर्वकाळात राष्ट्रीय चळवळ व काँग्रेसचे कार्यक्रम यांना पाठिंबा दिल्यामुळे शासनाशी असलेले संबंध अर्थातच चांगले नव्हते. त्या काळात जामीन देण्याचा एक प्रसंगही 'सकाळ'वर आला होता.

राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक असा काही बातम्यांचा अग्रक्रम वा प्राधान्यक्रम नसतो. परंतु सद्यपरिस्थितीत राजकीय प्रश्नांना वृत्तपत्रात आपोआपच जास्त महत्त्व दिले जाते.

नवी पिढी ही प्रामुख्याने विद्यार्थ्यांची आहे. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांबाबत 'सकाळ'ला सहानुभूती आहे. मात्र सध्या 'कॉलेज विश्व' हे सदर छापण्याइतकी जागा 'सकाळ'कडे नाही.

निवडणूक काळात लोकमत निर्मितीच्या बाबतीत गुणवत्तेप्रमाणे उमेदवार निवडून यावा, याबाबत 'सकाळ'-चा प्रयत्न असतो.

'सकाळ' आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण आहे. देणग्या वा अनुदाने मागण्याचा प्रश्न येत नाही. 'सकाळ'ला जे मिळते त्यावर 'सकाळ'चा संसार चालतो. जाहिराती वगळता वृत्तपत्र स्वयंपूर्ण राहू शकणार नाही. 'सकाळ'मध्ये किमान १५% जाहिराती असतात. सरकारी जाहिराती हा एक महत्त्वाचा आधार आहे.

शुभराशी छापणे हे अनिष्ट आणि एकूण समाजास अहितकारक आहे. त्यामुळे 'सकाळ'मध्ये या गोष्टी कटाक्षाने टाळल्या जातात. भविष्य देखील छापले जाते ते फक्त 'रविवार सकाळ'मध्येच.

'सकाळ'ला कर्मचाऱ्यांचे चांगले सहकार्य लाभते. मे १९५८ मध्ये 'सकाळ' मध्ये संप झाला होता. तेव्हाप्रमाणेच सध्या चालू असलेला संपही वेतनश्रेणीच्या संदर्भातीलच आहे. 'सकाळ'च्या सध्याच्या संपात एक चांगली शिस्त आहे हे अभिमानाने सांगावेसे वाटते. [ही मुलाखत घेतली त्यावेळी 'सकाळ'मध्ये संप चालू होता.]

'वाचकांचा पत्रव्यवहार' हे सदर स्वतः संपादक पाहतात. या सदरासाठी येणारी पत्रे १००% खरी असतात. वाचकांच्या नाव, पत्ता, स्वाक्षरीचे अर्थातच बंधन असते.

'सकाळ'च्या समाजातील स्थानाबद्दल संपादक व संचालक पूर्णपणे समाधानी आहेत.

## तरुण भारत

आद्य संपादक : **कै. ग. वि. केतकर**

विद्यमान संपादक : **श्री. वि. ना. देवधर**

पुणेनगरी ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी आहे. तसेच मुंबईखालोखाल महाराष्ट्राची दुसरी राजधानी ही आहे. त्यामुळे पुण्यात 'तरुण भारत' सुरू करण्याची आवश्यकता भासली. सुरुवातीस नागपूरला सुरू झालेले हे दैनिक १९५७ पासून पुण्यातही निघू लागले. हे वृत्तपत्र मुख्यतः मतपत्र म्हणून चालविले जाते. भारतीय संस्कृतीचा अभिमान, राष्ट्रवादाची परंपरा, समन्वयवादी दृष्टी, हिंदुत्वनिष्ठा आणि परस्पर सामंजस्य यांबाबत मतजागृती, हे हेतू या पत्रामागे आहेत.

'तरुण भारत'चा सुरुवातीचा खप केवळ ५००० प्रती अंदाजे इतकाच होता. सध्या दैनिकाचा खप ७० हजार आणि रविवार आवृत्तीचा ८०–८५ हजार तर विशेषांकांचा १ लाखापर्यंत इतका आहे.

या वृत्तपत्राची राजकीय पक्षांशी वा विचारांशी बांधिलेली नाही. एक पत्रकार म्हणून संपादक राजकीय पक्षाशी बांधिलकी मानत नाहीत. मात्र आपली स्वतःची वैयक्तिक मते कोणतीही असू शकतील हेही ते सांगतात.

सरकारचा वृत्तपत्रावर अप्रत्यक्ष दबाव असतोच. याच्या अनेक कारणांपैकी एक महत्त्वाचे कारण म्हणजे वृत्तपत्र-छपाईसाठी लागणाऱ्या कागदाचा पुरवठा सरकारच्या हातात आहे. मात्र आणिबाणीच्या काळातील दबाव किंवा बंधने आता नाहीत.

राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक या विविध क्षेत्रांतील बातम्यांपैकी राजकीय व त्याच्याशी निगडित आर्थिक बातम्यांना अग्रक्रम दिला जातो. चाळिशीच्या पुढच्या व्यक्तींना राजकारण आणि नाटकादी ललितकला ह्यांमध्ये रस असतो. आजची तरुण पिढीही ह्यांमध्ये रस घेते. ' युवक विश्व ' या सदरात विद्यार्थ्यांच्या तात्कालिक प्रश्नांकडे लक्ष दिले जाते.

१९७६ मध्ये आणिबाणीची बंधने एकदम दूर झाली आणि निवडणुका जाहीर झाल्या. साहजिकच आमच्या वृत्तपत्राने लोकमताची निर्मिती करण्याची संधी घेतली. काँग्रेस पक्षाला पर्यायी पक्ष म्हणून जनता पक्ष पुढे आला. या संदर्भात लोकमत घडविण्याची आवश्यकता निर्माण झाली. ते कार्य ' तरुण भारत' ने मोठ्या प्रमाणावर केले. त्यावेळच्या लक्षणीय खपावरूनही ( एक लाख प्रती ) हे स्पष्ट होते.

आर्थिकदृष्ट्या आमचे वृत्तपत्र स्वयंपूर्ण नाही. सरकारी जाहिराती वगळता ते स्वयंपूर्ण राहू शकणार नाही. जाहिराती वगळल्या तर ' तरुण भारत ' ची जी आजची ४० पैसे किंमत आहे ती १ रुपयावर न्यावी लागेल आणि मग परिणाम काय होईल ते आपण जाणताच.

शुभराशी छापण्याचे कारण केवळ स्पर्धा आणि व्यावसायिक तडजोड हेच आहे. एका बाजूला वैचारिक खाद्य पुरविणे आणि दुसऱ्या बाजूस शुभराशी छापणे हे परस्पर-विसंगत आहे हे खरेच आहे. पण तूर्त इलाज सापडत नाही.

लोक दैववादी होण्यास केवळ वृत्तपत्रात छापले जाणारे दैनिक वा साप्ताहिक भविष्य कारणीभूत ठरत नाही. अज्ञानात काय आहे हे शोधण्याची माणसाची सहजप्रवृत्ती आहे. वर्तमानपत्रांनी राशिभविष्य छापण्याचे बंद केले तरी लोक ज्योतिषाकडे जाणे थांबवणार आहेत काय ?

' तरुण भारत' ला कर्मचाऱ्यांचे चांगले सहकार्य लाभत आहे. आजवर कर्मचाऱ्यांचे पगारवाढ आणि बोनस या कारणांसाठी दोन वेळा १९६८ व १९८० ला संप झाले महागाईमुळे पगारवाढ मान्यही केली गेली. कर्मचाऱ्यांचे प्रश्न जरी खरे असले तरी संस्थेची कुवत लक्षात घेणेही आवश्यक आहे.

प्रेस ॲक्ट म्हणजे एकच विशिष्ट असा कायदा नाही. निरनिराळ्या कलमांमध्ये वृत्तपत्राच्या स्वातंत्र्याबाबत ( किंवा त्यावरील बंधनाबाबत) ज्या तरतुदी आहेत त्या सगळ्यांना मिळून प्रेस ॲक्ट संबोधले जाते. उदाहरणार्थ, इंडियन पिनल कोडमध्ये असे एक कलम आहे की आपली वृत्तपत्रातून बदनामी होते आहे असे एखाद्या व्यक्तीस वाटल्यास ती व्यक्ती त्या वृत्तपत्राविरुद्ध खटला भरू शकते; नुकसान भरपाई मागू शकते. वृत्तपत्रांच्या संपादक-संघटनेने प्रेस ॲक्टच्या व्यापक स्वरूपाला काही मुरड घालण्याबाबतचा ठराव करून कायद्यात दुरुस्ती करून घेतली आहे. त्यामुळे आज पत्रकारांना काही प्रमाणात संरक्षण मिळालेले आहे.

' वाचकांचा पत्रव्यवहार ' या सदराकरिता पत्र पाठविताना पत्रावर पूर्ण नाव, पत्ता व स्वाक्षरी असण्याचे बंधन असते. ९०% जनता चांगली आहे या विश्वासानेच आम्ही जनतेची गाऱ्हाणी मांडतो. यातून वाचक आणि वृत्तपत्र यांमध्ये चांगले संबंध प्रस्थापित होऊ शकतात.

वृत्तपत्राच्या कार्याबद्दल पूर्ण समाधान कधीच मिळत नाही. कारण सुधारणा क्षणाक्षणाला व्हावी असे वाटत असते आणि प्रत्यक्षात तसे घडत नसते. मात्र आमची उद्दिष्टये गाठण्याचा आमचा जास्तीत जास्त प्रयत्न असतो.

वृत्तपत्र हे जनतेसाठी असते हे सूत्र अगदी खरे आहे. त्या दृष्टीनेच आम्ही लोकांचे प्रश्न जास्तीत जास्त स्वरूपात मांडण्याचा प्रयत्न करतो. लोकशिक्षण देण्याचाही प्रयत्न चालूच असतो. उदाहरणार्थ ' जनगणना का व कशी ?' ' अर्थसंकल्प म्हणजे काय ' यांसारख्या विषयावर प्रसंगी जाणकारांकडून लेख लिहवून घेतले जातात.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नात जास्तीत जास्त लक्ष घालण्याचा ' तरुण भारत ' चा यापुढे प्रयत्न राहील.

□ □

# Hands Up !

**Ravindra Kashinath Jagtap**
XI Science–F

One fine morning a Boeing was waiting at the Santacruz Airport, Bombay. It was full of passengers. Only one seat was vacant. The pilot was asking the air hostees whether the passenger was coming or not.

Presently a smart young man started walking towards the Boeing. He had a brief-case with him. He had a Bulganin style beard and he wore an up-to-date suit which had stripes on it.

This smart fellow came at the aeroplane. He said, "Good morning" to the air hostess and climbed into the plane. The plane started. Tea and biscuits were served to the passengers. Hardly had they finished their eating when a voice shouted out, "Hands up every body, hands up".

Everyone turned and looked at that strange man. That strange smart fellow was standing with a loaded pistol in his hand, looking cruelly. He again told them, "Hands up" and told them, "Put down every thing & don't move. I am going to hijack this Boeing to Iran." Everyone was terribly scared. The airhostess was so afraid that the empty tea-cups in her hands fell down. She was trembling with fear. "Take out every precious thing from your pockets", the voice drolled out. Everyone took out their purses and ladies took out their ornaments. Then they put down on their table which was in their front. Then they sat in the chairs with their hands up No one was expecting that their Boeing would be hyjacked. Suddenly, there was laughter. All looked at the smart young man. He was laughing with his gun down. He said, 'You chaps were afraid of a false pistol ? This is not a real pistol and I am not a hyjacker. I am a representative of a factory which produces false toy pistols which look like the real ones. I have brought a bag full of pistols with me. Anyone likes to take this pistol ? It will surely help you when you are in danger "

All the passengers were thrilled by this experience. The money that was taken out to be given to the hijacker was used to buy those pistols.

□

# Population Problem in India

**Ravikant Giri**
M. Com. Part II

" Countries that practise death control must also practise birth control or prepare now for a time when their people will have to live standing up because there won't be room to sit down or lie down."

**Dr. C. Lenent Market**

Production is defined as the creation of utility which constitute of a series of the following industries.

(1) Extractive Industries. For example, Mining.

(2) Manufacturing Industries. For example, turning raw material into finished goods.

(3) Commercial Service. For example, Banking, Insurance, Transport.

(4) Direct Services. For example, Doctors, Pleaders.

The volume of production depends on four factors viz : (a) Land (b) Capital (c) Enterpreneurs and (d) Labour. Labour supply depends upon quantity, quality and efficiency of population...Population depends upon birth rate, death rate as well as immigration and migration. Hence population plays a very important role in the field of national development. Population can be looked upon from two different angles (1) Constructive angle, for example, West Germany (2) Destructive angle for example India, China.

The following theories explicitly define the merits and demerits of population which affect national development.

**The Malthus Theory of Population**

The theory of population has been written by Thomas Robert Malthus in 1798. He states (a) By nature human food (natural resources) increases slowly, i e., in arithmatical progression 1, 2, 3, 4, 5.. while population increases quickly, i.e , in geometrical progression 2, 4, 8, 16, 1, 2, 4 ... (b) Production of food is subject to the law of diminishing returns.

**Criticism**

Malthus associated population with food supply only. He could not conceive of industrial development, capable of sustaining a larger population.

**The Optimum Theory of Population**

A ray of hope was held out by Edwin Cannon when he spelt out his optimum theory. This theory is concerned with the relation between the size of the population and the productive efficiency of a country. When the optimum figure is reached the per capita income of individuals is normally the highest. The extent to which the actual population deviates from the optimum is called Maladjustment. The degree of maladjustment can be measured with the help of the following formula.

$$M = \frac{A - 0}{0}$$

M=For Maladjustment
A =For Actual Population
0=For Optimum Population

If M is +ve it indicates overpopulation.
M is −ve it indicates underpopulation.
M is 0 it indicates optimum population.

With overpopulation or underpopulation, per capita income is less than with the optimum population. So every country should strive to maintain the optimum population. With improving agriculture, industries with new instruments etc., optimum population moves from one point to another.

**Criticism**

(1) It is practically impossible to calculate the optimum population for a country.

(2) It does not take into consideration the distributed effects of an increase in the national dividend.

**Net Reproduction Rate**

To decide whether a country is over-populated or underpopulated normally the practice is to find out the difference between Birth rate and Death-rate.

Kuczynski who is the author of the theory of Net Reproduction Rate states that it is not merely a question of finding out the excess of the birth rate over the death rate or vice versa, but the question of female population is of utmost importance.

Importance has been given to the female birth and their reaching the child-bearing-age. Thus Net Reproduction Rate has been defined as the "rate at which the female population replaces itself". To assess the impact of numbers on the growth of nations, 1974 was celebrated as the World Population Year. It was a programme of the United Nation Fund for Population Activites (UNFPA).

The following tables show the actual position of India regarding Population.

GROWTH OF POPULATION IN INDIA (1901–1977)

| Census Year | Population in Crores | Decennial increase or decrease in Crores | % increase or decrease during the decade |
|---|---|---|---|
| 1901 | 23.6 | | |
| 1911 | 25.2 | +1.6 | + 5.7 |
| 1921 | 25.1 | −0.1 | − 0.3 |
| 1931 | 27.9 | +2.8 | +11.0 |
| 1941 | 31.9 | +4.0 | +14.2 |
| 1951 | 36.1 | +4.2 | +13.3 |
| 1961 | 43.9 | +7.8 | +21.5 |
| 1971 | 54 8 | +10 8 | +24.8 |
| 1979 | 64.7 | +9.9* | +18.0* |

* yearly increase is based on the projections made by the Planning Commission. Upto the year 1921, the year of the great divide, the population of India rose at a very slow rate. But after 1921 the population of India began to increase by rapid strides. Rate of growth of population is a function of birth rate and death rate.

## AVERAGE ANNUAL BIRTH AND DEATH RATES IN INDIA

| Decade | Birth per thousand | Deaths per thousand |
|---|---|---|
| 1891–1900 | 45.8 | 44.4 |
| 1901–1910 | 48.1 | 42.6 |
| 1911–1920 | 49.2 | 48.6 |
| 1921–1930 | 46.4 | 36.3 |
| 1931–1940 | 45.2 | 31.2 |
| 1941–1950 | 39.9 | 27.4 |
| 1951–1960 | 40.0 | 18.0 |
| 1961–1970 | 41.1 | 18.9 |
| 1971* | 3[illegible].1 | 18.2 |

* Estimated on the sample registration scheme of the Registrar General

**Birth Rate :** Fertility depends on (1) age at which females marry (2) duration of the period of fertile union and (3) the rapidity with which they build their families.

## MEAN AGE AT MARRIAGE IN SELECTED COUNTRIES

| Country | | Males | Females |
|---|---|---|---|
| Norway | | 28 0 | 24.4 |
| East Germany | | 27.4 | 24.7 |
| France | | 26.0 | 22.6 |
| Japan | | 25.8 | 23.0 |
| India | 1921 | 20.7 | 13.7 |
| | 1951 | 19.9 | 15.6 |
| | 1961 | 21.6 | 15.8 |
| | 1971 | 22.2 | 17.2 |

In India, the mean age at marriage has been low as compared to other countries of the world. The passing of the Child Marriage Restraint Act (Popularly known as **Sharda Act**) in 1929 did have some effect and child marriages declined. Social awareness and spread of education can help to raise the mean age at marriage in future. It is common knowledge that higher age at marriage tends to reduce fertility and this lowers birth rate.

The study of age composition is helpful in determining the proportion of the labour force in the total population.

## % PERCENTAGE DISTRIBUTION OF INDIA'S POPULATION BY AGE GROUPS

| Year | Age Group 0–14 | Age Group 15–60 | Age Group 60 & Over | |
|---|---|---|---|---|
| 1911 | 38.8 | 60.2 | 1.0 | |
| 1921 | 39.2 | 59.6 | 1.2 | |
| 1931 | 38.3 | 60.2 | 1.5 | |
| 1951* | 37 4 | 57.1* | 5.5 | ●● |
| 1961 | 41.0 | 55.3 | 5.7 | |
| 1971 | 41.4 | 53.4 | 5.2 | |
| 1976 | 39.6 | 55.0 | 5,4 | |

* For age group 15-64

●● For the age group 65 and over.

We are having a birth rate of 33 per thousand and death rate of 14 per thousand and the growth rate is about 1 9% per year. The present rate implies two births every three seconds or 21 million births every year. It is expected that the **birth rate** will decline to

| | | |
|---|---|---|
| 33 | Per thousand | in 1979 |
| 29.5 | Per thousand | in 1986 |
| 27 | Per thousand | in 1991 |

Death rate would decline as below :

| | | |
|---|---|---|
| 14 | Per thousand | in 1979 |
| 11.6 | Per thousand | in 1986 |
| 10.4 | Per thousand | in 1991 |

Population would increase as follows :

| | | |
|---|---|---|
| 680 | Million | 1979 |
| 760 | Million | 1986 |
| 799 | Million | 1991 |

Another significant feature of the projected population growth is the sharp rise in the age group of 15–59 which accounted for 54% in 1978; it will increase to 59% of the total population in 1991.

**Remedy**

A demographist of Peking University said, " If we had paid attention to the control of population growth at the beginning of the fifties, our population would have been kept at 750 millions and we would now be leading a much better life. At the end of 1978 the population of China is estimated to be 975 millions. China proposes to adopt a system of "one-child" per family. Some economists feel that India can adopt a "Two Child" per family system.

(1) *Family Planning*: Family planning forms part and parcel of the war against population explosion. This will help to raise the standard of living of the people and to raise the per capita income.

(2) *Raising the age of Marriage* : According to the Indian Marriage Act the age of marriage is 21 for males and 18 for females.

The following measures were adopted by the Government

(A) Motivation programme to spread the knowledge of family planning: All mass media–newspapers, radio, T. V., Films etc. were widely used to spread consciousness about family limitation.

(B) Supply of contraceptives to all sections of rural and urban population.

(C) Financial incentives for family planning in the form of cash awards for undergoing sterillisation.

(D) Extensive use of sterilisation of both males and females.

National Population Policy clearly indicates that the responsibility of controlling population does not merely rest with the Govt. It seeks to involve all types of organisations which could influence public opinion in favour of family planning. i.e. Teacher's Association, Women's Organisation, Trade Unions, Cultural Organisations.

Dr. S Chandrasekher, the eminent population expert has suggested the following methods.

(1) Dissatisfaction should be created in the minds of people about the existing state of economy. The dissatisfaction should be so much that it drives them to have a better standard of living.

(2) The services and supplies in this regard have to be at the doors of the people.

(3) The feeling, cultural, religious and moral of the people should not be hurt in any way while advocating family planning

**Conclusion** :

Family planning is playing very important role in the field of national development. Hence every citizen of India has to cooperate with the government to prevent population explosion

□

# Functioning of the Wholesale Market

—A Close look

**Oswal S. C.**
**Oswal P. H.**
**Lele B. V.**
T. Y. B. Com. 'C'

"Wholesalers are always blamed for hoarding."

"Wholesaling business is the real creator of artificial scarcity."

"Wholesalers' activities are the root-cause of tremendous increase in prices of essential commodities after the Parliamentary and assembly elections of 1979".

We always hear such comments. On the other hand, we study in our text books that the elimination of wholesalers is impracticable Instead of this, in a developing country like India, where departmental stores and mail-order business cannot flourish as a perfect substitute for wholesalers in the distribution-chain, due to low percentage of literacy and poor economic development, the wholesaling business has a great bearing on the stability and functioning of our economy.

From 11th standard up to the final year of our senior college, we study wholesaling business in the class room and read about its meaning, form of organisation, activities, business policies, finance etc. But it is very interesting to know the difference in the actual functioning of wholesale market and what we have studied in our syllabus. With this view in mind we conducted a survey of the working of the wholesale market at Talegaon Dabhade, near Pune. For the preparation of this report we interviewed 5 wholesalers and 4 retailers in this area and 4 farmers in the nearby areas supplying food-grains, jaggery, chillies etc. to wholesalers. We are presenting here some important highlights of our report.



The wholesaling business in this area has developed fast in the last 15 to 20 years due to the industrialization of nearby the areas & the resultant increase in the population of the same areas All wholesalers satisfy the needs of retailers from the town of Talegaon and also from nearby villages such as Indori, Urse, Sudumre etc.

**Types** : Here some wholesalers are manufacturer-wholesalers who undertake the production activities and play the dual role of producers and wholesalers, e.g , manufacturers of Masalas, confectionary items etc.

Some of them are pure wholesalers who perform the role of distributors by purchasing in lots directly from manufacturers and selling in small quantities to the retailer, e.g., wholesalers dealing in edible oils, food-grains, sugar, etc. Some wholesalers deal in only one line of product. So they can be called as one line wholesalers. These wholesalers mostly have agencies of certain products, e.g., wholesalers dealing in soap, cosmetics and washing powders, biscuits and confectionary items etc.

Some others deal in more than one product and also cater to the needs of consumers residing in nearby areas. Thus they combine the role of wholesalers and retailers.

## ORGANISATION

**Form of Organisation** : Many of the wholesalers in this market are sole traders carrying on their business alone with the help of family members and the rest are partnership firms. Not a single wholesaler has established his business on joint stock principles

**Structural Set-up** : The text book information of wholesaling organisation tells us about departmentation and employment of various personnel–qualified and specialized in different fields. But our experience has shown that the practice differs from the theory. Many of the wholesalers do not have sales-purchase, finance managers and the separate departments for each activity. They discharge all the activities on their own with the division of labour amongst partners and family members, based on their ability and experience. Because of this practice the wholesaler can save a great deal on administrative expenses and easily avoid delays. The general public does not appreciate how much this helps in keeping down prices of commodities.

**Capital Structure** : Most of the sole-trader-wholesalers finance their business out of their own 'individual capital'. The partnership firms have their capital resources only through contribution of the partners, but many of them have taken loans from banks. However, the share of bank-loans in the total capital investment is very small Loans from well-to-do traders and relatives occupy an important place The main reasons of such a practice, as explained by some wholesalers, are

(1) a low rate of interest, much lower than the bank rate,

(2) no necessity of guarantee or security,

(3) easy availability and no administrative delays.

Capital requirements of wholesalers depend on the products they deal in and accordingly they vary from business to business. Terms of sales (cash or credit) also play an important role in determining the size of capital requirement.

**ACTIVITIES**

**Buying** : The wholesaler has to arrange the purchases very cautiously taking into account the fluctuations in policies, stability in the market, trends in business, political situations etc Single-line-wholesalers have to purchase only the products in which they deal. Therefore, they have to contact particular manufacturers. Single-line-wholesalers with a speculative flair can always corner more profits.

The wholesalers, dealing in food-grains like jowar, bajree, wheat etc. have the direct contact with the suppliers of the concerned commodities from their home market., e g., jowar from Latur, bajree from Gulberga, wheat from Punjab. Wholesalers dealing in general items arrange their purchases from Poona and Bombay wholesale markets.

**Selling** : Wholesalers do not spend a large amount on advertising for increasing the sales The selling is by direct contact with the retailers. The selling procedure in this market is very simple. When need arises, the retailers from Talegaon market or from nearby villages visit the wholesaler's premises and place their orders with them personally. Sometimes wholesalers make their purchases on large scale. In such a situation they approach the retailers personally, show the samples and book the orders.

**Arhat (Adat) System** : This is a very popular system of sales, in this market. The farmers from nearby villages do not dispose of their produce directly to the wholesalers or retailors. If they do so, they will receive very low prices. So they bring their produce to the wholesalers and keep it in their godowns. The wholesalers sell it on behalf of these farmers The sale proceeds received by disposing of this stock is given to the farmers by deducting some percentage of commission. This system is called 'Arhat' (Adat). Here wholesaler acts as "adatiya". The arhat always ranges between 1½% to 3%. This system is very common in case of the sale of jaggery, chilly and food-grains

**Pricing Policy** : The agency wholesalers have a fixed price policy as they are required to sell the goods as per the company rates, whereas single line-wholesalers price their goods as per the trends in the markets. The wholesalers dealing in food-grains and general items usually earn 10% to 15% of profit.

Pricing policy of wholesalers also differs from customer to customer. This means

customers making purchases on cash basis are charged 2 to 3% less than the customers purchasing on credit basis. Sometimes customers making cash purchases are also given cash commission which is popularly known as 'watav'.

**Credit Policy** : The wholesalers of general items and food-grains generally extend credit facility for 3 to 5 weeks and those dealing in sugar and oil demand cash on-table or some-time give the credit for 8 days The goods purchased on Arhat basis are to be paid for within 2 weeks. The credit is always extended on the basis of goodwill and capacity of the retailers and their relations with other wholesalers.

**Stock System** : Many of the wholesalers in this market have their own godowns Some of them store the goods in their shops only. They do not have any godownman as store-keeper to look after the goods stored. For storing the food-grains rectangular wooden frames are used to keep the bags of food-grains above the ground level.

**Wholesaler-Retailer–Farmer-Relations**

An interview of retailers brought to our notice some details of the relations between wholesalers and retailers. The wholesalers always keep warm relations with retailers. Retailers are always granted the credit facility as and when required. The permanent retailer-customer is always supplied with the products in times of shortage. It is emphasized that the retailer must be very cautious in regards of weights, invoices, issued by the wholesalers. Some time the wholesaler behaves very strangely in times of shortages. They go on piling the stocks with the aim of getting greater profits. They demand on prices for the scarce goods.

The experience of farmers, supplying the goods to be sold on Arhat system, is somewhat unsatisfactory. They are always charged with high percentage of Arhat for the service rendered and deceived while weighing the produce. However, these farmers have to rely on wholesalers' service because if they themselves sell their produce they may get even lower prices. Similarly, they get some advance payment against their produce from wholesalers, if it is not sold out on the spot. However, some farmers have good experience due to their well developed personal relations.

**Conclusion** : After considering all these interviews we can conclude that the functioning of the wholesale market is easy, simple and straight-forward. It is somewhat different from what we study in our books. There is no need of departmentation, persons with educational qualifications or large number of workers or well organised store system.

More government restrictions should be introduced for avoiding malpractices of whelesalers such as, black-marketing, stock piling, adulteration etc. Farmers as far as possible should not go to wholesalers for selling their produce. They must go to "agricultural market committee" for the same purpose.

There is still good scope for starting wholesaling business in oil, food-grains etc, which will help cut monopoly and ensure competitive market. There is need for a wholesaler whose phlicy is 'HONESTY'.

## Going to Fly, In the Sky !

Now I am going to fly,
With my hands in the sky !
In the Sun's shining beams,
There I will swim !
I will fly in the air !
Surprised birds will come near !!
I will seem to them surprised,
In the high world, greatly prized !
In between earth and sun
Flying will be 'such a fun !'

**—Gorade S. B.**
F. Y. B. Sc.

★

# वार्षिक अहवाल

## १९८०-८१

### क्रीडा संघटना : ( वरिष्ठ महाविद्यालय )

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी विविध स्पर्धांत भाग घेऊन नेत्रदीपक यश संपादन केले आणि महाविद्यालयाच्या कीर्तीत भर घातली.

आंतरमहाविद्यालयीन व्हॉलीबॉल स्पर्धांत मुलींच्या संघाने सतत सातव्यांदा अजिंक्यपद मिळवून व्हॉलीबॉल-मध्ये महाविद्यालयाची मक्तेदारी सिद्ध केली. त्याचप्रमाणे, जिम्नॅस्टिक्स मध्ये सतत दुसऱ्यांदा उपविजेतेपद मिळविले. प्रथमच आमच्या महाविद्यालयाच्या मुलांच्या बॅडमिंटन संघाने उपविजेतेपद मिळवून इनडोअर गेम्समध्ये सुद्धा चमकण्यास सुरवात केली. तसेच फुटबॉल, बास्केटबॉल, चेस, वॉटरपोलो, क्रिकेट या स्पर्धांमध्ये उपांत्यपूर्व फेरीपर्यंत मजल गाठली. क्रीडाक्षेत्रात विशेष नैपुण्य आणि सर्वोच्च बहुमत प्राप्त करणारे विद्यार्थी आमच्या महाविद्यालयात आहेत याचा आम्हास अभिमान वाटतो.

कु. सुनीता देशपांडे ( द्वि. वर्ष शास्त्र ) हीस महाराष्ट्र शासनाचा १९७८-७९ चा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त झाला. तसेच उत्तम खो खो पटू म्हणून कु. निशा अंबिके हीस राणी लक्ष्मीबाई पुरस्कार प्राप्त झाला.

श्री. संजय जोशी ( द्वि. वर्ष वाणिज्य ), श्री. अशोक काळे ( तृ. वर्ष कला ), कु. मिथिला जबडे ( द्वि. व. वाणिज्य ) या विद्यार्थ्यांनी श्रीलंका येथे झालेल्या निमंत्रित खेळाडूंच्या मैदानी स्पर्धेत भाग घेतला.

आंतर महाविद्यालयीन क्रीडास्पर्धांत विशेष नैपुण्य

कु. स्मिता खैरे, तृ. वर्ष वाणिज्य, ४०० मीटर फ्रिस्टाईल तृ. क्रमांक आणि २०० मी. बॅकस्ट्रोक

श्री. यशोधन बाळ, प्र. वर्ष कला, १०० मी. ब्रेस्टस्ट्रोक

श्री. आर. जी. शिंदे, तृ. वर्ष शास्त्र, 'रोम रिंग' प्र. क्रमांक आणि पॉमेल्ड्र हॉर्स द्वि. क्रमांक.

आंतर विभागीय सामन्यांसाठी आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी पुणे शहर विभागातर्फे भाग घेऊन पुणे विभागाच्या विजयात महत्त्वाचा वाटा उचलला.

| | | |
|---|---|---|
| कु. | सुजाता गांधी, प्र. वर्ष कला | व्हॉलीबाल |
| कु. | कृष्णा सोमण, एम् कॉम प्रथम वर्ष | |
| कु. | अनीता पठारे, प्रथम वर्ष वाणिज्य | ,, |
| कु. | निशा कुलकर्णी, प्र. वर्ष कला | ,, |
| कु. | प्रतिभा खांडगे, प्र. वर्ष कला | ,, |
| ,, | बीना कदम, तृ. वर्ष वाणिज्य | बास्केटबॉल |
| ,, | सीमा भापसे, ,, | ,, |
| ,, | बीना कदम, ,, | हॅन्डबॉल |
| ,, | सीमा भापसे, ,, | ,, |
| ,, | कृष्णा खटावकर, द्वि. वर्ष वाणिज्य | कबड्डी |
| श्री. | आर. एच्. डोळे, तृ. वर्ष वाणिज्य | क्रिकेट |
| ,, | आर. जी. शिंदे, तृ. वर्ष शास्त्र | जिमनास्टिक्स् |
| ,, | यू. एम. अचवल, ,, | वॉटरपोलो |
| ,, | पी. पी. फुले, प्रथम वर्ष शास्त्र | ,, |
| ,, | यू. व्ही. जोगळेकर, द्वि. वर्ष वाणिज्य | बॅडमिंटन |
| ,, | व्ही. एम्. बोधे, ,, | ,, |

दिल्ली येथे झालेल्या अखिल भारतीय हॉकी स्पर्धांसाठी आपल्या महाविद्यालयातील श्री. राहूल जाधव ( प्रथम वर्ष कला ) याची महाराष्ट्र N.C.C. संघात निवड झाली होती.

खालील विद्यार्थ्यांनी आंतरराज्य क्रीडास्पर्धेत पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले:—

| | | |
|---|---|---|
| श्री. | आर जी. शिंदे, तृ. व. शास्त्र | जिम्नॅस्टिक्स |
| ,, | पी. पी. फुले, प्र. वर्ष शास्त्र | व्हॉलीबॉल |
| ,, | व्ही. एम्. कुलकर्णी, तृ. व. वाणिज्य | बॉलबॅडमिंटन |
| ,, | डी. एस्. गोसावी, तृ. व. वाणिज्य | ,, |

कु. सुनंदा इंगळे, द्वि. वर्ष कला ,,
,, बीना कदम, तृ. वर्ष वाणिज्य फुटबॉल
,, सीमा भापसे, तृ. वर्ष वाणिज्य ,,
,, सुनंदा बेलसरे, प्र. वर्ष वाणिज्य नेटबॉल आणि फुटबॉल
,, मिथिला जबडे, द्वि. वर्ष वाणिज्य ३००मी. पळणे
श्री. अशोक काळे, तृ. व. कला हॉपस्टेप जंम्प
कु. निशा अंबिके, द्वि. वर्ष शास्त्र खो-खो
,, संगीता ताटके, द्वि. वर्ष शास्त्र ,,
,, सुनीता देशपांडे, ,, ,,
,, मिथिला जबडे, द्वि. वर्ष वाणिज्य ,,
श्री. अतुल वाकणकर, तृ. व. वाणिज्य ,,

खालील विद्यार्थ्यांनी आंतरविद्यापीठ क्रीडास्पर्धेत पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेः—

कु. कृष्णा सोमण, एम् कॉम व्हॉलीबॉल
,, अनिता पठारे, प्र. वर्ष वाणिज्य ,,
,, नीशा कुलकर्णी, प्रथम वर्ष कला ,,
,, बीना कदम, तृ. वर्ष वाणिज्य हॅंडबॉल
,, सीमा भापसे, तृ. वर्ष वाणिज्य ,,
श्री. आर जी. शिंदे, तृ. वर्ष शास्त्र जिम्नॅस्टिक्स्

## आंतरवर्गीय क्रीडा स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयात विविध सामने व खेळाचे आंतरवर्गीय सामने घेण्यात आले. ह्या स्पर्धांना विद्यार्थि-विद्यार्थिनींचा उत्तम प्रतिसाद मिळाला. विशेष म्हणजे या सर्व स्पर्धा विद्यार्थ्यांनीच आयोजित केल्या होत्या.

या वर्षी "मॉडर्न श्री"चा सन्मान श्री शेख एम्. ए. (प्रथम वर्ष वाणिज्य) या विद्यार्थ्याने मिळविला. मुलींचे वैयक्तिक क्रीडा नैपुण्यपद कु. बीना कदम (तृ. वर्ष वाणिज्य) या विद्यार्थिनीने मिळविले. तसेच सर्वसाधारण विजेतेपद तृ. वर्ष शास्त्र या वर्गाने मिळविले.

यावर्षी "आदर्श विद्यार्थी"चा बहुमान कु. बीना कदम (तृ. वर्ष वाणिज्य) या विद्यार्थीनीने मिळविला.

आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांच्या तयारीसाठी शकुंतला खटावकर, भारती शहा, श्री. कोल्हटकर, श्री. मिटकर, श्री. काळे, श्री. सावर्डेकर, श्री. साठे, श्री. गोडबोले श्री. कर्वे, श्री. गोळे यांचे बहुमोल मार्गदर्शन मिळाले. त्यांच्याकडून असेच सहकार्य यापुढे मिळेल अशी आम्हास आशा वाटते.

सर्वश्री प्राध्यापक बनसोडे, लागू, पाथरे, गोसावी, एम्. ए. कुलकर्णी, छाब्रा, सौ. नवाथे, सौ. लिमये यांचे सहकार्य लाभले.

तसेच आमचे प्राचार्य व उपप्राचार्य यांचे आम्हाला नेहमीच उत्तेजनात्मक सहकार्य मिळते. त्याबद्दल त्यांचे आभार.

**कु. सीमा भापसे**
विद्यार्थि प्रतिनिधी

**प्रा. म. आ. कुलकर्णी**
कार्याध्यक्ष

# क्रीडा संघटना : (कनिष्ठ महाविद्यालय)

१९८०–८१ या शैक्षणिक वर्षात मॉडर्न महाविद्यालयाच्या कनिष्ठ विभागातील जवळजवळ ३२५ विद्यार्थि-विद्यार्थिनींनी एकूण २० विविध खेळांमध्ये मोठ्या उत्साहाने व हिरीरीने भाग घेऊन कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्रीडा-विभागाची शान वाढविली.

जिल्हा परिषदेने भरविलेल्या आंतर शालेय पावसाळी व हिवाळी सत्र स्पर्धांमध्ये आमच्या महाविद्यालयातील खेळाडूंनी पुढील विविध खेळांमध्ये भाग घेतला.

व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, जिम्नॅस्टिक्स, कुस्ती, बास्केटबॉल, खो-खो, फुटबॉल, कबड्डी, टेबल-टेनिस, पोहणे व मैदानी स्पर्धा.

वरील स्पर्धांपैकी विशेष नैपुण्य खालीलप्रमाणे—

(१) व्हॉलीबॉल (मुली) उपविजेतेपद
(२) बॉस्केटबॉल (मुले) उपविजेतेपद
(६) खो-खो (मुली) उपविजेतेपद

कबड्डी व व्हॉलीबॉल यामधील खेळाडूंनी उपान्त्य पूर्व सामन्यांपर्यंत मजल मारली.

आंतरशालेय पुणे जिल्हा मैदानी स्पर्धेत आमच्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी विशेष चमक दाखविली :—

(१) कु. अल्पना थोरात (११ वी वाणिज्य)
थाळीफेक प्रथम क्रमांक

( २ ) कु. विद्या कवचाळे ( ११ वी शास्त्र )
लांब उडी — द्वितीय क्रमांक

( ३ ) कु. अरुंधती पंडित ( १२ वी )
८०० मीटर धावणे — द्वितीय क्र.
४०० मीटर धावणे — तृतीय क्रमांक

( ४ ) श्री. उमेश उभे (११ वी शास्त्र)
कुस्ती — द्वितीय क्रमांक

( ५ ) कु. स्वाती दिवेकर ( १२ वी शास्त्र )
जलतरण ५० मी बॅक स्ट्रोक द्वितीय क्रमांक

( ६ ) श्री. धनंजय भाटे (१२ वी शास्त्र)
जलतरण १०० मी. फ्रीस्टाईल : प्रथम क्रमांक

हैद्राबाद येथे भरविण्यात आलेल्या आंतरशालेय बॉस्केटबॉल हिवाळी सत्र स्पर्धात राजेंद्र देशपांडे व दिनेश खळदकर ( १२ वी शास्त्र ) या स्पर्धकांनी आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

कलकत्ता येथे भरविण्यात आलेल्या आंतरशालेय व्हॉलीबॉल पावसाळी सत्र स्पर्धात अलका दीक्षित ( १२ वी कला ) या विद्यार्थिनीने महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

पुणे जिल्हा विभागीय मैदानी स्पर्धात कु. अल्पना थोरात ( ११ वी वाणिज्य ) या विद्यार्थिनीने आपल्या महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले.

## आंतरवर्गीय स्पर्धा

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही महाविद्यालयाच्या सांघिक व वैयक्तिक आंतरवर्गीय स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी त्यात उत्साहाने भाग घेतला. सर्व स्पर्धा यशस्वी रीत्या पार पडल्या. मुलांचे वैयक्तिक नैपुण्यपद १२ वी ' अ ' या वर्गातील जंगम प्रकाश या विद्यार्थ्याने पटकावले तर मुलींचे वैयक्तिक नैपुण्यपद कु. संगीता शिंदे या ११ वी ' आय ' वर्गातील विद्यार्थिनीने पटकावले.

बारावी ' एच् ' ( वाणिज्य ) हा वर्ग सर्वसाधारण विजेतपदाचा मानकरी ठरला.

क्रीडाविभागास महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व उपप्राचार्य व इतर प्राध्यापकवर्ग यांचे सतत सहकार्य मिळाले. त्यांच्या प्रोत्साहनाने कनिष्ठ विभागातील विद्यार्थी विशेष प्रगती दाखवू शकले.

**प्रा. जी. एम्. बनसुडे**
उपकार्याध्यक्ष

**श्री. ए. एम्. हिंगे**
सहाय्यक क्रीडा संघटक

**श्री. विनोदकुमार छाब्रा**
क्रीडा-संघटक

## कला मंडळ

या वर्षीपासून क्रीडा संघटना आणि कला मंडळ अशा दोन संघटना महाविद्यालयीन कार्याच्या सोयीसाठी वेगळ्या करण्यात आल्या. पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेची सुरुवात म्हणजे सर्वच महाविद्यालयांच्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात असते. आपल्या महाविद्यालयाने दिनांक २–९–१९८० या दिवशी वरील स्पर्धेमधे श्री. चं. प्र. देशपांडे, लिखित ' समुदाय ' ही एकांकिका सादर केली. या एकांकिकेत अतुल देशपांडे, सीमा कुलकर्णी, मिलिंद दाते, यशोधन बाळ, आनंद मासूर, राजेंद्र पोंक्षे, प्रमोद देशपांडे, राजेंद्र मुळे, जयश्री दाणी, सुजाता गानू, विकास म्हसकर या विद्यार्थि-विद्यार्थिनींनी भाग घेतला. संजीव खंडागळे ( तृतीय वर्ष शास्त्र ) याने या एकांकिकेचे दिग्दर्शन केले.

दि. ९–९–१९८० रोजी महाविद्यालयाच्या कला मंडळाचे औपचारिक उद्‌घाटन प्रसिद्ध सिने–नाट्य अभिनेते श्री. श्रीकांत मोघे यांच्या हस्ते पार पडले.

कनिष्ठ महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी या वर्षापासून त्यांच्या भाषा विषयांच्या क्रमिक पुस्तकांमधील काही एकांकिका अभ्यासत आहेत. एकांकिका या कलाप्रकाराचे प्रायोगिक महत्त्व ( दृश्य परिणाम ) लक्षात घेऊन त्यांनी एकूण चार एकांकिका सादर केल्या. त्यांतील तीन क्रमिक पुस्तकातून घेतल्या होत्या. हिंदी–मराठी–इंग्रजी अशा भाषांमधून या एकांकिका सादर झाल्या. त्यांची नावे व कलाकार खालीलप्रमाणे :

**मराठी एकांकिका :** ' बंड्या, नानू आणि गुलाबी हत्ती ';

कलाकार– देवदत्त पाठक, अशोक रानडे, सुनील कुलकर्णी, कांचन पानसे, मीना माने, उर्मिला उंडे.

**हिंदी एकांकिका**–( १ ) ' बहूकी बिदा '

कलाकार– अजय खोले, प्रवीण ओसवाल, शंकर जाङ्ग, बीना जांगडा, रश्मी गोस्वामी.

( २ ) ' बुरे फसें मेहमान बनकर । '

कलाकार– मनोज नरुला, राहूल मुखर्जी, नीता गोरे, सरोज देवरा, रेणू चौधरी, श्रीधर धनागरे.

**इंग्रजी एकांकिका**– 'The Bishop's Candle-stickes.'

कलाकार– शंकर जाङ्ग, मृणालिनी शहा, कुसुम भोसले, प्रदीप, दास नितीन शुक्ला.

या एकांकिकांचे प्रयोग दि. २७-९-८० रोजी झाले.

या वर्षीही कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नाट्यवाचन व नाट्याभिनय यांच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यावर्षी या स्पर्धा केवळ मराठी भाषेपुरत्या मर्यादित न ठेवता हिंदी व इंग्रजी भाषांसाठीही खुल्या होत्या. या स्पर्धा दिनांक २, ३ व ४ ऑक्टोबर रोजी घेण्यात आल्या.

यशस्वी संघ आणि विद्यार्थी–

नाट्यवाचन– कनिष्ठ–

( १ ) ' आषाढातील एक दिवस '– विकास पेशवे, प्रदीप चोपडे, विजय वैद्य, कृति नागरेचा, राजश्री बेडेकर.

( २ ) ' भोर का तारा '– संजय भारद्वाज, जगदीश वर्मा, नीता गोरे.

( ३ ) 'A marriage proposal' – शंकर जाङ्ग, कुसुम भोसले, राजू आगरवाल.

वैयक्तिक पारितोषिके–

( १ ) विकास पेशवे

( २ ) शंकर जाङ्ग

( २ ) मनिषा जोशी

उत्तेजनार्थ–जयश्री दाणी, कृती नागरेचा, मृणालिनी शहा, राजश्री बेडेकर, कुसुम भोसले, शुभदा शहा, विजय वैद्य.

नाट्यवाचन– वरिष्ठ–

( १ ) ' आपुले मरण पाहिले म्या डोळा '– संजीव खंडागळे, मिलिंद दाते. उत्तेजनार्थ– शुभदा कुलकर्णी.

**नाट्याभिनय** –

कनिष्ठ– देवदत्त पाठक, संजय भारद्वाज.

वरिष्ठ–शैला हंडे, अनंत एस्.

परिक्षक म्हणून प्रा. जगदीश चिंचोरे आणि प्रा. सौ. लीना पाटणकर यांनी काम पाहिले.

विविध भाषांतील नाटकांचे वाचन आणि प्रयोगदर्शन हा उपक्रम या वर्षी नव्याने करण्यात आला.

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नटवर्य चित्तरंजन कोल्हटकर यांचे हस्ते दिनांक ११–१०–८० रोजी पार पडला.

दिनांक १३–१०–८० रोजी मुंबई दूरदर्शनच्या ' युवदर्शन ' मध्ये ' फुली आणि गोळा ' या स्पर्धात्मक कार्यक्रमात आनंद मासूर, राजेश ओझा, सीमा कुलकर्णी, मंगला साने यांनी भाग घेतला. स्पर्धेचा विषय होता ' चित्रपट '.

दूरदर्शनच्या पद्धतीने रोटरी क्लबने आयोजिलेल्या What's the good word या कार्यक्रमात सुनील दाढे व बीना कदम यांनी भाग घेतला.

यानंतर नगरच्या ' शारदा करंडक एकपात्री ' स्पर्धेमधे शुभदा कुलकर्णी व सुनील कुलकर्णी यांनी भाग घेतला.

दिनांक ५ डिसेंबर १९८० रोजी ' ड्रॉपर्स नाट्य-वाचन ' स्पर्धेत ' क्षितिजरेषा ' ही एकांकिका आनंद मासूर, संजीव खंडागळे व मधुवंती कवडी यांनी वाचली.

' गदगकर आंतर-महाविद्यालयीन वाद्यवृंद स्पर्धे 'त नीलिमा परांजपे, अनिता गर्दे, संजय गायकवाड, कुसुम भोसले, अतुल चौधरी, शंकर जाङ्ग, सुषमा लाटकर, श्रीकांत पिंपळकर, यशोधन बाळ, प्रदीप चोपडे यांनी वाद्यवृंद सादर केला. याच स्पर्धेत सुगम–संगीत या विभागात संगीता उंबरेकर यांनी भाग घेतला. वाद्यवादनात श्रीकांत पिंपळकरने तबलावादन केले.

' वसुमति विजापुरे एकपात्री अभिनय ' स्पर्धेत शुभदा कुलकर्णीने चौथे पारितोषिक मिळविले.

पुणे विद्यापीठाने आयोजित केलेल्या ' युवक महोत्सवात ' महाविद्यालयाने एक समूहगान, समूह नृत्य, एकांकिका, कथाकथन, काव्यवाचन, वाद्यवादन व मराठी वक्तृत्व यांमधे भाग घेतला. स्पर्धकांची नांवे– स्नेहल बेंद्रे, गजगौरी पुरंदरे, अनिता गर्दे, सुनीता कणसे, सविता जोशी, स्वाती घाटे, वंदना आडकर, सुवर्णा बेंद्रे, अंजली मालशे, नंदिनी गाडगीळ, गीता मोखाल, सुरेखा हुंडेकर, आनंद दाढे, आनंद मासूर, अतुल देशपांडे, मिलिंद दाते, संजीव खंडागळे, यशोधन बाळ.

हा युवक महोत्सव दिनांक ६, ७, ८ फेब्रुवारी रोजी संगमनेर येथे आयोजित केला गेला. आपल्या संघाचे व्यवस्थापक म्हणून प्रा. श्री. आर. व्ही. कुलकर्णी, प्रा. मराठे, आणि प्रा. सौ. लीना पाटणकर हे गेले होते.

कलामंडळाचा समारोप आम्रलता आशा करलगीकर, नाथ नेरळकर यांच्या सुश्राव्य 'मराठी गझल' गायनाने दिनांक ९-२-८१ रोजी झाला. या गझलांचे कवी श्री. हिमांशु कुलकर्णी होते. निवेदन रविन्द्र सुर्वे यांनी केले.

वर्षाच्या विविध उपक्रमांची यशस्वी कार्यवाही होण्यात डॉ. गंधे, डॉ. भोंडे, प्रा. चिंचोरे, प्रा. राजीव कुलकर्णी, कु. पेंढरकर, प्रा. अमृता सातभाई यांचे परिश्रम कारणी झालेले आहेत. या सर्वांमध्ये प्रा. राजीव कुलकर्णी यांचा सहभाग सर्वात अधिक होता.

**पर्वते**
चिटणीस

**डॉ. वि. भा. देशपांडे**
कार्याध्यक्ष,

## वादविवाद मंडळ

ह्या वर्षी महाविद्यालयातील अनेक विद्यार्थि-विद्यार्थिनींनी वादस्पर्धेत व वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला. महात्मा फुले वादस्पर्धेत कु. ज्योति गिरमे यांना तृतीय क्रमाकङ्काचे बक्षीस मिळाले, तर कु. संध्या कुलकर्णी यांना प्रशस्तिपत्र मिळाले. दीनदयाळ उपाध्याय वाद स्पर्धेत कु. ज्योति गिरमे यांना प्रशस्तिपत्र मिळाले. बारामती येथे होणाऱ्या कविवर्य मोरोपंत वाद आणि वक्तृत्व स्पर्धेत श्री. सुनील दाढे व श्री. विनायक पोंक्षे यांनी भाग घेतला. स्वा. सावरकर वाद स्पर्धेत कु. ज्योति गिरमे यांना तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. लायन्स क्लबतर्फे आयोजित केलेल्या वाद स्पर्धेत श्री. सुनील दाढे यास तृतीय पारितोषिक मिळाले तर कु. ज्योति गिरमे यांना प्रशस्तिपत्र मिळाले.

महाविद्यालयात कर्नावट करंडक वाद स्पर्धा आयोजित करण्याचे हे दुसरे वर्ष होय. अनेक महाविद्यालयातील स्पर्धकांनी या वाद स्पर्धेत भाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन दै. तरुण भारतचे संपादक श्री. वि. ना. देवधर यांनी केले. पुण्याच्या टिळक आयुर्वेद महाविद्यालयास यंदा करंडक मिळाला. बी. जे. मेडिकल महाविद्यालयाचे श्री. अविनाश भोंडवे यांस प्रथम पारितोषिक व टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या कु. प्रफुल्लता पुरंदरे यांना द्वितीय पारितोषिक मिळाले. डॉ. हेमंत इनामदार व डॉ. अशोक कामत यांनी स्पर्धेचे परीक्षण केले. सर्व यशस्वी स्पर्धकांचे मनःपूर्वक अभिनन्दन !

**अरुण दळवी**
प्रतिनिधी

**डॉ. शं ना. नवलगुंदकर**
मार्गदर्शक प्राध्यापक

## मॉम

'मॉम' ह्या हस्तलिखित भित्तिपत्रकाचे पहिल्या सत्रात दोन आणि दुसऱ्या सत्रात दोन असे चार अंक निघाले.

यंदा 'मॉम'ने पुढाकार घेऊन पुण्यातल्या महाविद्यालयातील भित्तिपत्रके चालविणाऱ्या विद्यार्थ्यांना एकत्र आणले. या सर्व विद्यार्थ्यांना एकत्र आणून भित्तिपत्रकाचे स्वरूप अधिक व्यापक करण्याचा 'मॉम'चा प्रयत्न आहे. यंदा 'मॉम'ने त्या दिशेने दोन उपक्रमांना पाठिंबा दिला. पहिला उपक्रम म्हणजे पुण्यातल्या महाविद्यालयातील भित्तिपत्रकांच्या संपादकांच्या साहाय्याने आयोजित केलेली 'आंतर महाविद्यालयीन व्यंगचित्र रेखाटन स्पर्धा.' ही स्पर्धा ऑक्टोबर १९८० मध्ये स. प. महाविद्यालयात घेण्यात आली. 'कविता दशकाची' या प्रतिनिधिक काव्यसंग्रहावर दिनांक १८ जानेवारी १९८१ रोजी फर्गसन महाविद्यालयात घेण्यात आलेले पूर्ण दिवसाचे चर्चासत्र हा दुसरा उपक्रम. यातही 'मॉम' चा संपूर्ण सहभाग होता.

पुण्यातल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये साहित्यविषयक आदानप्रदान होऊन त्यांच्यातील साहित्य समालोचन गुणांची अभिवृद्धी व्हावी या दृष्टीने 'मॉम'ने सुरू केलेले प्रयत्न अभिमानास्पद होत.

**अशोक लोंढे**
सचिव मॉम

**प्रा यशवंत सुमंत**
मार्गदर्शक प्राध्यापक

## स्नेहसंमेलन

दिनांक २२, २३, २४ जानेवारी १९८१ या तीन दिवशी स्नेहसंमेलन यशस्वीपणाने संपन्न झाले.

या वर्षीच्या सम्मेलनाचे काही विशेष म्हणजे फनफेअरचे उद्घाटन. आपल्या महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. लक्ष्मीदेवी स्वामी (द्वितीय, वर्ष वाणिज्य) हिने केले. तसेच अपंग-वर्षानिमित्त पुण्यातील अपंगांसाठी कार्य करणाऱ्या काही संस्थांनी त्यांच्याकडे तयार होणाऱ्या वस्तूंचे एक प्रदर्शन आपल्या महाविद्यालयात भरविले होते. त्यातल्या अनेक वस्तूंची विक्री मोठ्या प्रमाणात झाली.

सम्मेलनाच्या यशस्वितेत सर्व क्रीडा प्रतिनिधी, वर्गप्रतिनिधी आणि विशेषतः विद्यापीठ प्रतिनिधी चिंतामण टिळेकर, आय्. सी. एस्. आर. सीमा भापसे ह्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. प्राचार्य, उपप्राचार्य सर्व समित्यांचे सल्लागार आणि सहकारी प्राध्यापक ह्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सर्वांना धन्यवाद.

**डॉ. वि. भा. देशपांडे**
सम्मेलन कार्याध्यक्ष

# शारीरिक शिक्षण विभाग ( वरिष्ठ महाविद्यालय )

महाविद्यालयाच्या १९८०–८१ या शैक्षणिक वर्षाच्या शारीरिक शिक्षणाच्या तासांना १५-७-८० रोजी सुरुवात झाली व उपस्थित विद्यार्थ्यांदूनच इच्छुक विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून निवड करण्यात आली. संघनायकांना दि. २२ ते ३० जुलै या कालावधीत वरिष्ठ संघनायक व शारीरिक शिक्षण संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण देण्यात आले. प्रथम वर्ष कला, शास्त्र व वाणिज्य या वर्गासाठी आठवड्यातून ३ वेळा (मंगळवार, बुधवार, गुरुवार ) सकाळी ६–४० ते ७–२० या या वेळात शारीरिक शिक्षणाचे तास घेण्यात आले.

महाविद्यालयात प्रथम वर्ष कला, शास्त्र व वाणिज्य शाखांचे मिळून १५६ विद्यार्थी व १९७ विद्यार्थीनी रोज शारीरिक शिक्षणाच्या तासांना हजर होते. काही विद्यार्थी महाविद्यालयापासून खूप दूर रहात असल्याने त्यांची प्रत्येक सत्राच्या शेवटी शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली. पहिल्या सत्राची परीक्षा दि. २१-९-८१ रोजी झाली. यात मुख्यत्वे पुढील कसोट्यांचा समावेश केला होता. (१) १०० मी. धावणे (२) स्कॉट अ‍ॅण्ड थ्रस्ट (३) शरीर खेच पुल-अप्स (मुली) (४) सीट अप्स (मुली) (५) दोरीवरील उड्या (मुली) (६) लांब उडी.

शारीरिक शिक्षणासाठी लागणारे गणवेश दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाविद्यालयातर्फे उपलब्ध करून देण्यात आले. त्याचा पुष्कळ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

महाविद्यालयाचे दुसरे सत्र दि. ३ डिसेंबर ८० रोजी सुरू झाले. दूर रहाणाऱ्या विद्यार्थ्यांची या सत्रातही पहिल्या सत्राप्रमाणेच दि. १–२–८१ रोजी शारीरिक क्षमता कसोटी घेण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शारीरिक शिक्षणाचे वेळी खालील उपक्रम घेण्यात आले. (१) रोड रनिंग, (२) जिमनॅस्टिक्स, (३) भारतीय पद्धतीचे व्यायाम, (४) यौगिक पद्धतीचा व्यायाम, (५) सूर्यनमस्कार, (६) डिप्स.

याच बरोबर टेकडीवरून धावणे. क्रॉस कंट्री, दोरावरून चढणे या नव्या उपक्रमांचा समावेश यंदा करण्यात आला. त्याला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्तपणे चांगला प्रतिसाद मिळाला. याच बरोबर हॉकी, बॉस्केटबॉल, फुटबॉल, बेसबॉल, व्हॉलीबॉल. यांसारख्या खेळांचे शारीरिक शिक्षण संचालकांनी विद्यार्थ्यांना शास्त्रशुद्ध मार्गदर्शन केले. मुलांसाठी १ मैल अंतर (१–५ कि. मी. ) ५ मिनिटांत पूर्ण करणे ही चाचणीसुद्धा घेण्यात आली.



याशिवाय क्रीडांगण सफाई, गाजर गवत उच्चाटन या सारख्या सेवात्मक कार्यक्रमांनाही विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.

शारीरिक दोषांचे व्यायामाद्वारे उच्चाटन, मसाज व आरोग्यविषयक सल्ला, शारीरिक शिक्षणने उंची वाढवणे, यौगिक व्यायाम व प्राणायाम या विषयांवरील व्याख्याने प्रत्येक वर्षी शारीरिक शिक्षणाच्या तासाला वर्गात व मैदानावर देण्यात येतात. या व्याख्यानांचा समावेश या वर्षीही केला होता. याचा विद्यार्थ्यांना यथायोग्य लाभ झाला.

**वैद्यकीय तपासणी :** प्रथम वर्ष शास्त्र, वाणिज्य व कला या वर्गांची दि. १-२-८१ रोजी ' मेडिकल टेस्ट ' घेण्यात आली. ही तपासणी या वर्षी शारीरिक शिक्षण विभागाकडे सोपविली होती. त्यानुसार संघ नायक ( मुले ) व संचालक यांनी डॉक्टर्सना योग्य मदत करून ती यशस्वीपणे पार पाडली.

१५ ऑगस्ट ( स्वातंत्र्य दिन ) व २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन ) हे आपले राष्ट्रीय सण. हे सण विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्साहाने साजरे केले.

खालील विद्यार्थ्यांनी या वर्षी उत्तम शारीरिक शिक्षण संघनायक ( पी. टी. लिडर ) म्हणून काम पाहिले.

( १ ) श्री. सावे संजय, द्वि. व. शास्त्र
( २ ) श्री. बोडस मेघनाद, द्वि. व. वाणिज्य
( ३ ) श्री. अवचेट्टी अशोक, प्र. व. शास्त्र
( ४ ) श्री. गायधनी सुधीर, प्र. व. शास्त्र
( ५ ) कु. घाटे स्वाती, प्र. व. शास्त्र
( ६ ) कु. कगसे सुनीता, प्र. व. शास्त्र
( ७ ) कु. हिरेमठ परिणिता, द्वि. व. वाणिज्य
( ८ ) कु. जोशी नीलिमा, प्र. व. वाणिज्य

( ९ ) कु. गाडगीळ नंदिनी, प्र. व. वाणिज्य

मा. प्राचार्य व प्राध्यापक वर्ग, संघनायक, तसेच जिमखाना विभागाचे कार्याध्यक्ष, कर्मचारी श्री. पवार व श्री. कदम यांच्या कडून वेळोवेळी लाभलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.

कि. शं. लागू
संचालक
शारीरिक शिक्षण विभाग.

## शारीरिक शिक्षण विभाग ( कनिष्ठ महाविद्यालय )

कनिष्ठ महाविद्यालयाच्या १९८०–८१ या शैक्षणिक वर्षात कला, शास्त्र, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांचे शारीरिक शिक्षणाचे तास नियमितपणे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वेळा-पत्रकात समाविष्ट करण्यात आले. प्रथम वर्षाच्या १० व द्वितीय वर्षाच्या १० अशा एकूण २० तुकड्या असून त्यांचे आठवड्यातून शारीरिक शिक्षणाचे किमान २ तास घेण्यात आले.

विद्यार्थी व विद्यार्थिनी मिळून १६ विद्यार्थ्यांची शारीरिक शिक्षण संघनायक म्हणून निवड करण्यात आली. कला शाखेच्या विद्यार्थ्यांचे शारीरिक शिक्षणाचे तास सकाळी ७–३५ ते ८–२० आणि शास्त्र व वाणिज्य शाखांचे तास दुपारी ३–५० ते ६–५० या वेळात घेण्यात आले.

विद्यार्थ्यांना फुटबॉल, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॉकी, खो-खो व कबड्डी इत्यादी निरनिराळ्या खेळांची माहिती व शिक्षण देण्यात आले. तसेच विद्यार्थिनींना व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, खो-खो, थ्रो बॉल, हॉकी या खेळांची माहिती व शिक्षण देण्यात आले. त्या त्या खेळामागील तंत्र, कौशल्य आणि नियम याविषयी माहिती देण्यात आली.

पहिल्या सत्रातील शारीरिक शिक्षण कसोटी ऑक्टोबर महिन्यात घेण्यात आली. यामध्ये पुढील प्रकारांचा समावेश होताः ( १ ) १०० मि. धावणे. ( २ ) लांब उडी. ( ३ ) गोळा फेक. प्रत्येक प्रकाराकरिता १० असे एकूण ३० गुण होते. वार्षिक परिक्षेत २० गुणांची वाढ करण्यात आली. या २० गुणांत १० गुण हजेरीला व १० गुण खेळाकरिता ठेवण्यात आले होते.

अपात्र व अपंग विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाचे द्वारे त्यांच्या शारीरिक / व्यावसायिक व्यंग दूर करण्याचे प्रयत्न केले. त्यात आम्ही खूपच यशस्वी झालो.

महाविद्यालयात साजऱ्या झालेल्या स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताकदिन या कार्यक्रमांत विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

खालील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी शारिरीक शिक्षण संघनायक म्हणून उल्लेखनिय काम केले.

( १ ) कु. कीर्ती नागरेचा, ११ वी वाणिज्य.
( २ ) ,, कीर्ती शिरोडकर, ११ वी वाणिज्य.
( ३ ) ,, सुजाता दातार, ११ वी शास्त्र.
( ४ ) श्री रवीन्द्र संत, ११ वी शास्त्र.
( ५ ) कु. श्वेतांबरी देशपांडे, ११ वी कला.
( ६ ) श्री. चन्द्रमणी जावळे, ११ वी कला.

मा. प्राचार्य व इतर प्राध्यापक-वर्ग यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.

**विनोद कुमार छाबा** — शारीरिक शिक्षण शिक्षक.
**कि. शं. लागू** — शारीरिक शिक्षण संचालक

## साहित्य संघटना

शैक्षणिक वर्ष १९८०–८१ साठी साहित्य संघटनेच्या व्यवस्थापन समितीवर प्रा. सीताराम रायकर, प्रा. डब्ल्यू. आर. अहिरराव, प्रा. बा. गो. वाणी, प्रा. कु. परब आणि प्रा. सौ. लीना पाटणकर या प्राध्यापकांचा समावेश होता. या समितीमध्ये सर्वश्री प्रवीण सपकाळ, प्रकाश पगारिया, रमेश दोडे, दादाभाऊ शेळके आणि कु. शैला हंडे व कु. मंजुषा जवाजीवार या विद्यार्थी प्रतिनिधींचा समावेश होता.

१८ जुलै १९८० रोजी डॉ. शेषाद्रि यांच्या हस्ते या वर्षीच्या कार्याचा शुभारंभ झाला.

**व्याख्याने :**

या वर्षात साहित्य संघटनेतर्फे पुढीलप्रमाणे व्याख्याने झाली.

| तारीख | वक्ते | विषय |
| --- | --- | --- |
| १८-७-१९८० | डॉ. शेषाद्रि (जवाहरलाल नेहरू विद्यापीठ) | राज्यशास्त्रातील आधुनिक प्रवाह |
| ११-८-१९८० | प्रा. एन्. आर. देशपांडे (राज्यशास्त्र विभाग पुणे, विद्यापीठ) | लोकमान्य टिळकांच्या चतुःसूत्रीचे आजच्या काळातील महत्त्व |
| १६-९-१९८० | श्री. कांतिप्रकाश मिश्र (सहाय्यक निर्देशक हिंदी टीचिंग स्कीम, भारत सरकार पुणे) | सरकारी कार्यालयोंमें हिंदी : वर्तमान और भविष्य |
| ७-३-१९८१ | श्री. पां. सा. वडके | पुणे महानगरपालिका स्थायी समिती : रचना व कार्य |

## चर्चा

बुधवार, ता. २८-१-१९८१ रोजी 'A Developing Economy in the eyes of a Foreigner' या विषयावर शास्त्री इन्स्टिटयूट ऑफ इंडो-कॅनेडियन स्टडीजचे John Calder यांची विद्यार्थ्यांशी चर्चा आयोजित केली होती. Mrs Gloria Calder यांनी आणि अनेक विद्यार्थ्यांनी चर्चेत भाग घेतला.

## निबंध वाचन

प्रथम वर्ष बी. ए. च्या विद्यार्थ्यासाठी निबंधलेखन आयोजित करण्यात आले होते. निवडक निबंधांच्या वाचनाचा कार्यक्रम ता. २८-१-१९८१ रोजी ठेवण्यात आला होता. या कार्यक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी आणि निबंधाचे विषय असे होते :

(१) कु. साधना शिंगाडे : अविकासित अर्थव्यवस्थेचे स्वरूप
(२) ,, निशा कुलकर्णी : भारतीय लोकसंख्येचा प्रश्न
(३) ,, वीणा जगताप : लोकसंख्याविषयक धोरण
(४) ,, अन्नपूर्णा गोडसे : Poverty in India
(५) श्री शिरीष सोनवणे : कामगार चळवळीच्या दिशा

## अभ्यासभेट

भाषा विषयाच्या सुमारे ४० विद्यार्थ्यांनी प्रा. रायकर व प्रा. पुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली डेक्कन कॉलेजमधील प्रगत भाषाशास्त्र केंद्राला भेट दिली. ता. १९-९-८० रोजी झालेल्या या शैक्षणिक भेटीत भाषाप्रयोगशाळा पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली; तसेच उच्चार-अध्यापन यांच्याशी संबंधित असे लघुपट आणि प्रा. कु. वेलवलकर यांचा अमराठी भाषिकांना मराठीचे अध्यापन याविषयीचा एक पाठ विद्यार्थ्यांना पाहता आला.

## शिक्षकदिन

५ सप्टेंबर १९८० या दिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा सत्कार करून आणि गौरवपर भाषणे करून शिक्षकदिन साजरा केला. डॉ. सौ. वंदना तळेकर यांचे डॉ. राधाकृष्णन यांचे जीवनकार्य यांचा परिचय करून देणारे व्याख्यान या प्रसंगी झाले.

## काव्यवाचन स्पर्धा

हिंदी कवितावाचनाची स्पर्धा १४-२-८१ रोजी आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत एकूण १२ विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

## भित्तिपत्रक

संघटनेचे ॐ हे भित्तीपत्रक फेब्रुवारी १९८१ अखेर प्रसिद्ध झाले. शिक्षण व सामाजिक परिस्थिती यांच्यावरील निबंधांचा या भित्तीपत्रकात अंतर्भाव होता.

**प्रा. मुकुंद महाजन**
कार्याध्यक्ष

# वाणिज्य संघटना

या वर्षापासून प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांना देखील वाणिज्य संघटनेचे सभासदत्व मिळाल्यामुळे संघटनेच्या सभासदांची संख्या वाढली. या वर्षासाठी खालीलप्रमाणे विद्यार्थि-प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली :—

| | |
|---|---|
| विद्या गोडखिंडी | तृ. व. वाणिज्य |
| एस. आनंद | ,, |
| सुहासिनी कवठकर | ,, |
| अंजली मालशे | ,, |
| सुनील दाढे | द्वि. व. वाणिज्य |
| संजय वाबळे | ,, |
| अल्पना ताटके | ,, |
| वंदना नरवणे | ,, |
| शीला देसाई | प्र. व. वाणिज्य |

प्रा. पी. सी. मुथा, प्रा. भारती डोळे व प्रेमा जोशी यांची प्राध्यापक सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. श्री. दिलीप खोपकर यांनी ऑफिसमधील पत्रव्यवहाराची जबाबदारी सांभाळली.

संघटनेतर्फे या वर्षी खालील प्रमाणे कार्यक्रम करण्यात आले.

**भित्तिपत्रक :** 'कॉम' या भित्तिपत्रकाचे चार अंक या वर्षी प्रकाशित करण्यात आले. त्यामध्ये 'जाहिरात कला' आणि 'उद्योजकता' हे विशेषांक होते. विद्या गोडखिंडी आणि सुनील दाढे यांनी संपादक म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली.

**शैक्षणिक भेटी :** विद्यार्थ्यांनी या वर्षी खालील औद्योगिक व व्यावसायिक संघटनांना भेटी देऊन त्यांच्या कामकाजाबद्दल माहिती गोळा केली.

पूना बॉटलिंग कं. लि., पिंपरी.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मध्यवर्ती कार्यालय, पुणे.

बँक ऑफ महाराष्ट्र, मुख्यालय, पुणे.

कल्पना मुद्रणालय, भोसरी.

बॉंबे स्टॉक एक्सचेंज, मुंबई.

**चर्चा मंडळ :** या वर्षी विद्यार्थ्यांनी हा एक नवीन उपक्रम हाती घेतला. जीवनाशी निगडित परंतु अभ्यासक्रमात ज्यांचा प्रत्यक्ष अंतर्भाव केलेला नाही असे विषय निवडून त्यांवर अनौपचारिक चर्चा करणे व त्यापासून नवीन काही शिकण्याचा प्रयत्न करणे हा उद्देश या चर्चा मंडळासमोर होता. प्रथम सत्रात 'चलनवाढ' व दुसऱ्या सत्रात 'शेतकरी आंदोलन व शेतमालाच्या किंमती' या विषयांवर चर्चा आयोजित करून ३० ते ३५ विद्यार्थ्यांनी त्यात उत्साहाने भाग घेतला.

**प्रकल्प–अहवाल स्पर्धा :** गेल्या वर्षीप्रमाणेच या वर्षीही प्रकल्प अहवाल स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेसाठी एकूण १३ अहवाल सादर झाले. डॉ. मुकुंद अभ्यंकर, डीन, कॉमर्स फॅकल्टी, पुणे विद्यापीठ व डॉ. ए. बी. राव, संचालक भारती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट पुणे यांनी परीक्षक म्हणून काम केले. खालीलप्रमाणे पहिल्या तीन क्रमांकांना पारितोषिके देण्यात आली.

प्रथम पारितोषिक : वर्तमानपत्रांतील जाहिरात–चंद्रकांत देशपांडे.

द्वितीय पारितोषिक : ग्राहकांच्या सहकारी संघटना–सुनील दाढे.

तृतीय पारितोषिक : भरारी–विद्या गोडखिंडी.

**निबंध स्पर्धा :** कनिष्ठ महाविद्यालयातील वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. दिलेल्या विषयावर १००० शब्दात निबंध लिहावयाचा होता. एकूण १४ विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला. त्यापैकी प्रथम तीन क्रमांकांना बक्षिसे देण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक : | संगीता पोटफोडे, | ११ वी वाणिज्य |
| द्वितीय क्रमांक : | विद्या गांधी, | ,, |
| तृतीय क्रमांक : (विभागून) : | मोहिनी बडवे, | ,, |
| | ज्योत्स्ना मुरूडकर, | ,, |

प्रा. एस. जी. बापट, बृ. म. कॉमर्स कॉलेज व आपल्याच महाविद्यालयातील डॉ. वि. भा. देशपांडे यांनी परीक्षक म्हणून काम केले.

**नोकरी मार्गदर्शन सत्र :** दरवर्षी प्रमाणे या वर्षीही पदवी घेऊन बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी शोधण्याच्या कामात मार्गदर्शन करणारे सत्र आयोजित करण्यात आले. यंदाचे सत्र ९ आणि १० फेब्रुवारी १९८१ रोजी करण्यात आले. या वर्षी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांबरोबर शास्त्र शाखेचे विद्यार्थीही त्यात उत्साहाने सहभागी झाले.

**वाचनालय :** संघटनेतर्फे या वर्षी ६०० रु. ची पुस्तके घेण्यात आली. सभासदांनी वाचनालयाच्या सवलतीचा लाभ घेतला. वाचनालयातील कर्मचारी संघटनेच्या पुस्तकाची जबाबदारी पण यशस्वीपणे सांभाळतात.

संघटनेच्या कार्यक्रमात ज्यांचे सहकार्य लाभले त्या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

**माधवी मित्र**
कार्याध्यक्ष

## नियोजन चर्चा मंडळ

१९८०-८१ साठी नियोजन चर्चा मंडळाच्या व्यवस्थापन समितीमध्ये पुढील सदस्यांचा समावेश होता.

प्राचार्य स. य. गंभीर ( अध्यक्ष ),

प्रा. रमेश शहा ( कार्याध्यक्ष ).

प्राध्यापक सदस्य– प्रा. सौ. व्ही. एस. कुलकर्णी, प्रा. वाय. एम. सुमंन, प्रा. सुमन कौशल.

विद्यार्थि प्रतिनिधी– श्री. अतुल देशपांडे, श्री. बंडू चौगुले, कु. शुभांगी महाजन, कु. शोभा कांबळे.

२ सप्टें. १९८० रोजी नियोजन चर्चा मंडळाचे उद्‌घाटन स. पं. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. बी. केरूर ह्यांच्या हस्ते झाले. ह्याप्रसंगी डॉ. केरूर ह्यांनी ' आर्थिक नियोजन आणि सामाजिक बदल ' ह्या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

११ आक्टो. १९८० रोजी मुंबईच्या ' फोरम ऑफ फ्री एन्टरप्राईझ ' या संघटनेच्या वतीने ' सेठ वालचंद हिराचंद वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली. ह्या स्पर्धेसाठी आबासाहेब गरवारे महाविद्यालयाचे प्रा. आर के. बर्वे, आपल्या महाविद्यालयातील प्रा. महाजन व प्रा. सौ. व्ही. एस. कुलकर्णी ह्यांनी परीक्षक म्हणून बहुमोल सहकार्य दिले. ह्या स्पर्धेमध्ये श्री. सुनील दाढे, श्री. अनंत सुब्रमनियन, श्री. अतुल देशपांडे हे स्पर्धक यशस्वी झाले. प्राचार्य स. य. गंभीर ह्यांच्या हस्ते बक्षीस देण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

५ फेब्रु. १९८१ रोजी ' एक्स्पोर्ट क्रेडीट अॅन्ड ग्यारंटी कार्पोरेशन ऑफ इंडिया 'चे ब्रँच ऑफिसर श्री. नरेंद्र काळे ह्यांचे ' इसीजीसी आणि निर्यात संवर्धन ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

१८ फेब्रु. १९८१ रोजी आयुर्विमा महामंडळाचे श्री. सी. एस. खानविलकर यांचे ' आयुर्विमा महामंडळाची आर्थिक विकासातील भूमिका ' आणि श्री. ए. एम. गुजराथी यांचे ' करिअर इन एल. आय. सी. ऑफ इंडिया ' या विषयावर व्याख्याने आयोजित करण्यात आली.

**प्रा. रमेश शहा**
कार्याध्यक्ष

## राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या नियमित कार्यक्रमाखेरीज यंदाच्या वर्षी तीन प्रमुख प्रकल्प पूर्ण करण्यात आले. कोंढवा येथील बंदोरवाला लेप्रसी हॉस्पिटलच्या बंधारा व तलाव बांधण्याच्या प्रकल्पासाठी पथकांनी श्रमदानाद्वारे साहाय्य केले.

यंदाच्या वर्षाचा विशेष उपक्रम म्हणजे मोफत नेत्रतपासणी शिबिर. ३१ ऑगस्ट १९८० रोजी हे शिबिर महाविद्यालयात घेण्यात आले. पत्रकाद्वारे व रेडिओवरील निवेदनाद्वारे शिबिरास जास्तीत जास्त प्रसिद्धी देण्यात आली. शिवाय महाविद्यालयाच्या परिसरातील रहिवाशांना घरोघर स्वयंसेवकांनी हिंडून शिबिरांची माहिती दिली. शिबिराच्या अगोदर दोन दिवस गरजूंची नोंदणी करण्यात आली. डोळे तपासण्याच्या कामी डॉ. सुधीर काळे, डॉ. विश्वास डाके, डॉ. भगली, डॉ. दातार, डॉ. शहा व डॉ. विश्वास देशपांडे व त्यांचे सहकारी ह्यांनी बहुमोल साहाय्य केले. मे. परांजपे ऑप्टिशियन्स, अप्पा बळवंत चौक, पुणे ह्यांनी अत्यल्प दरानी चष्मे पुरविण्याची सोय केली होती. उपमहापौर डॉ. सतीश देसाई ह्यांनी शिबिराचे उद्‌घाटन केले व स्वतः डोळे तपासणीचे कार्य सुरू केले. सर्व डॉक्टरांना ' शिव-प्रतिमा ' भेट दिल्या. मॉडर्नच्या शिक्षक, शिक्षकेतर

कर्मचारी व विद्यार्थ्यांनी बहुमोल आर्थिक साहाय्य केले. ४७७ जणांनी शिबिराचा फायदा घेतला.

१९८१ वर्ष ' अपंग वर्ष ' म्हणून साजरे केले जात आहे. ह्या निमित्ताने महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलन प्रसंगी अपंगानी निर्मिलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री ठेवण्यात आली होती. रूईया मुक-बधिर संस्था, येरवड्याचे मध्यवर्ती मनोरुग्णालय, हडपसरची अंधव्यक्तींची संघटना ह्या संस्थांनी आपल्या उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन भरवून त्याची विक्री केली केली. २२ जाने. १९८१ रोजी मनोरुग्णालयाच्या संगीत मैफीलीचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास प्रचंड प्रतिसाद मिळाला.

पुणे जिल्हा समन्वय समिती द्वारे अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर येथे एक मध्यवर्ती शिबिर घेण्यात आले. शिबिरास पथकातील श्री सुनील शिन्दे, कु. सुनंदा शिन्दे, श्री. तापडे व श्री. केसकर हे स्वयंसेवक सहभागी झाले होते.

प्रा. बा. गो. वाणी यांनी अहमदनगर येथे दोन आठवड्याचे प्रशिक्षण पूर्ण केले व पथकाची जबाबदारी समर्थपणे सांभाळली.

पथकाच्या निरनिराळ्या कार्यक्रमास व उपक्रमास प्राचार्य स. य. गंभीर, उप-प्राचार्य डॉ. गाडगीळ, प्रा. चिरपुटकर व प्रा. दातार, प्रा. गोसावी, प्रा. गोखले, प्रा. जोशी, प्रा. रायकर, प्रा. लाळे इत्यादींचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**नागर माळी, प्रमोद कुलकर्णी, अतुल पानसे, पांडुरंग चिंचकर**
विद्यार्थि-प्रतिनिधी

**बा. गो. वाणी, म. आ. कुलकर्णी**
कार्यक्रमाधिकारी

## प्राध्यापक अभ्यास-मंडळ

मॉडर्न महाविद्यालय प्राध्यापक अभ्यास-मंडळातर्फे ( Staff Academy ) पहिल्या सत्रात खालील तीन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

( १ ) सोमवार, दि. १३ ऑक्टोबर १९८०,
**परीक्षा-सुधार :** ( Examination Reforms ) – चर्चा.
**चर्चा-प्रास्तविक :** अनुक्रमे सर्वश्री. प्रा. अनंत गोसावी (वाणिज्य,) मनोहर कुलकर्णी (इतिहास), चंद्रकांत कुलकर्णी ( गणित ) आणि त्र्यंबक लाळे ( रसायन ) **अध्यक्ष :** डॉ. श्रीधर गुप्ते, सदस्य पुणे विद्यापीठ कार्यकारिणी.

( २ ) मंगळवार दि. १४ ऑक्टोबर १९८०, प्रा. अरुण दांडेकर यांचे 'Honey & Honeybee' या विषयावर निबंध वाचन व चर्चा. **अध्यक्ष :** डॉ. के. आर. क्षीरसागर, सेंट्रल बी रिसर्च इन्स्टिटयूट, पुणे.

( ३ ) बुधवार, दि. १५ ऑक्टोबर, १९८०, डॉ. एम्. व्ही. मूर्ति, संचालक, फिल्म इन्स्टिटयूट, पुणे यांचे 'Changing Concpet of Education' या विषयावर भाषण व चर्चा.

यातील तिसरे व्याख्यान पुण्यातील त्या दिवशीच्या अस्थिर वातावरणामुळे ऐनवेळी रहित करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात्र प्राचार्य स. य. गंभीर, प्रा. व्ही. जी. जोशी, प्रा. उत्तुरकर, प्रा. यशवंत सुमंत आणि सौ. निर्मला मोने यांचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून प्राध्यापकांव्यतिरिक्त काही बाहेरील तज्ज्ञांच्या व्याख्यानांचाही त्यांत समावेश आहे.

**भीमराव कुलकर्णी**
निमंत्रक, अभ्यासमंडळ

## प्राध्यापक ग्रंथचर्चा मंडळ

मॉडर्न महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांनी स्वयंप्रेरणेने एक ग्रंथचर्चा मंडळ चालविले असून महत्त्वाच्या ग्रंथांवर त्यामध्ये चर्चा करण्यात येते. यंदाच्या वर्षी खालील पुस्तकांवर काही प्राध्यापकांनी अभ्यासपूर्ण विवेचन केल्यानंतर त्यावर चर्चा करण्यात आली.

( १ ) जेम्स जॉइसच्या – द पोर्ट्रेट ऑफ द आर्टिस्ट

ॲज अ यँग मॅन या कादंबरीवर डॉ. सु. व्यं. धायगुडे यांचे व्याख्यान व चर्चा.

( २ ) पाउलो प्रेअरी यांच्या 'पेडॅगॉजी ऑफ द आप्प्रेस्ड' या ग्रंथावर प्रा. यशवंत सुमंत यांचे व्याख्यान व चर्चा.

( ३ ) जोनाथन ब्लॅक यांच्या 'द ऑईत' या कादंबरीवर प्रा. सु. ग. दातार यांचे व्याख्यान व चर्चा.

( ४ ) वि. वा. शिरवाडकरकृत 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबरीवर डॉ. दत्तात्रेय पुण्डे यांचे व्याख्यान व चर्चा

( ५ ) 'प्रिय बाई' या अनुवादित पुस्तकावर प्रा. अ. गो. गोसावी यांचे भाषण व चर्चा.

( ६ ) राज यांचे 'पीझन्ट्स इन हिस्टरी' या पुस्तकावर प्रा. म. आ. कुलकर्णी यांचे व्याख्यान व चर्चा.

**भीमराव कुलकर्णी**
संयोजक

## कनिष्ठ महाविद्यालय ( ज्युनिअर कॉलेज ) अहवाल

### विद्यार्थी संख्या :

१९८०-८१ या शैक्षणिक वर्षात इयत्ता अकरावीच्या कलाशाखेच्या दोन, विज्ञान व वाणिज्य शाखांच्या प्रत्येकी चार अशा एकूण दहा तुकड्या होत्या. त्याचप्रमाणे इयत्ता बारावीच्या कलाशाखेच्या दोन, विज्ञान व वाणिज्य शाखांच्या प्रत्येकी चार अशा एकूण दहा तुकडया होत्या. हजेरीपटावरील विद्यार्थ्यांची एकूण संख्या १६४३ होती. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची संख्या या शैक्षणिक वर्षात ४४ होती.

### शैक्षणिक उपक्रम

या शैक्षणिक वर्षात ग्रंथालयशास्त्र हा विषय इयत्ता अकरावीच्या अभ्यासक्रमासाठी आपल्या महाविद्यालयात नव्याने सुरू करण्यात आला. ग्रंथपाल श्री. बापट हे हा विषय शिकवीत आहेत. मागील वर्षीप्रमाणे यंदाही इ. ११ वी व इ. १२ वीतील निवडक हुशार विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन करण्यात आले. बारावीचे वर्ष हे विद्यार्थ्यांच्या पुढील आयुष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे वर्ष असल्यामुळे इ. १२ वी च्या मार्गदर्शनावर जास्त भर देण्यात आला. उच्च माध्यमिक मंडळाच्या नवीन धर्तीवर प्रश्नपत्रिका तयार करून त्या विज्ञानशाखेच्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घेण्यात आल्या. वारंवार चाचण्या घेऊन विद्यार्थ्यांना त्यांच्या होणाऱ्या चुका समजावून देण्यात आल्या. तसेच दिवाळीच्या सुटीत रसायनशास्त्र, पदार्थशास्त्र व प्राणिशास्त्र या विषयातील जादा प्रात्यक्षिके घेण्यात आली. या प्रात्यक्षिकांसाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारण्यात आले नाही. या उपक्रमासाठी ज्या प्राध्यापकाचे आम्हाला सहकार्य लाभले त्यांचे मनःपूर्वक आभार !

"व्यवसायावरील प्रभुत्व कसे मिळवावे ?" या विषयावर श्री. स. बा. कुलकर्णी, निवृत्त आय्. ए. एस्. अधिकारी यांचे बहुमोल मार्गदर्शन करणारे व्याख्यान आयोजित करण्यात आले. शास्त्र शाखेकडील विद्यार्थ्यांना इ. १२ वी नंतर उपलब्ध असलेल्या निरनिराळ्या अभ्यासक्रमांबाबत माहिती देणारे एक अत्यंत उपयुक्त व्याख्यान शासकीय अधिकारी श्री. गुळवेलकर यांनी दिले. त्याचप्रमाणे इंजिनीअरिंग, मेडिकल, फार्मसी डिप्लोमा वगैरे अभ्यासक्रमांना प्रवेश मिळविण्यासाठी लागणारी प्रशस्तिपत्रके व इतर आवश्यक माहिती देणारे एक मार्गदर्शनपर व्याख्यान प्रा. चं. गु. कुलकर्णी ( गणित विभाग प्रमुख ) यांनी दिले.

एप्रिल १९८१ मधे शास्त्रीय प्रज्ञा शोध परीक्षेस बसणाऱ्या हुशार विद्यार्थ्यांनाही मार्गदर्शन करण्याचे महाविद्यालयाने ठरविले आहे.

इंग्रजी विभागातील प्राध्यापकांनी इ. १२ वी साठी उपयुक्त ठरेल अशी एक पुस्तिका तयार केली आहे. ही पुस्तिका परिश्रमपूर्वक तयार केलेली आहे. ह्या पुस्तिकेत सर्व गद्य व पद्य विभागांतील लेखांचा व कवितांचा गोषवारा, तसेच महत्त्वाचे प्रश्न एकत्रित करुन दिलेले आहेत.

### इतर उपक्रम

अभिनय व नाट्यगुण या विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी, अभिनयाच्या व नाट्यवाचनाच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. पाठ्यपुस्तकांतील एकांकिकांचे प्रयोगदर्शन हा उपक्रम या वर्षी नव्यानेच करण्यात आला. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

बन्सीलाल रामनाथ अगरवाल या संस्थेने आयोजित केलेल्या ज्ञानस्पर्धेतील मराठीची पहिली तिन्ही पारितोषिके आपल्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी पटकाविली.

प्रथम पारितोषिक : (रु. १०१) कु. मोहिनी नारायण बडवे, (११ वी वाणिज्य)

द्वितीय पारितोषिक : ( रु. ७५ ) कु. मनीषा प्रभाकर ओक, ( ११ वी वाणिज्य )

तृतीय पारितोषिक : ( रु. ५१ ) कु. ज्योत्स्ना शशिकांत मुरुडकर, ( ११ वी वाणिज्य )

त्याचप्रमाणे मराठी व हिंदी या दोन्ही विषयातील प्रशस्तिपत्रके महाविद्यालयास मिळाली.

आपल्या महाविद्यालयातील कु. सुषमा राजाराम कुलकर्णी, इ. १२ वी वाणिज्य, हीने कराड रोटरॅक्ट क्लबतर्फे घेण्यात आलेल्या निबंधस्पर्धेत भाग घेतला होता. तिने लिहिलेल्या ' शिक्षण ज्ञान की उपजीविका ' या निबंधास २५ रु. चे दुसरे बक्षीस मिळाले.

**ऋणनिर्देश**

शैक्षणिक उपक्रमात व अभ्यासेतर उपक्रमात ज्या ज्या प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे आम्हाला सहकार्य लाभले त्यांची कनिष्ठ महाविद्यालय समिती आभारी आहे. असेच सहकार्य लाभावे अशी इच्छा प्रदर्शित करतो.

**प. स. चिरपुटकर**
उपप्राचार्य

## पदव्युत्तर विद्यार्थी संघटना

ह्या वर्षी उपप्राचार्य प्रा. सु. ग. दातार यांच्या अध्यक्षतेखाली ह्या संघटनेचे काम सुरू झाले. ह्या संघटनेचे विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून खालील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

( १ ) श्री. प्रेमराज मराठे– एम्. कॉम. पार्ट-वन्.

( २ ) रविकांत गिरी– एम्. कॉम. पार्ट-टू.

ह्या वर्षी एम्. कॉम पार्ट वन्‌साठी सुधारित अभ्यासक्रम सुरू झाल्याने विद्यार्थ्यांसाठी वैकुंठलाल मेहता इन्स्टिट्यूट ऑफ को. ऑपरेटिव्ह मॅनेजमेंटचे प्राध्यापक डॉ. गो. स. कामत ह्यांची मॅनेजमेंट ऑफ को. ऑपरेटिव्ह सेक्टर व को-ऑपरेटिव्ह डेअरीज् या विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. तसेच प्राचार्य पुराणिक, को. ऑपरेटिव्ह ट्रेनिंग कॉलेज, ह्यांची फायनान्सिंग ऑफ पब्लिक एन्टरप्रायझेस ह्या विषयावर दोन व्याख्याने झाली. केस स्टडीज् इन जनरल मॅनेजमेंट ह्या नवीन विषयावर श्री. व्ही. एन्. गोखले, रिटायर्ड डेप्युटी लेबर कमिशनर, केंद्र सरकार, ह्यांचे व्याख्यान आयोजित केले आहे. प्राचार्य व सल्लागार समितीचे सातत्याने मार्गदर्शन मिळाल्याने वरील उपक्रम यशस्वी झाले.

| | |
|---|---|
| सचिव | सचिव |
| पदव्युत्तर विद्यार्थी संघटना | पदव्युत्तर विद्यार्थी संघटना |
| एम्. कॉम. पार्ट– वन् | एम्. कॉम. पार्ट–टू |

## ग्रंथालय विभाग

जानेवारी १९८१ अखेर ग्रंथालयातील ग्रंथांची एकूण संख्या ३५५०० झाली. ग्रंथालयामध्ये सध्या ८४ नियतकालिके आणि १३ वर्तमानपत्रे घेण्यात येतात.

विद्यापीठ अनुदान मंडळाच्या पुस्तकपेढी योजनेतर्फे या वर्षी पहिल्या सत्रात १०६ विद्यार्थ्यांना व दुसऱ्या सत्रात १०६ विद्यार्थ्यांना पुस्तकाचे संच देण्यात आले.

विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अभ्यासिकेची सोय करण्यात आली आहे. अभ्यासिका सकाळी ८ ते १० पर्यंत खुली ठेवण्यात येते.

१ फेब्रुवारी १९८० ते ३१ जानेवारी १९८१ अखेरपर्यंत झालेल्या कामकाजाचे दिवसात रोज सरासरी २५० ग्रंथ याप्रमाणे एकूण ५९२५६ ग्रंथ गृहवाचनासाठी देण्यात आले. याशिवाय रोज सरासरी १५४ ग्रंथ या प्रमाणे ३७,३६४ ग्रंथ अभ्यासिकेमध्ये वाचनासाठी देण्यात आले.

महाविद्यालयातर्फे या वर्षीपासून ११ वी कला या वर्गासाठी " ग्रंथालय शास्त्र " हा विषय सुरू करण्यात आला.

ग्रंथालय समितीमध्ये यावर्षी खालील सभासद होते.

( १ ) प्रा. एम्. आर. मराठे ( कार्याध्यक्ष )

( २ ) डॉ. एस. वाय. परांजपे.

( ३ ) प्रा. एस. आर. रायकर.

( ४ ) डॉ. व्ही. बी. देशपांडे.

( ५ ) डॉ. ( सौ. ) एम्. मित्रा.

( ६ ) श्री. डी. जी. बापट ( चिटणीस )

खालील व्यक्ती व संस्था यांनी ग्रंथालयास बहुमोल ग्रंथ भेट दिले.

( १ ) प्राचार्य स. य. गंभीर
( २ ) डॉ. ल. ह. गाडगीळ, उपप्राचार्य
( ३ ) प्रा. दातार एस. जी. ''
( ४ ) डॉ. भीमराव कुलकर्णी
( ५ ) श्री. वसंत राजगुरु
( ६ ) श्री. दशपुत्रे जे. बी.
( ७ ) सौ. जोग एस. डी.
( ८ ) प्रा. तैमनी
( ९ ) श्री. खांडेकर
( १० ) श्री. गांधी जे. एल.
( ११ ) श्री. गोऱ्हे आर. एस.
( १२ ) कु. शोभा पाटील
( १३ ) कु. माधुरी सावरकर
( १४ ) श्री. अनगळ नरेंद्र
( १५ ) श्री. बायस आर. के.
( १६ ) हिंदी विभाग, पुणे विद्यापीठ
( १७ ) ब्रिटीश ग्रंथालय, पुणे
( १८ ) सेंट मिराज कॉलेज फॉर गर्ल्स
( १९ ) महाराष्ट्र सरकार
( २० ) ओरिएंट लॉंगमन, मुंबई
( २१ ) अनमोल प्रकाशन, पुणे
( २२ ) University Leadership Programme (Dept. of Politics, University of Poona).

द. गो. बापट
ग्रंथपाल.

## घड्याळ दुरुस्ती प्रशिक्षण वर्ग

पुणे विद्यापीठाच्या, निरंतर शिक्षण योजनांतर्गत घड्याळ दुरुस्ती प्रशिक्षण वर्ग सुरू करण्यात आला. सदर वर्ग २५ ऑगस्ट रोजी सुरू करण्यात आला. प्रशिक्षणाचा कालावधी ३ महिने आहे. 'कमवा आणि शिका' या ध्येय वाक्याप्रमाणे विद्यार्थी-विद्यार्थिनींना योग्य संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यार्थीवर्ग नक्कीच आनंदी आहे गल्फ विद्यापीठाचे (कॅबडा) डॉ. सी. जे. कैरन्स यांनी वैयक्तिक भेट देऊन कामाबद्दल प्रशंसोद्गार काढले. प्रशिक्षण वर्गप्रमुख म्हणून प्रा. अरुण दांडेकर जीवशास्त्र विभाग हे काम पहात आहेत.

अ. बा. दांडेकर

## 'स्पर्धा परीक्षा– मार्गदर्शन तयारी वर्ग'

निरनिराळ्या सरकारी, निमसरकारी व खाजगी क्षेत्रातून विविध पदांच्या नेमणुकीसाठी 'स्पर्धा परीक्षा' घेवून लायक उमेदवारांची निवड करण्याची पद्धती अलीकडे विशेष करून वापरण्यात येते. सेवा आयोग, आयुर्विमा महामंडळ, बॅंकिंग रिक्रुटमेंट बोर्डस् अशा पद्धतीचा वापर करतात. महाराष्ट्रातील युवक अशा परीक्षेबाबत उदास व तयारीने अपुरे पडतात अशी तक्रार वारंवार केली जाते. मार्गदर्शन करण्यासाठी अनेक विद्यापीठांनी व खुद्द महाराष्ट्र शासनानेही पुढाकार घेतला आहे. परंतु एकंदर गरजेच्या मानाने होणारे प्रयत्न फारच अपुरे व विशिष्ट केंद्रातूनच होताहेत.

विद्यापीठांच्या परीक्षेस बसणारे विद्यार्थी व अभ्यासक्रम चालविणारी महाविद्यालये आपले नियमित चाकोरीचे काम करीत असतांना स्पर्धा परीक्षांचे मार्गदर्शन करू शकत नाहीत. स्पर्धा परीक्षांचे अभ्यासक्रम व परीक्षा-पद्धती ह्या पूर्णपणे वेगळ्या आहेत. अशा परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या दृष्टीने मार्गदर्शन मिळण्याची आवश्यकता असते. ही जाणवणारी उणीव भरून काढण्याच्या दृष्टीने 'निरंतर शिक्षण केंद्र, पुणे विद्यापीठ' ह्यांच्या सहाय्याने मॉडर्न महाविद्यालयात 'स्पर्धा परीक्षा—तयारी वर्ग' घेण्यात आले.

पहिला वर्ग महाराष्ट्र लोक सेवा आयोगाच्या डेप्युटी कलेक्टर वगैरे स्पर्धा परीक्षांसाठी घेण्यात आला, एका महिन्याचा हा वर्ग २२ नोव्हें, १९८० रोजी डॉ. भा. दि. फडके, मानद संचालक, निरंतर शिक्षण केंद्र ह्यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटनानी सुरू करण्यात आला. इंग्रजी सामान्यज्ञान, इतिहास, भूगोल, बॅंकिंग, अकौंटन्सी, मराठी, लॉ हे विषय शिकविण्यात आले. तसेच जविशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, संख्याशास्त्र, समाजशास्त्र ह्या विषयांच्या

वैयक्तिक मार्गदर्शनाची सोय करण्यात आली. नियमित व्याख्यानाखेरीज प्रवेशार्थींना ग्रंथालयाची सोय, तयारीसाठी चाचणी परीक्षा व विस्तृत टिपण ही खास सोय करण्यात आली होती.

तयारी वर्गास कुलगुरु डॉ. राम ताकवले, ले. क. एम्. जी. अभ्यंकर, प्राचार्य के. पं. मंगळवेढेकर, डॉ. एस. के. जैन, डॉ. अशोक केळकर, डॉ. य. दि. फडके, डॉ. राजेंद्र व्होरा, ॲड. बायस, प्राचार्य ए. डी. पुराणिक, प्रा. वि. रा. शिरगुरकर, डॉ. व्ही. डी. देशपांडे इत्यादि तज्ञांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयातील निरनिराळ्या विभागांमधील सहकारी प्राध्यापकांचेही वर्ग चालविण्यात बहुमोल साहाय्य लाभले.

वर्गाचा समारोप प्रमुख पाहुणे मा. पुरुषोत्तम पाळंदे, नगर आयुक्त, पुणे महानगरपालिका ह्यांचे हस्ते श्री. सुभाषचंद्र भोसले कुलसचीव, पुणे विद्यापीठ ह्यांचे अध्यक्षतेखाली झाला.

वर्गास प्रचंड प्रतिसाद मिळाला. सर्व थरातून या उपक्रमाचे हार्दिक स्वागत झाले.

स्पर्धा परीक्षा–मार्गदर्शन / तयारी वर्ग उपक्रमातील दुसरा वर्ग महाविद्यालयाने स्वतंत्रपणे घेतला. हा वर्ग बँकिंग रिक्रूटमेंट बोर्डाच्या क्लार्क, कॅशियर वगैरे पदांच्या स्पर्धा परीक्षेसाठी घेण्यात आला. १२ ते १९ जाने, १९८१ अखेर झालेल्या वर्गास ५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. इंग्रजी सामान्यज्ञान ह्या प्रमुख विषयांखेरीज रीझनिंग, क्लिरीकल ॲपरीटयूड, ॲरिथमॅटिक टेस्ट ह्या विषयांचीही तयारी करून घेण्यात आली. वर्गाच्या शेवटच्या दिवशी प्रवेशार्थींची चाचणी परीक्षा घेण्यात आली.

सहकारी प्राध्यापक श्री. रायकर, प्रा. सौ. शाळीग्राम व प्रा. कु. धोंगडे यांचे या वर्गास बहुमोल सहकार्य लाभले.

वर्गास हजर असलेल्या पुण्यातील अन्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मार्गदर्शनाची नितांत आवश्यकता असल्याचे आवर्जून सांगितले. त्यांनी त्यांच्या स्पर्धा परीक्षेस वर्गातील मार्गदर्शनाचा अतिशय उपयोग झाल्याचे तोंडी व पत्राद्वारेही कळविले आहे.

**म. आ. कुलकर्णी, अ. गो. गोसावी**
प्रकल्पाधिकारी

प्रसिद्ध सिने-नाट्य अभिनेत्री स्वर्गीय लक्ष्मीबाई यशवंत तथा माई भिडे यांच्या स्मरणार्थ पुणे विद्यापीठाच्या तृतीय वर्ष शास्त्र ( रसायन विशेष विषय ) परीक्षेत मॉडर्न महाविद्यालयातून प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक खास पारितोषिक व प्रशस्तिपत्रक ठेवण्यात आले आहे.



कै. माई भिडे

१९७९–८० या शैक्षणिक वर्षीचे हे पारितोषिक कु. सीमा गणेश गुणे ह्या विद्यार्थिनीने प्राप्त केले आहे.

## SCIENCE ASSOCIATION

The Science Association had arranged a talk on 26th Feb 1981. The Chief guest & speaker was Dr. S. C. Gupte, University of Poona and his topic was " A scientific approach to environmental studies". Dr. L. H. Gadgil was in chair and in his well come speech he gave information of the College and the Science Association. Prof. P. D. Apte, introduced the Chief Guest. Dr. Gupte, in his main speech presented various views about environmental studies, and gave information about the school of environment studies.

The lecture was much appreciated by all students and staff.

The Association had also arranged a function to give best wishes and send-off to T. Y. B. Sc students.

Prof. **P. D. Apte**, Chairman

## NATIONAL CADET CORPS (NCC) 1980–81

During the year 1980–81, students from our college were enrolled in six different units of NCC.

| Unit | Strength |
|---|---|
| (a) 36 Mah. Bn. NCC. | 53 |
| (b) 3 Mah. Armd. Sqn. | 02 |
| (c) 1 Mah. Signal Coy. | 08 |
| (d) 3 Mah. Naval Wing | 48 |
| (e) 3 Mah. Air Sqn. | 29 |
| (f) 2 Mah Girls NCC. | 11 |
| Total | 151 |

Special mention must be made of our three cadets—

( i ) CPL Jadhav R. B. was selected to represent Maharashtra State Hockey team and to participate in Republic Day 1981, parade at New Delhi.

( ii ) SGT. Dalvi A. G. was selected for Para Jump, course held at Agra.

(iii) Miss Tatke Alpana was selected to participate in the Republic Day 1981 parade at New Delhi.

**36 Maharashtra Bn. NCC.** Annual Training Camp was held at Panchagani. 1 officer and 12 cadets attended the camp. Our cadets showed their merit in Drill competition and Line Dressing competition.

**NCC Sports Activities.** The following cadets were selected to represent Pune NCC Group in various games :

(a) Foot Ball—Cdt. Patil P. J., Cdt. Jadhav V. K.

(b) Volley Ball—Cpl. Jadhav R. B., Cdt. Chaman Shaikh, Cdt. Pisal R. C., Cdt. Shinde G. A.

(c) Hockey—Cpl. Jadhav R. B., Cdt Pisal R. C.

* Deshmukh K. M. was selected to attend the Pre-Republic Day camp held at Pune.
* Cpl. Jadhav R. B. participated in the Republic Day Parade on Jan. 26, 1981 at New Delhi. He was a member of Hockey team of Maharashtra, which won the championship at New Delhi.
* SGT. Dalvi A. G. completed Para jump training course held at Agra.
* Our cadets donated their blood during blood donation organised by Group H. Q. Cadets participated in social service; tree planting and they assisted traffic police in controlling the traffic.

**Capt. P. D. Atre**
Coy. Commander & Officer-in-Charge

# सन १९८०-८१

## (१) भारत सरकारची राष्ट्रीय शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री. भिलारे महेश वसंत | एस्. वाय्. जे. सी. सायन्स |
| (२) | श्री. देशमुख सुहास दिनकर | ,, |
| (३) | श्री. दांडेकर संजय माधव | ,, |
| (४) | श्री. सुर्वे सुनील पांडुरंग | ,, |
| (५) | कु. थोरात उज्ज्वला शंकर | ,, |
| (६) | कु. गानू सुजाता राजाराम | ,, कॉमर्स |
| (७) | श्री. घारे मकरंद रमेश | ,, |
| (८) | कु. करमरकर वासंती पांडुरंग | प्रथम वर्ष विज्ञान |
| (९) | कु. केदारी ज्योती बाबूराव | प्रथम वर्ष वाणिज्य |
| (१०) | कु. रणदिवे शुभांगी भास्कर | ,, |
| (११) | कु. कुलकर्णी सविता सदाशिव | द्वितीय वर्ष विज्ञान |
| (१२) | कु. वानकर अंजली गोविंद | ,, |
| (१३) | श्री. ढब्बू चंद्रशेखर विरभद्र | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| (१४) | श्री. कुलकर्णी किरण दिगंबर | ,, |
| (१५) | कु. हरीसंगम सुधा श्रीकृष्ण | तृतीय वर्ष विज्ञान |
| (१६) | कु. शेळके शोभा नागेशराव | ,, |
| (१७) | कु. गडकरी स्वाती रमेश | तृतीय वर्ष वाणिज्य |
| (१८) | कु. गोडबोले रंजना कृष्ण | ,, |
| (१९) | कु. काळे मेधा सदाशिव | ,, |
| (२०) | कु. गोडखिंडी विद्या शंकर | ,, |
| (२१) | श्री. ओसवाल सतीशकुमार चुनलिल | ,, |
| (२२) | सौ. पुरंदरे सुमेधा सुभाष | एम्. कॉम्. पार्ट २ |
| (२३) | श्री. भारांबे किशोर बळीराम | एफ्. वाय्. जे. सी. सायन्स |
| (२४) | ,, गोखले नितीन मनोहर | ,, |
| (२५) | ,, काजळे हेमंतकुमार रामचंद्र | ,, |
| (२६) | ,, कुलकर्णी संतोष दिगंबर | ,, |
| (२७) | कु. मोरे शारदा हरिभाऊ | ,, |
| (२८) | ,, शेवाळे निलिमा चंद्रकान्त | ,, |
| (२९) | ,, भागवत राजश्री गोपाळ | एफ्. वाय्. जे. सी. कॉमर्स |
| (३०) | ,, पोटफोडे संगीता बाबूराव | ,, |

## (२) भारत सरकारची राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री. चिरवले राजाराम निवृत्ती | एस्. वाय्. जे. सी. सायन्स |
| (२) | श्री. मेहता राजेन्द्र रामचंद्र | ,, |
| (३) | श्री. पलांडे सुधाकर शिवाजी | ,, |

| | |
|---|---|
| ( ४ ) कु. देव मंगला काशिनाथ | प्रथम वर्ष विज्ञान |
| ( ५ ) श्री. गोरडे विठ्ठल कारभारी | ,, |
| ( ६ ) कु. कणसे सुरेखा अनंत | ,, |
| ( ७ ) श्री. मेंगाडे अशोक मल्हारी | ,, |
| ( ८ ) कु. काळे ज्योती विठ्ठलराव | ,, |
| ( ९ ) कु. लेणे शैलजा विश्वास | प्रथम वर्ष वाणिज्य |
| (१०) श्री. करवा प्रकाश रामधन | द्वितीय वर्ष विज्ञान |
| (११) कु. भावे सुवर्णा वसंत | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| (१२) कु. श्री. दाते मिलींद भालचंद्र | ,, |
| (१३) कु. चावक अनिता सुरेश | तृतीय वर्ष विज्ञान |
| (१४) कु. ललवाणी पौर्णिमा मोतीलाल | ,, |
| (१५) कु. गोडबोले शुभदा भास्कर | तृतीय वर्ष वाणिज्य |
| (१६) कु. जोशी पद्मजा प्रभाकर | एम्. कॉम्. पार्ट १ |
| (१७) कु. चौधरी सीमा पुरुषोत्तम | तृतीय वर्ष विज्ञान |

**(३) राज्य सरकारची गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. खळदकर दिनेश रामचंद्र | एस्. वाय्. जे. सी. सायन्स |
| ( २ ) कु. डाखवे भारती निलकंठ | द्वितीय वर्ष कला |
| ( ३ ) कु. इप्पर लता पोपट | ,, |
| ( ४ ) कु. देशमुख संगीता शिवाजीराव | द्वितीय वर्ष विज्ञान |
| ( ५ ) कु. हसबनीस विभावरी यशवंत | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ( ६ ) कु. पाटसकर संजीवनी वसंत | ,, |
| ( ७ ) श्री. प्रभुणे धनंजय रामचंद्र | ,, |
| ( ८ ) कु. भिसे संध्या श्रीनिवास | तृतीय वर्ष वाणिज्य |
| ( ९ ) कु. जोशी आशा लक्ष्मण | ,, |
| (१०) कु. शिंदे मीना वसंत | ,, |
| (११) कु. गोरे माधुरी चिंतामण | द्वितीय वर्ष वाणिज्य |

**(४) प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांच्या मुलांसाठी गुणवत्ता शिष्यवृत्ती**

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. देशपांडे श्रीकृष्ण पुरुषोत्तम | एस्. वाय्. जे. सी. सायन्स |
| ( २ ) कु. जोशी हेमा प्रभाकर | प्रथम वर्ष विज्ञान |
| ( ३ ) कु. कुलकर्णी अनिता गोपाळ | ,, |

**( ५ ) राष्ट्रीय प्रज्ञा शोध शिष्यवृत्ती**

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. दाढे सुनील श्रीकृष्ण, | द्वितीय वर्ष वाणिज्य |

**( ६ ) राष्ट्रीय क्रीडा शिष्यवृत्ती**

| | |
|---|---|
| ( १ ) कु. पंडीत अरुंधती श्रीराम | एस्. वाय्. जे. सी. |

## ( ७ ) भारत सरकारची अपंग शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. केसकर राजेंद्र बाळकृष्ण | एफ्. वाय्. जे. सी. कॉमर्स |
| ( २ ) कु. टन्नु सुषमा सदाशिव | ,, |
| ( ३ ) ,, कोरडे हीरा लक्ष्मण | एस्. वाय्. जे. सी. आर्टस |
| ( ४ ) श्री. परभणे भानुदास सदाशिव | एस्. वाय्. जे. सी. कॉमर्स |

## ( ८ ) श्री साईबाबा संस्थान शिर्डी शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. मांढरे भगवान निवृत्ती | एम्. कॉम्. पार्ट–२ |

## ( ९ ) ई. बी. सी. शिष्यवृत्ती

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. देसाई शिरिष शंकर | एस्. वाय्. जे. सी. सायन्स |
| ( २ ) ,, हुले नारायण ज्ञानेश्वर | ,, |
| ( ३ ) कु. खांदोडे प्रभावती नागोराव | ,, |
| ( ४ ) श्री. कुलकर्णी सतीश भास्कर | ,, |
| ( ५ ) ,, शेठ परशराम माधव | ,, |
| ( ६ ) श्री. उमाप कांतीलाल बाबूराव | ,, |
| ( ७ ) कु. बारसोडे मंजिरी लक्ष्मीकांत | एस्. वाय्. जे. सी. कॉमर्स |

## (१०) सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | |
|---|---|
| ( १ ) श्री. पंडीत मुकुंद माधव | एफ्. वाय्. जे. सी. सायन्स |
| ( २ ) कु. जोगळेकर वंदना रामचंद्र | एफ्. वाय्. जे. सी. कॉमर्स |
| ( ३ ) श्री. देसाई तानाजी बाबासाहेब | एस्. वाय्. जे. सी. सायन्स |
| ( ४ ) कु. निकम वंदना वामन | ,, |
| ( ५ ) श्री. वायदंडे विजय गणपत | एस्. वाय्. जे. सी. कॉमर्स |
| ( ६ ) कु. डोंगरे साधना मनोहर | ,, |
| ( ७ ) श्री. कदम राजीव कृष्ण | ,, |
| ( ८ ) कु. कदम सुरेखा बबन | ,, |
| ( ९ ) श्री. पंडीत मिलींद माधव | ,, |
| (१०) कु. बारसकर मंगला रामचंद्र | प्रथम वर्ष कला |
| (११) ,, काटकर मीनाक्षी रावसाहेब | प्रथम वर्ष वाणिज्य |
| (१२) ,, राणे छाया वसंत | ,, |
| (१३) श्री. जाधव विलास कोंडीराम | तृतीय वर्ष विज्ञान |
| (१४) श्री. लोकरे रमेश शामराव | ,, |
| (१५) ,, बोराटे सुधीर दिनकर | ,, |
| (१६) ,, दळवी अर्जुन गजानन | तृतीय वर्ष वाणिज्य |
| (१७) ,, जाधव मोहन शंकर | ,, |
| (१८) ,, जोशी सुधीर सदाशिव | प्रथम वर्ष विज्ञान |
| (१९) कु. माळुंजकर अंजली शरद | तृतीय वर्ष वाणिज्य |
| (२०) ,, माळुंजकर मंजिरी शरद | ,, |

## (११) स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

| | | |
|---|---|---|
| ( १ ) | श्री. जाधवराव दौलत पिलाजीराव | एफ्. वाय्. जे. सी. आर्टस |
| ( २ ) | ,, उभे सुनील पंढरीनाथ | एफ्. वाय् जे. सी. सायन्स |
| ( ३ ) | कु. पाटील वंदना रामचंद्र | एफ्. वाय्. जे. सी. कॉमर्स |
| ( ४ ) | श्री. फडतरे अनिल अनंतराव | एस्. वाय्. जे. सी. कॉमर्स |
| ( ५ ) | ,, भटेवरा राजेंद्रकुमार अमोलक | प्रथम वर्ष वाणिज्य |
| ( ६ ) | कु. जाधव मंदाकिनी पिलाजीराव | द्वितीय वर्ष वाणिज्य |
| ( ७ ) | श्री. काळे अजय वासुदेव | ,, |
| ( ८ ) | कु. भटेवरा चंदा अमोलक | तृतीय वर्ष कला |

## प्राथमिक शिक्षकांच्या मुलांना मिळणारी फी सवलत

कनिष्ठ महाविद्यालय — ६०
वरिष्ठ महाविद्यालय — ८०

## ई. बी. सी. फी सवलत मिळणारे विद्यार्थी

कनिष्ठ महाविद्यालय — २५७
वरीष्ठ महाविद्यालय — ५५०

## भारत सरकारची शिष्यवृत्ती (मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी)

कनिष्ठ महाविद्यालय — १८५
वरिष्ठ महाविद्यालय — १२१

## महाराष्ट्र राज्य शासनाची फी सवलत (मागास वर्गीय विद्यार्थ्यांसाठी)

कनिष्ठ महाविद्यालय — ५३
वरिष्ट महाविद्यालय — २३

## महाविद्यालयीन शिष्यवृत्ती

वरीष्ठ महाविद्यालय — ६१

**श्रद्धांजली :**


१९८० ह्या क्रूर वर्षात अनेक साहित्यिक, कलावंत, राजकीय व सामाजिक नेते, विचारवंत आणि शिक्षणतज्ज्ञ यांचे दु:खद निधन झाले आहे. या सर्व दिवंगत व्यक्तींना 'मॉडर्न'ची भावपूर्ण श्रद्धांजली.



महाराष्ट्र लोकसेवा आयोग
स्पर्धा परीक्षा तयारी वर्गासमोर
व्याख्यान देताना
कुलगुरू डॉ. राम ताकवले
←

सुप्रसिद्ध नाट्य-सिने अभिनेता
**श्रीकांत मोघे**
कलामंडळाचे
उद्‌घाटन करताना
→





सुप्रसिद्ध नाट्यकलावंत
**श्री. चित्तरंजन कोल्हटकर**
कलामंडळाच्या पारितोषिक वितरणाच्या
समारंभ प्रसंगी बोलतांना
←

# नरेंद्र प्रकाशन

६८३, बुधवार पेठ, अप्पा बळवंत चौक, पुणे २

दूरध्वनी : ४४८५६९ : ४४७०६६

आमची इयत्ता ११ वी व १२ वी करिता लोकप्रिय प्रकाशने

*

इयत्ता ११ वी ( F. Y. J. C. )

| | | |
|---|---|---|
| 1) Physics | – Prof Nene, Gambhir, Kulkarni, Kulkarni | 11–50 |
| 2) Chemistry | – Prof. Gadgil, Pathak, Sarlaskar | 12–50 |
| 3) Biology | – Prof. Bhagwat, Athawale, Miss Sane, Prof. Chaudhary | 13–50 |
| 4) Practical Physics | – Prof. Gambhir, Kulkarni | 5–50 |
| 5) Practical Chemistry | – Prof Gadgil, Sarlaskar, Kulkarni | 5–00 |
| 6) Mathamatics I | – Prof. Kelkar, Chirputkar & Prof. Chaubal | 13–50 |
| 7) Mathamatics II | – Prof. Kelkar, Chirputkar & Prof. Chaubal | 12–00 |
| 8) वाणिज्य संघटन | – प्रा. सराफ, देशपांडे | 8–00 |
| 9) जमाखर्च व लेखाकर्म | – प्रा. सराफ, देशपांडे | 11–00 |
| 10) राज्यशास्त्र | – डॉ. नवलगुंदकर, प्रा. पानसे | 7–50 |
| 11) सुगम–भू–विज्ञान | – प्रा. दाते, प्रा. सौ. दाते | 13–50 |
| 12) English Grammar and Composition | – Prof. B. Y. Potdar | 6–00 |

इयत्ता १२ वी ( S. Y. J. C. )

| | | |
|---|---|---|
| 13) Physics | – Prof Gambhir, Save, Kulkarni | 11–40 |
| 14) Chemistry | – Prof Gadgil, Satlaskar, Kulkarni | 11–50 |
| 15) Biology | – Prof. Bhgwat, Athawale, Deshmukh, Varadpande, Miss Sane | 13–50 |
| 16) Mathamatics I | – Prof. Kelkar, Chirputkar, Chaubal | 12–65 |
| 17) Mathamatics II (Calc ules) | –Prof. Kelkar, Chirputkar, Chaubal | 13–00 |
| 18) Practical Physics | – Prof. Gambhir, Kulkarni | 5–50 |
| 19) Practical Chemistry | – Prof. Gadgil, Sarlaskar, & Kulkarni | 5–00 |
| 20) Log-Tables | – | 1–00 |
| 21) Dictionary of Biology | – Prof. Miss. Sane, Prof. Bagool Prof. Miss. Shirgopikar, Dr. Ranade | 10–00 |
| 22) चिटणीसाचा पत्रव्यवहार | – प्रा. सराफ | 5–30 |
| 23) सहकार | – प्रा. सराफ | 6–60 |
| 42) Accountancy | – Prof. Bhagwat, Vaidya | 8–75 |
| 25) सुगम–भू–विज्ञान | – प्रा. दाते, जगताप, करमरकर, सौ. प्रा. दाते | 10–40 |
| 26) सुलभ आधुनिक राज्यशास्त्र | – डॉ. नवलगुंदकर | 5–65 |
| 27) English Grammar & Composition | – Prof. Potdar, Bokil | 8–00 |
| 28) Fundamental Chemical Calculation | – Prof. Gadgil, Barve, Dhume. | 7–00 |

*

# THE THERMAX GROUP

**THERMAX PRIVATE LIMITED**
**TULSI FINE CHEMICAL INDUSTRIES**

Offer equipment and systems for

## EFFICIENT HEAT GENERATION
## DISTRIBUTION AND HEAT RECOVERY
## ENVIRONMENTAL POLLUTION CONTROL
## WATER TREATMENT
## POST-HARVEST PROCESSING

### ... IN PROCESS HEATING

**WATER TUBE STEAM BOILERS**

100 kg to 100 tonnes steam/hr. Pressures up to 185 kg/cm² Multifuel : coal, husk, woodchips, bagasse, oil or gas.

**MECHANICAL STOKERS**

Reciprocating Grate and Travagrate Stokers for coal-fired boilers of 1-6 tonnes steam/hr. Dumping Grate and Spreader Grate Stokers for coal-fired boilers over 10 tonnes steam/hr

**WASTE HEAT BOILERS AND RECUPERATORS**

10-100 tonnes of steam/hr. at pressures up to 70 kg/cm².

**HOT WATER AND HOT AIR GENERATORS**
**MOBILE INDUSTRIAL STEAM CLEANERS**

1,00,000 to 1,500,000 kcal/hr. Higher capacities on request. Fuels : oil, gas or coal.

### ... IN AGRICULTURE

Seed/grain drying, processing and storage equipment and systems.

### ... IN ENVIRONMENTAL POLLUTION CONTROL AND WATER TREATMENT

**AIR POLLUTION CONTROL SYSTEMS AND EQUIPMENT**

Mechanical dust collectors, baghouse filters, venturi and wet scrubbers.

**SOLID WASTE & WASTE HEAT RECOVERY INCINERATORS**

Burns industrial, municipal and biological waste as fuel to provide hot water or steam

**EFFLUENT TREATMENT EQUIPMENT**

Primary and secondary clarifiers, surface aerators, sludge thickeners and digestors, neutralising equipment, trickle filters, activated sludge treating plant, strainers, etc.

**WATER TREATMENT RESINS, EQUIPMENT AND SYSTEMS**

Cation and anion, polystyrene and acrylic based resins, gel type and macroporous resins.
Water treatment softeners, demineralisers, deaerators, degassers, pressure filters, chemical dosing equipment

**THERMAX PRIVATE LIMITED**
CHINCHWAD, PUNE 411019,
TEL : 83550, 83903
CABLE : THERMAX TELEX : 0145-334 TMAX IN

**THERMAX -conserving Energy ... preserving the Environment**

PRATIBHA 81-107